# 500 कोटी

It is estimated that about Rs. 500 crores worth of goods at least are smuggled into our country, financed by foreign exchange leakage. Most of the smuggled goods are those which are most restricted, like Gold, Watches, Precious Stones, etc. There are Insurance Companies which insure these goods against confiscation. The premium rate for such Insurance is 15 per cent. In India the amount of confiscated goods in a year is of the order of Rs. 21 crores. There is a relationship between confiscated goods and the rate of premium of Insurance. Out of 15 per cent premium, 10 per cent may be taken out for the administration cost and profit of those Insurance Companies, and 5 per cent utilised in payment for confiscated goods. It thus becomes clear that the smuggled goods are at least twenty times the confiscated goods, which comes to about Rs. 420 crores of rupees. Surely all the

जनरल रिखे यांच्या चिरंजिवांना अटक

चरस-निर्यातीचे प्रकरण

# माणूस

२८ फेब्रुवारी १९७०

चाळीस पैसे

➤ मुखपृष्ठ १ वरून...

smuggled goods are not insured and on a very conservative scale 80 crores may be added to this amount, the total coming to Rs. 500 crores for every year. This smuggling is a symptom of a serious disease of the Indian economy. Payment for all these smuggled goods is done in the open market which is ultimately financed by means of under invoicing exports and over-invoicing imports. This situation will exist so long as there are two rates of exchange—one official and the other nonofficial. For example, the official rate for a dollar is Rs. 7.50 whereas the open market rate of the same is Rs. 12. The non-official open market rate for the £ is Rs. 30.

*Opinion, February 17, 1970*

[जवळजवळ ५०० कोटी किंमतीच्या वस्तूंची भारतात चोरटी आयात होत असल्याचे आढळून आले आहे. या चोरटया मार्गाने ज्या वस्तू आयात होतात त्यामध्ये सोने, घडयाळे आणि हिऱ्यांची आयात अधिक प्रमाणात होते. कारण या वस्तूंच्या आयातीवर भारत सरकारचे कडक नियंत्रण आहे. काही विमा कंपन्या अशा वस्तूंचे विमेदेखील उतरवितात. सरकारी यंत्रणेकडून अशी वस्तू जप्त होण्याबिरुद्ध हे उतरविले जातात. शेकडा १५ टक्के हा अशा विम्याचा हप्ता असतो. भारतात एका वर्षात २१ कोटी रुपये किंमतीच्या वस्तू जप्त केल्या जातात. अशा रीतीने जप्त झालेल्या वस्तूंच्या किंमतीमध्ये आणि विम्याच्या हप्त्याच्या दरामध्ये एक प्रकारचे नाते निर्माण झालेले असते. म्हणजे या दोन्हींची सूत्रे परस्परावलंबी असतात. हप्त्याच्या दराच्या या १५ टक्यांमध्ये १० टक्के कंपनीच्या व्यवस्थाविषयक आणि नफ्याची रक्कम म्हणून काढून ठेवली जाते आणि ५ टक्के जप्त झालेल्या वस्तूंची नुकसान भरपाई देण्यासाठी बाजूला काढून ठेवली जाते. यावरून हे स्पष्ट होते की चोरटया मार्गाने आयात झालेल्या वस्तू जप्त झालेल्या वस्तूंच्या वीस पटीने अधिक असतात. त्यांची किंमत सरासरीने ४२० कोटी रुपये होते. अर्थात चोरटया मार्गांनी आयात झालेल्या सर्वच वस्तूंचा विमा उतरविलेला नसतो. अगदी कमीत कमी या रकमेत ८० कोटी रक्कम सहज मिळविता येईल, म्हणजे ही रक्कम दर वर्षी ५०० कोटीपर्यंत सहज जाईल. ही चोरटी आयात आपल्या देशाच्या अर्थशास्त्राला जडत चाललेल्या भीषण आजाराचेच लक्षण म्हणावे लागेल. अशा साऱ्या चोरटया मार्गाने आलेल्या वस्तूंच्या किंमती खुल्या बाजारात आदा केल्या जातात. आणि त्यांच्या किंमती निर्यातीकरिता कमी आणि आयातीकरिता जास्त दाखविल्या जातात. ही परिस्थिती जोपर्यंत देवाणघेवाणीचे दोन दर अस्तित्वात असतील तोपर्यंत बदलणार नाही. हे दोन दर म्हणजे एक सरकारी सरळ खुल्या बाजारातील दर आणि दुसरा चोरटा दर. उदाहरणार्थ एका डॉलरचा सरकारी दर रु. ७·५० आहे तर खुल्या बाजारातील दर रु. १२ आहे. आणि बिनसरकारी खुल्या बाजारातील पौंडाचा दर ३० रुपये आहे.]

२८ फेब्रुवारी १९७०

समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष नववे : अंक एकूणचाळीसावा

संपादक : श्री. ग. माजगावकर

सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

१०२५ सदाशिव, पुणे ३० दूरध्वनी : ५७३५१

किंमत : ४० पैसे वार्षिक वर्गणी : वीस रुपये परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

दादूमिया यांची 'दिल्लीश्वरो वा जगदीश्वरो वा' ही लेखमाला मोठ्या उत्सुकतेने वाचीत आहे. चालू अंकातला जिंकतील कोण? इंदिरा की कम्युनिस्ट? हा लेख सध्याच्या कम्युनिस्ट कारवायांवर चांगलाच प्रकाश पाडतो.

नाट्यविषयक दोन लेख आणि चित्रपट ह्यांनी जागा अडविण्यापेक्षा एखादी कथा वगैरे का देत नाही? रातराणीमध्ये सुद्धा चित्रपटच !

'फॅशन नाट्य' आवडले पण लेखक कोण? रोख चाळीस पैसे देऊन आम्ही 'माणूस' वाचतो ते मौजे गांधीनगर, दादूमिया, दिल्ली दिनांक वगैरे सारख्या लेखासाठी, नाट्य, चित्रपट, परिक्षणे आणि भविष्य यासाठी नव्हे.

फेब्रुवारी, १० शशीकांत मान्दुरकर, मुंबई

सात फेब्रुवारीचा 'माणूस' वाचला. आवडला. 'मला काही सांगायचंय' चं परीक्षण सुरेख वाटलं. 'सत्यकाम'च्या परीक्षणात मात्र श्री. शरद गोखल्यांकडून एक उणीव राहून गेली आहे. अन् ती म्हणजे संजीवकुमारच्या अकृत्रिम उत्कृष्ट अभिनयाचा अनवधानाने (?) राहून गेलेला उल्लेख ! अन् त्यामुळे ते काहीसं अपुरं वाटतंय.— मला वाटतं, श्री. गोखले माझ्याशी सहमत असतील.

फेब्रुवारी, ९ श. म. वाघ, गोरेगाव

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

# मार्ग

**श्री. ग. माजगावकर**

वेळ ऐन दुपारची असली तरी ऊन बाधत नव्हते. प्रवास मजेत चालला होता. वरून चालताना डावी–उजवीकडची तळची गावे वाळवण टाकल्यासारखी दिसत होती. तहानेने मात्र जीव व्याकुळला होता. एका वस्तीवरून घेतलेली चार लिंबे या वेळी उपयोगी पडली. पाण्याची जागा बघून बरोबरचा जेवणाचा डबा उघडावा असे म्हणत होतो. पण दुपार टळत चालली, भुकेने पाऊल पुढे पडेना, तरी पाणी दिसायला तयार नव्हते. शेवटी तसेच जेवण उरकले. वाटाड्याची नाचणीची भाकर आणि लाल तिखटही चापले. तासाभराने मात्र एक धनगरवस्ती लागली. येथे आता नक्की पाणी मिळणार या विश्वासाने एका रिकाम्या खोपटात सरळ शिरलो व मातीतच अंग टाकून आडवा झालो. ही गुरे बांधण्याची जागा होती. काटक्यांचा सडा पडलेला होता. पण स्वच्छता पाहत बसण्याइतके शरीर आणि मन थंड होतेच कुठे ? तास–दोन तास येथून हलूच नये असे वाटत होते. रात्रही येथे काढण्याचा विचार येऊन गेला–चोहोबाजूंनी घोघावणाऱ्या पहाडी वादळवाऱ्यांची झुंज ऐकत–दोन बुलंद आवाजीच्या गवयांप्रमाणे चालणारी ! त्या गंभीर संगीताचा अंतःस्वर पकडावा, ते निळे अथांग आरपार पाहावे ! शिवाय आज पौर्णिमा... पूर्णत्वाला आज सर्व बाजूंनीच उधाण आलेले असणार. पूर्णत्वाकडे सतत झेप घेऊ पाहणारे हे मानवी मन......

पाण्याच्या शोधासाठी बाहेर गेलेला वाटाड्या परतला. आसपासच्या दोन-चार झोपड्यांतून त्याने डोकावून पाहिले होते. पण कुणी माणूस त्याला दिसला नव्हता. बऱ्याच वेळानंतर दुरून एक मुलगा येताना त्याने पाहिला. त्याला हाक मारून त्याने पाणी मागितले. मला वाटत होते आता दोन–चार मिनिटात पाणी येईलच. कारण मुलगा या वस्तीपैकीच होता. पण पोरगं इरसाल निघालं. त्याने माणसं सगळी बाहेर गेलीत, मी कुणाच्या घरात शिरून कसं पाणी आणू असं वाटाड्याला सांगून अळंटळं चालविली. त्याचा काका शेजारच्याच खोपटात झोपलेला होता. पण तोही उठायला तयार नव्हता. मला राग तर मुळीच आला नाही, आश्चर्य मात्र वाटत होते. यापेक्षाही पाण्याची तगमग असलेल्या मुलखातून मी रणरणत्या उन्हात असाच अनेकदा प्रवास केलेला आहे. कित्येकदा एकमेकांची भाषाही समजत नव्हती. पण कुठेही मला पिण्यासाठी पाणी मिळाले नाही, असे घडले नव्हते. माणुसकी इतकी आटलेली मी यापूर्वी कधीही अनुभवलेली नव्हती. वाटाड्याला मात्र फारच वाईट वाटत होते. मला तो उठून पुढे चलण्याचा आग्रह करीत होता. मी,

पाणी नसले तरी इथेच अर्धा-पाऊण तास विसावण्याच्या मनःस्थितीत होतो. कदाचित् थोडी डुलकी लागून गेली असती. पुढील वाटचालीला हुशारी आली असती.

थोड्या वेळाने झोपेतला त्या मुलाचा काका उठला. वाटाड्याचे व त्याचे काही-तरी बोलणे चालू होते. अर्धवट डोळा लागत होता, उठू नये असे वाटत होते. पण वाटाड्याने झोपू दिले नाही. झोपडीसमोरच्या स्वच्छ सावलीच्या जागेवर घोंगडे अंथरले गेले. माझी तिथे आळेवळेच स्थापना झाली. दुसरे कुणी शेजारी मोकळेपणे बसूच शकत नव्हते, इतके ते अंथरुण आखूड होते.

काकाचे दोन्ही पाय गेलेले होते. खुरडत खुरडत तो इकडेतिकडे सरकत होता, मुलाला सूचना देत होता, आमच्याशीही बोलत होता. चेहरा मात्र या गिरीमान-वाचा फारच तरतरीत वाटला. दाढी असल्याने बऱ्याचदा सिनेमा-नाटकातल्या शिवाजी–संभाजीचाही भास होई. सरळ उभट चेहरा, लहान निमुळती हनुवटी, टोकदार नाक, डोळ्यांतली चमक–बोलताना मधूनच ते बारीक करण्याची लकब, वळणदार भुवया, गळ्यात जाड मण्यांची माळ, कपाळावर गोल टिळा. कानात बहुतेक काहीतरी अडकवलेलं असावं. आता नीटसं आठवत नाही. हसतही मोठा छान होता–मोकळा, झुळझुळणाऱ्या स्वच्छ झऱ्यासारखा. चित्रकार असतो तर हे हास्य कागदावर उतरविण्यासाठी जिवाचे रान केले असते.

एखादी व्यथा, अडचण तो सांगे आणि चटकन् हसून मोकळाही होऊन जाई. चिंता करण्यासारखे खूप होते. पण चिंतेपासून तो मुक्तही वाटत होता. ही विद्या त्याला कोणी शिकवली असावी? या उघड्या पहाडांनी की स्वैर वाऱ्यांनी?

–गुरांना चारा नाही, पाण्यासाठी आत्तापासूनच ती लांबलांब न्यावी लागतात. आठ–दहा आणे लिटर या भावाने दूध खाली विंझरला नेऊन घालायचे, जे पुण्यात दीड-पावणे दोन रुपये भावाने विकले जाते. सरकार आता पाच एकर जमीन देणार म्हणते, पण रानात गुरे चारण्याचा हक्क काढून घेणार. डोंगराळ जमीन लागवडीखाली कशी आणायची? त्यासाठी भांडवल पुरवले जावे किंवा जमीन शेतीयोग्यच करून दिली जावी. हे शक्य नाही. म्हणजे ही वस्तीही उठणार. हातचा दुधाचा धंदा जाणार. उद्याची शेती अनिश्चित.

माझ्याबरोबरचा वाटाड्या महादेव कोळी होता. गळ्यात जानवे घालणे हे मोठेपणाचे लक्षण आहे अशी त्याची समजूत होती. 'आमच्यात पण जानवे घालण्याची चाल आहे साहेब. पण सोन्याचे असले तरच आम्ही घालतो,' असे त्याने मला वाटेत सांगितले होते. 'कधी पाहिले आहेस का सोन्याचे जानवे?' मी त्याला थट्टेत विचारले होते. आजोबांच्या वेळी घरात होते म्हणाला. त्याची आज ही अवस्था. येणाऱ्याजाणाऱ्याला सिंहगडची खरीखोटी माहिती सांगून जेमतेम पोट भरायचे. शेतीवाडी होती ती दुष्काळात गेली. चार–चार रुपयाला दुभती गाय त्या काळात काढावी लागल्याचे त्याला अजूनही वाईट वाटत होते. तसे हे कोळी आदीवासीच. माव-ळात यांची वस्ती बरीच आहे. ठाणे जिल्ह्यातील जव्हारचा राजा महादेव कोळ्यां-पैकीच. तसेच हे धनगर. मला आपले वाटून गेले 'धनागर' या शब्दाचा धनगर

चा अपभ्रंश असावा. एकेकाळी ही कुटुंबे म्हणजे धनांची आगरे असावीत. यांची ती श्रीमंती कुठे पळून गेली ते समजत नाही. सिंहगडच्या पश्चिम उताराबरच केवळ दहा–बारा धनगरवाडचा आज आहेत. हळूहळू त्याही ओस पडताहेत.

समोरच्या डोंगरावर निलगिरीची लागवड झालेली दिसते आहे. नुकतेच कुठेतरी वाचले, कोरडचा भागात ही लागवड हानीकारक आहे. ही वनस्पती पाणी फार शोषून घेते. लवकर वाढते हा एकच फायदा जंगलखात्याने विचारात घेतलेला दिसतो. लाकुड म्हणून उपयोगही कमी. इथेही वेगळा, स्वतंत्र विचार असू नये ?

सरकार हे असे आंधळे, आम्ही लोक पांगळे. कुणाला मुळातच पाय नाहीत. बहुतेक पाय असूनही न चालू शकणारे. बुद्धी आणि श्रम यांचा कुठे मेळच नाही. त्यामुळे सर्व समाजालाच आलेलं हे पांगुळपण !


कितीतरी वेळ हा सिंहगड आज पाठीमागून पाहतो आहे. अगदी बेढब दिसतो. इकडून पाहत असता यावर काही इतिहास घडला असेल, हे मानायला मन तयार होत नाही. पुण्याकडून हाच पहाड कसा किल्ला म्हणून डोळचासमोर उभा राहतो ! पाय पसरून रखवालीसाठी ताठ बसलेल्या एखाद्या इमानी जनावरासारखा ! आणखी खूप वर्षे हा असाच येथे उन्हापावसात तापत, भिजत, धुपत बसून राहील. ज्याची रखवाली याने वास्तविक करायची तो माणूस येथून अदृश्य झाला तरी.

नाही. पण हेही भाग्य याला लाभणार नाही. हवा खाण्याचे ठिकाण म्हणून या परिसराचा विकास करण्याच्या योजना आहेत. म्हणजे लवकरच येथे पुण्या–मुंबईच्या नवश्रीमंतांची पायधूळ झडणार. कॉन्व्हेन्टमधील मुले आपल्या बापाला येथे विचारणार, ‘ डॅडी, हू वॉज धिस तानाजी ? ही सिम्स टू बी ए ब्रेव्ह चॅप.’

अरे ! कम से कम येथे भात संशोधन केंद्र तरी काढा ! देशी खेळांसाठी एखादी ॲकेडेमी ! फुफुसाचे विकार बरे करणाऱ्या एखाद्या सुसज्ज रुग्णालयासाठी हा परिसर उत्तम आहे. हवा पाण्यानेच निम्मा विकार बरा होईल. गांधीजींच्या उपोषणकाळात येथल्या देवटाक्याचे पाणी त्यांचेसाठी खास नेले जात होते ना ? मोठे औषधी आहे हे पाणी असे म्हणतात.

धार काढण्याची ही वेळ नव्हती पण बाबुराव धनगराने त्या इरसाल मुलाला हे काम सांगितले. स्वच्छ पितळचाचा तांब्या भरून धारोष्ण दूध माझेसमोर ठेवले गेले. मला तर दुधाचे अगदी वावडे. जेमतेम भांडे–अर्धा भांडे घेतले आणि उरलेले सर्वांना घोट घोट घ्यायला लावले. कारण तोपर्यंत आणखी तीन–चार माणसे जमलेली होती पलिकडच्या वस्तीवरचा असाच एक धनगर, कुणी सुतारकाम करणारा बलुतेदार, दोन–तीन एकरवाला एक शेतकरी, कामावरून मधूनच परतलेल्या या वस्तीवरच्या दोन–तीन स्त्रिया...

बाटाडचाने घाई केली नसती तर ही दत्तीदांड धनगरवस्तीवरील सभा आणखीही खूप वेळ चालली असती. □ □ □



# दिल्ली

## दिनांक १७ फेब्रुवारी

### सुप्रीम कोर्टाचे धर्मयुद्ध

बँक राष्ट्रीयीकरणाच्या निमित्ताने सुप्रीम कोर्टाने गेल्या आठवडयात इंदिरा-सरकारशी केलेल्या धर्मयुद्धाचे साद-पडसाद राजधानीत अजून उमटत आहेत. सुप्रीम कोर्टाचा निर्णय सामाजिक दृष्टया लाभदायक की हानिकारक या मुद्यावर राजधानीतच काय पण सर्वत्र देशात वादंग माजले. पण कायद्याच्या दृष्टीने दहा न्यायाधिशांचे एकमत लक्षात घेता समाजवादाच्या पुष्टीसाठी केलेल्या या आर्थिक कायद्याचे मूळ उद्दिष्ट राजकीय बाजी मारण्याचे होते हे स्पष्ट होते. हा निर्णय म्हणजे प्रगतीच्या मार्गातला एक अडथळा आहे असे विधान करून इंदिराजींनी सुप्रीम कोर्टाच्या न्यायाधिशांवर अप्रत्यक्ष व सौम्य अशी टीकाही केली. पण नवीन बाटलेला मुसलमान अधिक कडवा असतो या नियमाला अनुसरून इंदिराजींचे नवीन कनिष्ठ अनुचर रघुनाथराव खाडिलकरांनी प्रस्तुत निर्णयावर उघड टीका केल्याने आता प्रत्यक्ष सुप्रीम कोर्टावर हल्ला करण्याचाच इंदिरा आणि कंपनीचा मनसुबा आहे की काय अशी रास्त शंका राजधानीतील इतर राजकीय नेत्यांच्या मनात येऊ लागली आहे. विरोधी काँग्रेसने तर तावडतोब असा इशारा दिला आहे की सुप्रीम कोर्टात बदल करण्याची चालबाजी आम्ही चालू देणार नाही.

विरोधी काँग्रेसचे सरचिटणीस शामधर मिश्र आणि राज्यसभेतले विरोधी नेते शामनंदन मिश्र यांनी नर पत्रकार-परिषद बोलावून खाडिलकरांनी सुप्रीम कोर्टावर केलेल्या 'हल्ल्या'बद्दल त्यांची हजेरी घेतली. शामनंदनबाबू म्हणाले, 'वरिष्ठ न्यायालयीन वर्तुळात अशी अफवा पसरली आहे की आक्रमक राजकीय मते असलेल्या मंडळींना न्यायाधीश करण्याचा, इतकेच नव्हे तर मुख्य न्यायाधीशांच्या नेमणुकीच्या बाबतीत सिनिऑरिटीचा हक्क न जुमानण्याचा विचार सरकार करीत आहे. हे खरे असेल तर ते चिंताजनक आहे. आम्ही सरकारच्या असल्या हुकूमशाही

व एककल्ली वागणुकीचा प्रतिकार करू.' आपल्या पत्रकात खाडिलकरांना उद्देशून ते म्हणाले, 'न्यायधिशांचा निःपक्षपातीपणा वादातीत असतो. असे असताना त्यांच्या प्रामाणिकतेबद्दल शंका निर्माण करणे सार्वजनिक जीवनातल्या व्यक्तींना मुळीच शोभत नाही.' विरोधी काँग्रेसचे सरचिटणीसद्वय शामधर मिश्र आणि व्यंकट सुब्बय्या यांनीही निराळे पत्रक काढून खाडिलकरांनी लोकांना सुप्रीम कोर्टाच्या विरुद्ध चिथविण्याचा प्रयत्न केला आहे असा त्यांच्यावर आरोप केला आहे. ते म्हणतात, खाडिलकरांनी केलेल्या विधानाचे अपरिहार्यतः होणारे परिणाम किती गंभीर असू शकतील याची प्रधान-मंत्राणींना कल्पना असेल अशी आम्ही आशा करतो.' ही मंडळी हा प्रश्न पार्लमेंटमध्येही उपस्थित करणार आहेत.

खाडिलकरांवर ताशेरे झाडणारी आणखी मंडळी म्हणजे राज्यसभेचे स्वतंत्र सभासद मणी व स्वतंत्र पक्षीय सभासद लोकनाथ मिश्र. यांनीही एक संयुक्त पत्रक काढून असा जाब विचारला आहे की सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निर्णयाचे संभाव्य परिणाम टाळण्यासाठी सरकारने घटनेत बदल करण्याची गोष्ट खाडिलकरांनी 'सहजगत्या' केली आहे हे कितपत योग्य आहे?

एकूण काय, इंदिराजींच्या समाजवादाच्या वाटचालीत आडवे यणारे घटनेतले मूलभूत अधिकार आणि त्यांचे न्यायालयीन रक्षक यांची कितपत बूज राखली जाते हे पाहायचे.

## समाजवादी मित्राचे खायचे दात

समाजवादी इंदिराजींचे मित्र म्हणविणाऱ्या समाजवादी रशियनांचे दाखवायचे दात व खायचे दात यांतला फरक काही वेळा अचानक उघडा पडतो. याचे एक ताजे उदाहरण म्हणजे रशियन अॅटलासच्या आधुनिक आवृत्तीत नेफा व लडाखमधला सुमारे ५२००० चौरस मैलांचा भारतीय भूभाग चिनी दाव्याला अनुसरून चीनमध्ये दाखविण्यात आला आहे. १९६२ च्या चिनी आक्रमणानंतर रशियन अॅटलासमध्ये हा फरक प्रथम दिसला. त्यानंतर ही चूक दुरुस्त व्हावी अशी भारत सरकारने पुनः पुनः विनंती केली व रशियन सरकारने प्रत्येक वेळी तोंडभरून आश्वासनही दिले. – पण त्यानंतर कित्येक आवृत्त्या निघाल्या तरी चूक कायम. एरव्ही रशिया-चीनमध्ये बेबनाव असला तरी साम्यवाद म्हटला की वयं पंचाधिक शतम् असा हा भारताला इशाराच म्हणावा लागेल.

– अनामिक

# मुक्ताफळे

## ◻ सामर्थ्य आहे मंत्र्याचे ! जो जो 'खाईल' तयाचे !

१९६७ साली बिहारात कृष्णवल्लभ सहाय यांचे काँग्रेसी मंत्रिमंडळ गडगडले. नंतर महामाया प्रसाद गादीवर आले. जुने कागदपत्र पाहताना महामया प्रसाद आणि संयुक्त विधायक दलवाले यांना, कृष्णवल्लभ आणि बैलजोडीचे मंत्रिपद भोगलेले काही गुराखी यांचा संशय आला. त्यांनी मग कसून कसून चौकशी केली आणि कारवाई करायची ठरवली ती मात्र फक्त मुख्यमंत्री कृष्णवल्लभ सहाय व त्यांचे इतर पाच मंत्री यांचेवर.

उपमंत्री व मंत्री मिळून चांगली पाऊणशे मंडळी बिहारात काँग्रेस राज्यात राज्य करीत असताना, फक्त पाच-सहा जणांबाबतच पुरावा मिळू शकला याचा अर्थ बहुसंख्य बैलजोडीसेवक प्रामाणिक होते असा होतो की नाही ? न्यायमूर्ती अय्यर यांनी या सहाजणांची चौकशी केली आणि त्यांनी जो अहवाल दिला आहे, तो वाचल्यानंतर आमची तरी खात्री झाली की मुळात काँग्रेस पक्षाची जी काही अब्रू होती, ती विचारात घेता फारसे काहीच गेलेले नाही !

मुख्यमंत्री कृष्णवल्लभ, पाटबंधारे मंत्री महेश प्रसाद, शिक्षणमंत्री सत्येंद्र नारायण, बांधकाममंत्री रामलखन सिंग यादव, व दोन उपमंत्री अंबिकाशरण व राघवेंद्र नारायण अशा सहा काँग्रेस सेवकांवर एकूण १८९ आरोप ठेवण्यात आले होते. परंतु पैसे खाणे, नातेवाईकांना कुरणे वाटून देणे, सगेसोयरे यांची सरकारात भरती करणे, असले काही किरकोळ आरोप धरून फक्त एकूण ५६ आरोपच सिद्ध होऊ शकले, याचा अर्थ १३३ आरोप हे सिद्ध होऊ शकलेले नाहीत ! मूळ आरोप करणाऱ्यांना हे खरोखर लांछनास्पद आहे. आणि हे सिद्ध झालेले आरोप तरी असे काय मोठे आहेत हो ?

कृष्णवल्लभांनी एक मोठे धरण बांधायचे ठरवले. त्याचे कंत्राट देताना मेसर्स रामीहा या कंपनीकडून त्यांनी एक लाख पंचाहत्तर हजार रुपये घेतले. मुख्यमंत्री असतानाच्या काळात त्यांनी साडेतीन लाख रोख व साडेचार लाख रुपयांची इस्टेट केली, आपले दोन सुपुत्र सोमेश्वर प्रसाद व नमदेश्वर प्रसाद यांना 'खाणी' चालवण्याचे परवाने दिले. हे काय आरोप आहेत ! ज्या अर्थी धरण अजून पडलेले नाही त्याअर्थी कंत्राटदाराने धरणाच्या कामात भानगडी करून त्यातून निर्माण केलेले पैसे कृष्णवल्लभ यांना दिले असा होत नाही. मुख्यमंत्र्यांनी वाढदिवसाला खालाखाच्या थैल्या काय घेतलेल्या नाहीत ? चंद्रभानू गुप्तांना विचारा ! कुटुंबवत्सल माणसाने इस्टेट करणे वा आपल्या सुपुत्रांना चांगले धंदे काढून देणे यात आक्षेपार्ह काय आहे बुवा ?

रामलखन सिंग यादव यांनी 'रोड रोलर'चा मोठा संशयास्पद व्यवहार केला, परंतू नेमके किती पैसे खाल्ले हे कमिशनला ठरवता आलेले नाही! बाकीच्या चार जणांनी आपली काही माणसे इतर लायक माणसांना डावलून पोटापाण्याला लावली, किरकोळ थैल्या घतल्या असे कमिशन सांगते.

इतर लायक माणसांना डावलून मंत्र्याने आपले सगेसोयरे व काही पित्ते सरकारी कामात वर नेमले, तर फारसे बिघडले असे कुणीच म्हणाणार नाही. कारण एखाद्या लायक माणसामुळे सरकारी काम चांगले होते किंवा नालायक माणसांमुळे सरकारी काम अडून पडल आहे, असा आजतागायत अनुभव नाही. लायकीचा आणि सरकारी कामाचा मुळी काही संबंधच नसतो! एकाही नालायक नोकराला सरकारी नोकरीतून या कारणासाठी काढल्याचे उदाहरण नाही! किंबहुना खासगी उद्योगधंद्यात ज्यांना कुणी खेटरांशी देखील उभे करणार नाही, अशी माणसे सरकारी कचेऱ्यातून आणि कारखान्यातून सुखाने कालक्रमणा करीत असतात. यामुळे मंत्र्यांच्या अशा वागण्याने देशाचे वगैरे नुकसान होते, हे म्हणण्याचा कमिशनला अधिकारच नाही!

यापैकी रामलखन सिंग यादव हे बिहारमधील इंदिरा काँग्रेसचे जनरल सेक्रेटरी आहेत आणि उरलेले पाच हे निजलिंगप्पांच्या काँग्रेसचे चालू आधारस्तंभ आहेत.

आम्ही विचारतो की मंत्री असताना जर या मंडळींनी पैसा गोळा केला नसता तर आज बिहारात आमदार फोडण्यासाठी लागणारा पैसा आणायचा होता कुठून? मोहनलाल गौतम सांगतात—'चंद्रभानू गुप्तांना पाडण्यासाठी इंदिराजींनी आमदारांना ५०,००० रुपये देऊ केले आहेत.' स. का. पाटील म्हणतात—'गेल्या निवडणुकीत काँग्रेस मंत्रिमंडळे अधिकारावर आणण्यासाठी आम्हाला २ कोटी रुपये खर्च आला. आता ती मंत्रिमंडळे पाडण्यासाठी इंदिरा गांधी २ कोटी रुपये पुन: खर्च करीत आहेत!' असे सर्व असताना कृष्णवल्लभांनी पैशाची तरतूद केली, रामलखन सिंगांनी केली तर मात्र अब्रू जाते काय? उलट समाजवादाच्या वाटचालीच्या दृष्टीने निरनिराळ्या पातळ्यांवर पैसा जमा करणे नितांत आवश्यक आहे असे आमचे स्पष्ट मत आहे. उगाच का जगजीवनरामांना अध्यक्ष केले आहे?

रामलखन सिंग हे ज्या इंदिरा काँग्रेसचे जनरल सेक्रेटरी आहेत त्याच पक्षाचे मंत्रिमंडळ दरोगा प्रसाद यांनी आता तिथे गादीवर आणले आहे. तिथला प्रजा-समाजवादी पक्ष रामलखन सिंगांच्या गळ्यात पडलेलाच आहे.

दरोगा प्रसाद – रामलखन सिंग हे दरोगाप्रसादांना योग्य वाटेने नेतील अशी आम्हाला आशा आहे. बिहारच्या नव्या मंत्रिमंडळाला अंगिकृत कार्यात आम्ही सुयश चिंतितो.

सामर्थ्य आहे मंत्र्यांचे। जो जो खाईल तयांचे। परंतू तेथे काँग्रेसचे। अधिष्ठान पाहिजे ॥

— ग्यानबा

क्षेत्र : करवीर

# सोहळा

## ५१ व्या

## मराठी नाट्यसंमेलनाचा

सुधीर मोघे

'कोल्हापूर' या शहराबद्दल एक गूढ आकर्षण नकळतच माझ्या मनात कधीपासून वसत आलेले आहे...निसर्गरम्य परिसर, विलक्षण कलासक्ति, रगेल आणि रंगेल रांगडेपण आणि यांच्या जोडीला एक मनमोकळा प्रशस्त ऐसपैसपणा या स्वभावविशेषांमुळे या शहराला एक खास स्वयंभू व्यक्तिमत्त्व लाभले आहे... आणि म्हणूनच मागील आठवडचात इथे भरलेल्या ५१ व्या मराठी नाटचसंमेलनाला हजर राहण्याचा योग आला तेव्हा मनाला कसे 'झकास' वाटले.-कोल्हापूरकर मंडळी तशी मोठी योजक ! 'प्रतिनिधीनिवासा'साठी निसर्गरम्य अलिशान शालिनी पॅलेस आणि प्रमुख प्रकट कार्यक्रमाकरिता सुबक बांधणीचे पॅलेस थिएटर—ही 'पॅलेसियल' व्यवस्था प्रथमदर्शनीच खूष करून टाकणारी होती. खास कोल्हापुरी आतिथ्यशील पाहुणचार आणि विविध नाटचविषयक कार्यक्रम यात तीन दिवस पाहता पाहता वाहून गेले आणि आज तटस्थपणे वळून पाहताच लक्षात येते आहे की मनाच्या कोऱ्या पाटीवर उमटल्या आहेत,...काही संस्मरणीय आठवणी, काही भल्याबुऱ्या प्रतिक्रिया आणि काही अस्वस्थ करणारे प्रश्नही...!

ता. १३ च्या संध्याकाळी केशवराव भोसले नाटचगृहात उद्घाटनाचा प्रमुख कार्यक्रम झाला.उद्घाटक होते महसूलमंत्री नामदार बाळासाहेब देसाई! नांदी


आणि स्वागतगीत होऊन स्वागताध्यक्ष श्री. लोहियांचे भाषण झाले. बाकी आपल्याकडील संमेलनांतील स्वागताध्यक्षांचे भाषण हा एक स्वतंत्र विवेचनाचा (आणि विनोदाचाही) विषय आहे. "आपल्या सर्वांचे हार्दिक स्वागत असो" या एकाच उचित आणि अमृतमधुर वाक्यासाठी—अगोदर; त्या गावाचे ऐतिहासिक व भौगोलिक महत्त्व; तिथल्या असतील नसतील त्या उज्ज्वल परंपरा आणि स्थानिक कर्तबगारांची श्रेयमालिका इ. इ. 'नमनाला ओतलेले घडाभर तेल' श्रोतृवर्गाला निमूटपणे कानांत घालून घ्यावेच लागते.—इथे तर नाटय, चित्रपट, चित्रकला, साहित्य, कुस्ती, राजकारण, औद्योगिक इ. विविध क्षेत्रांतील असाधारण परंपरा लाभलेले कोल्हापूरसारखे शहर—! त्यामुळे या साऱ्या क्षेत्रातील महर्षींची प्रदीर्घ नामावली केवळ ऐकतानाही गुदमरायला झाले.—शिवाय हा सारा महिमा वर्णन करायला लोहियांसारखा मनस्वी आणि अभिनिवेशी वक्ता लाभला होता. मात्र याच भाषणात त्यांनी व्यक्त केलेले नाटयविषयक मौलिक विचार त्यांच्या प्रांजल व अभिजात रसिकतेचे द्योतक होते. किंबहुना या वर्षीच्या नाटयसंमेलनाच्या सोहळयावर श्री. लोहिया यांच्या चोखंदळ, रसिक व मनस्वी व्यक्तिमत्त्वाचा फार खोल ठसा उमटला होता हे प्रामाणिकपणे मान्य करायला हवे. जन्माने अ-मराठी असूनही मराठी आणि विशेषत: संगीत रंगभूमीचे त्यांनी जिवाला जडवून घेतलेले वेड व त्यात संपादिलेली जाणकारी खरोखरच अजब आहे. त्यामुळेच समारोपाच्या दिवशी त्यांच्या कळकळीच्या क्रियाशील नाटयप्रेमाला मनमोकळी दाद दिल्यावाचून कुसुमाग्रजांना राहवले नाही.

श्री. बाळासाहेब देसाईंनी उद्घाटनाच्या भाषणाच्या आरंभीच श्री. तेंडुलकरांच्या अभिमानास्पद यशाचा गौरवपूर्ण उल्लेख केला [आणि मनात आले की अखिल भारतीय पातळीवर मराठी नाटककाराला प्रथमच मिळालेल्या या यशाची अ-पूर्वता लक्षात घेता, वास्तविक नाटयपरिषेदतर्फे श्री. तेंडुलकरांचा प्रत्यक्ष सत्कार संमेलनाच्या व्यासपीठावर होण्यात केवढे तरी औचित्य होते...तसा शेवटच्या खुल्या अधिवेशनात त्यांच्या अभिनंदनाचा ठराव झाला पण निर्जीव ठराव वेगळा आणि... असो! बाकी 'असो' हेच अखेर, अधिक खरे आणि बरेही!]—आजचे मराठी नाटक वास्तव आहे हे मान्य करून समाजप्रबोधन या उद्देशाचेही स्मरण ठेवावे असे मत श्री. देसाईंनी व्यक्त केले व या संदर्भात आजचा 'मराठी तरुण' या समस्येचा काही शोध घेण्यासाठी आणि नव्या पिढीला प्रेरणा व जबाबदारीची जाणीव देण्यासाठी नाटकाच्या माध्यमाचा उपयोग करता आल्यास पाहावा असे आवाहनही त्यांनी केले.

वि. वा. शिरवाडकरांचे अध्यक्षीय भाषण ऐकणे हा एक अत्यंत आनंददायी अनुभव होता. एकतर शिरवाडकरांचे शब्दसामर्थ्य आशय अचूक टिपणारे व तरीही सहजसुंदर! त्यातही मराठी नाटयसृष्टीचा अत्यंत डोळसपणे व खोलवर

विचार त्यांनी केल्याचे या भाषणातून जाणवत होते. आजच्या मराठी रंगभूमीची सारी श्रेये व सारी दुखणी यावर त्यांनी नेमके अचूक बोट ठेवले. रंगभूमीचे जुने, वैभवशाली युग, मध्यंतरीचे अंधःकार युग, डॉ. भालेरावांसारख्या नाट्यवेड्यांनी चालना दिलेले अव्यावसायिकांचे युग व त्यातूनच बहरलेली आजची संपन्न व्यावसायिक रंगभूमी–या सर्वांचा एक धावता व तरीही सर्वस्पर्शी परामर्श त्यांनी आरंभी घेतला व नंतर आजच्या रंगभूमीची वाङ्मयीन गुणवत्ता, संगीताचा वारसा; नाईटपद्धतीचा धोका, नाट्यगृहांची अडचण, नाट्यशिक्षणकेंद्र या साऱ्या कलात्मक व व्यावहारिक अंगांची जांचतपासणीही त्यांनी केली. इतकेच नव्हे तर आजवर कुणीही न उल्लेखिलेल्या निर्मात्यांच्या दुःखांना त्यांनी अत्यंत जिव्हाळ्याने वाचा फोडली आणि भाषणाच्या अखेरीस आजच्या मराठी साहित्यात आलेल्या व नाटकातही उद्या कदाचित येऊ शकणाऱ्या 'नवीनते'च्या पाऊलांची चाहूलही घेण्याचा एक ताकदीचा प्रयत्न केला.–या भाषणाच्या निमित्ताने आजच्या रंगभूमीच्या अंतर्बाह्य स्वरूपाचा व गुणावगुणांचा साकल्याने शोध घेण्याचा श्री. शिरवाडकरांनी केलेला मनस्वी अट्टाहास अभिनंदनीय आहे. याच जोमाने व साक्षेपाने नाट्यपरिषेदचे नेतृत्व नियोजित काळात त्यांच्या हातून व्हावे, ही हार्दिक शुभेच्छा–! मात्र आजच्या रंगभूमीच्या समृद्धीची व प्रगतिशीलतेची सारी चिन्हे मान्य करूनही, श्री. शिरवाडकरांनी या भाषणातून दिलेला एक गंभीर इशारा रंगभूमीच्या साऱ्या लहानथोर घटकांनी मनात काळजीपूर्वक जतन करायला हवा–" मराठी नाट्योद्योग संघटित, संपन्न आणि विकासशील करण्याची जबाबदारी काळाने आपल्यावर टाकलेली आहे. अनुकूल परिस्थिती निर्माण झाल्यावर तिचे तात्पुरते फायदे ओरबाडून काढण्यांत आपण मश्गूल झालो तर ज्या फांदीवर आपण उभे आहोत तिच्यावरच कुऱ्हाडीचे प्रहार केल्यासारखं होणार आहे–"–इशारा खरोखरीच कळकळीचा आहे...विशाद एकच; ऐकायला सवड आहे कुणाला ?

ता. १४ ला–शनिवारी सकाळी ९॥ वाजता 'अभिरूप न्यायसभे'चा बहारदार कार्यक्रम झाला. "संगीत नाटकाने मराठी रंगभूमीवरील वास्तवतेचा निर्घृण खून केल्याचा–" गहनगंभीर आरोप न्यायालयासमोर सादर झाला होता. आरोपी म्हणून भालचंद्र पेंढारकर; विद्याधर गोखले, वसंतराव देसाई [ म्युझिक डायरेक्टर. ] आणि सौ. सुहासिनी भ्रतार सुरेश मुळगावकर या 'महाभयंकर' मंडळींना आवश्यक त्या बंदोबस्तात कोर्टासमोर हजर करण्याचा हूकूम होता...प्रत्यक्षात श्री. गोखले व श्री. देसाई हे महत्त्वाचे गुन्हेगार आयत्या वेळी गैरहजर–झाल्याने खटल्याच्या सस्पेन्समध्ये केवढीतरी भर पडली. अखेरीस; मुळात साक्षीदार म्हणून बोलावलेल्या श्री. लोहियांना [ बहुधा आरोपी कमी पडल्याने ] आयत्या वेळी आरोपी



नटराज साक्ष खरे सांगेन साधारणतः खोटे सांगणार नाही

म्हणून कोर्टासमोर खेचण्यांत आले. यामुळेच की काय श्री. लोहियांच्या तोंडावर सात्त्विक संताप उसळत होता. स्त्री आरोपी सौ. सुहासिनी भ्रतार सुरेश मुळगांवकर करुन सवरून काहीच न केल्याचा भाव व्यक्तविणारे निर्ढावलेले हसू मुद्रेवर वागवीत बसल्या होत्या. तर पापभीरू पेंढारकर [ बहुधा अपराधाच्या जाणिवेने ] शरमिंदे होऊन साक्षीदाराचा डगडगणारा पिंजरा दोन्ही हातांनी कसाबसा घट्ट धरून केविलवाण्या चेहऱ्याने बसले होते. आदल्या दिवशी नाटक पाहण्याचे जागरण झाल्यामुळे 'कोर्ट' जरासे उशीराच खडी ताजीम घेत प्रविष्ट होऊन आपल्या जागी स्थानापन्न झाले. श्री. अण्णासाहेब माडगूळकरांची न्यायमूर्तीच्या पेहरावातील ती घनगंभीर मूर्ती पाहून—'भारदस्त' या शब्दाला कधी काळी मनुष्यरूप लाभल्यास ते कसे दिसेल याचा साक्षात प्रत्यय प्रेक्षकवृंदाला आला. अखेर प्रत्यक्ष कामकाजास सुरुवात झाली. श्री. करमरकर हे सरकारी वकील म्हणून व संगीतज्ञ बाबुराव जोशी आरोपीचे वकील म्हणून उभे होते. पुण्याचे बाबूराव विजापुरे यांनी पट्टेवाल्याच्या पेहरावात खास कोर्टातील हेल काढून 'दामूऽ कोऽकरू...' 'चिगुमामा पेण्डश्ये' 'पद्म श्री दाजीभा टवडेकर' अशा नावांच्या असंख्य मोडतोडी करीत एक एक साक्षीदाराला बोलवायला सुरुवात केली...'नाव सांगा ..' 'माधव मनोहर' 'एवढंच नाव? कमाल आहे. बऽर धंदा?...अध्यापन! ही काय भानगड आणि! हां हां म्हणजे मास्तर' अशा ठेक्यात खटल्याने रंग घेतला. सरकारकडून माधव मनोहर, मामा पेण्डसे, दामू केंकरे इ. तर आरोपींकडून 'वि. वा. कुसुमाग्रज शिरवाडकर' [केवढं लांब नाव!] दाजी भाटवडेकर. इ. मंडळींच्या साक्षी विशेष संस्मरणीय झाल्या. मध्यंतरी तहान

लागल्यामुळे कोर्ट पाणी पीत असताना [ हो, हो, पाणीच ! ] दोन मिनिटे कामकाज स्थगित झाले. परंतु यानंतर लगेच बोलावलेल्या दाजी भाटवडेकर या साक्षीदाराने पट्टेवाल्यास करंगळी दाखवून कुठल्यातरी अज्ञात स्थळी प्रयाण केले आणि साक्षीदाराला पिंजऱ्यामध्ये येण्यास होणाऱ्या विलंबामुळे अस्वस्थ झालेल्या कोर्टासमोर आरोपीच्या वकिलांनी घाईघाईने खुलासा केला; ' तेही मघाशी आपल्यासारखेच पाणी प्याले होते. '–अनेक उलट सुलट साक्षी झाल्या. सरकारच्या बाजूच्या [ संगीतविरोधी ] साक्षीदारांच्या साक्षी प्रभावी होऊनही, जिचा खून झाला त्या ' वास्तवते'चे रूप नक्की कसे होते या बाबतीत त्यांच्यात एकमत होऊ न शकल्याने त्यांची बाजू लंगडी पडली. शिवाय त्यांच्या बहुतेक साक्षीतून मूळ संगीताने खून केला नसून सगीताच्या अतिरेकाने तो खून केला असे निष्पन्न झाले. याचाही आरोपीपक्षाला फायदा मिळाला. अखेर गंभीरपणे व साधकबाधक विचार करून कोर्टाने निणय जाहीर केला– ' वास्तवतेचा खून झाल्याचे सिद्ध झाले नाही. मात्र तिला किरकोळ दुखापत नक्कीच झाली आहे. तेव्हा फलाण्या ॲक्टान्वये आरोपींना पुढील शिक्षा फर्माविण्यात येत आहेत. ( १ ) श्री. विद्याधर गोखले :–संगीत नाटकाच्या बहुप्रसवतेच्या मुळाशी असणारे, 'पान' खाण्याची वर्षभर बंदी ! व सेतुमाधवपगडींनी गालिबवर लिहिलेल्या लेखाचे शार्दुलविक्रिडीत, वसंततिलका आदि वृत्तात रूपांतर सत्वर करावें (२) श्री. भालचंद्र पेंढारकर– ' पण्डितराज जगन्नाथ ' या नाटकात प्रस्तुत आरोपीने ' मदनाची मंजिरी,' हे गाणे घोळवून घोळवून म्हणून शहाजहानच्या

---

## एक किस्सा...

' अभिरूप न्यायसभे 'त साक्ष देताना श्री. माधव मनोहरांनी, संगीताच्या अतिरेकामुळे होणाऱ्या अनर्थाचा एक मजेदार किस्सा सांगितला. बहुधा द्रौपदी नाटकातील हा प्रसंग असावा. यातील एका स्त्रीपात्राच्या गाण्याच्या वेळी रंगभूमीवरच मागील बाजूस एक पात्र मरून पडलले असे पुढं मारे हाका मारमारून गाणं चाले आणि मरण्याचा अभिनय करणारा नट प्रचंड ' बोअर ' होई. एके दिवशी हा कंटाळा घालवण्यासाठी त्या नटाने प्रेक्षकांकडे पाठ केलेल्या मृतावस्थेत हळच विडी फुंकायला सुरुवात केली. थोडावेळ ठीक चालल. पण थोड्यावेळानं त्याच्या दिशेनं धुराची वलये रंगभूमीवर पसरू लागून गौप्यस्फोट झाला आणि प्रेक्षकांचीं हसून हसून मुरकुंडी वळली.– माधव मनोहरांनंतर आलेल्या कुसुमाग्रजांनी या चुटक्याला दुजोरा देऊन सांगितले, ' माधव मनोह·ांनी हा किस्सा अपुराच सांगितलाय्...पुढं काय झालं की झाल्या प्रकाराबद्दल मालकांनी त्या नटाची खूप कडक हजेरी घेतली–तेव्हा; पुढील प्रयोगापासून तो नट धूर न निघणारं साधन वापरू लागला. '

---

भूमिकेतील श्री. मामा पेंडसे यांना दिलेल्या 'यातनां'च्या परिमार्जनार्थ—दरवर्षी महिनाभर औरंगजेबाच्या खुलदाबाद येथील थडग्यासमोर संगीतसेवा रुजू करावी. [ ही शिक्षा पेंढारकरांना की बिचाऱ्या औरंगजेबाला ? ]

श्री. लोहिया – तंबोरे व सतारीचा कारखाना काढावा.

– वसंत देसाई म्यु. डा. – बर्फ पडायला सुरुवात झाल्यावर हिमालयात जावे ते पुन्हा पुढील वर्षी बर्फ पडू लागल्यावर परत फिरावे व अशा यात्रा अविरत करीत राहावे. [ थोडक्यात परत न यावे. ]

सौ. सुहासिनी भ्र. सुरेश मळगावकर – आरोपीकडे 'पाहिल्यावर' तिच्या हातून खुनासारखे कृत्य घडेलसे न वाटल्याने तिला सोडून देण्यात येत आहे. [ कोण हा पक्षपात ! ]

– पद्मश्री दाजी [ 'ही दोन नावे कसली'—इति कोर्ट ] भाटवडेकरांनी साक्षीदार म्हणून संगीताची बाजू मांडताना 'भावनेची उत्कटता शिगेला पोचली की तिचा छंदोबद्ध संगीत आविष्कार अपरिहार्य असतो' यांसारखी बरी विधाने [ चुकून ] उच्चारली. पण त्याचबरोबर—'सौंदर्य रोचकता, परिणामकारकता, अर्थवाहकता आणि उद्‌बोधकता—यांसारखे भयप्रद व संशयास्पद शब्द वापरून कोर्टात एकच तारांबळ उडवून दिली. तसेच साक्ष संपविताना अनपेक्षितपणे त्यांनी 'धिक्कार मन साहिना' या गाण्याचे अकाळ विकाळ आलाप घेतले—वास्तविक भर कोर्टात असले हिंसक वर्तन केल्याच्या आरोपाखाली त्यांना तात्काळ समज देणे अगत्याचे होते—परंतु करारी न्यायनिष्ठुरता महाराष्ट्रात रामशास्त्र्यांबरोबर जन्माला येऊन त्यांच्याबरोबरच विलयाला गेली या दारुण वस्तुस्थितीचे प्रत्यंतर इथेही आले.

शनिवारी सायंकाळी शालिनी पॅलेस इथे आयोजित केलेली 'व्यावसायिक निर्माता संघा'ची प्रकट सभा श्रोत्यांच्या अनुपस्थितीमुळे [ अल्प उपस्थितीतसुद्धा नव्हे ] चक्क रद्द झाली, कुणालाही वैयक्तिक दोष न देता—ही घटना म्हणजे संमेलनाला लागलेले गालबोट होय हे इथे नमूद करायलाच हवे व याच संदर्भात एका कटू वस्तुस्थितीचा इथे उल्लेख केल्यास वावगे ठरणार नाही. स्थानिक नामवंतांचा संमेलनाबद्दलचा निरुत्साह हा अनपेक्षित होता. विविध सामाजिक क्षेत्रांतील कोल्हापूरच्या परंपरा व त्यातल्या गुणी माणसांचे नैपुण्य – या पार्श्वभूमीवर; काही मोजकीच माणसे या कार्यात रस घेताना व राबताना दिसत होती. – व्यक्तिगत मानापमानाच्या काही कुरबरीही कानावर ओझरत्या आल्या. उभयपक्षी काही योग्य-अयोग्य कारणे असतील, हे गृहीत धरूनही घरातल्या मतभेदांचा परिणाम अखेर हाती घेतलेल्या कार्यावर व्हावा हे कुणाही सुजाण मनाला प्रशस्त वाटणार नाही. पण असे काहीसे इथ झालेले दिसले खरे...!

–ता. १५ ला रविवारी सकाळी खुले अधिवेशन झाले. प्रथम तेंडुलकर, हिराबाई, दाजी भाटवडेकर यांच्या अभिनंदनाचे ठराव झाले. नंतर श्री. मामा पेंडसे व श्री. वा. य. गाडगीळ यांनी नव्याने स्थापन झालेल्या 'नाटच निर्माता संघा'चे अभिनंदन करून त्यातील संभाव्य धोके सूचित केले व याचप्रमाणे नाटककार, कलाकार, कारागीर या सर्वांच्याही संघटना होऊन त्या एकमेकांस पूरक व पोषक व्हाव्यात आणि त्यातून अखेर रंगभूमीचा विकास व्हावा ही शुभेच्छा व्यक्त केली.

श्री. बाबुराव गोखले व श्री. राजाराम शिंदे यांनी व्यवसायातील विलक्षण अनुभव सांगून गावोगाव नाटचगृहांची निकडीची मागणी केली. – श्री. भाटवडेकर व श्री. केंकरे यांनी विद्यापीठाच्या अभ्यासक्रमातून 'नाटच' विषयाचा समावेश व्हावा या जुन्याच मागणीचा पुनरुच्चार केला, तर श्री. बाळ कोल्हटकरांनी अन्य भाषिक नाटकांचे प्रयोग करून त्यांचा सन्मान मराठी रंगभूमीतर्फे करावा असा ठराव मांडला. कलावंतांना 'पेन्शन' देण्यासंबंधी एक योजनाही त्यांनी या वेळी सुचवली. – हे सर्व ठराव चांगले आहेत – परंतु ते फलद्रुप होण्याकरिता त्यांचा सातत्याने पाठपुरावा होणे अगत्याचे आहे. – एरवी, त्याच खड्डचात तीच झाडे दरवर्षी नव्या उत्साहाने लावणाऱ्या सरकारी वनमहोत्सवाची अवस्था प्राप्त होणे अशक्य नाही – या खुल्या अधिवेशनाने संमेलनाचे सूप वाजले !

– तीन दिवस इथे वावरताना प्रेक्षक या नात्याने अनेक अपेक्षा आणि प्रश्न मनात जागे होत होते. – ज्यांच्याकरिता हा संमेलनाचा खटाटोप करायचा त्या व्यावसायिकांचा संमेलनाबद्दलचा निरुत्साह ही एक फार मूलभुत उणीव आहे. – आजच्या रंगभूमीच्या विविध अंगांचे आणि घटकांचे मानकरी निदान एक दिवस तरी एका पातळीवर एकत्र येणे ही गोष्ट इतकी दुर्लभ असायलाच हवी का ?... या वर्षी प्रथमच काही निर्माते तीनही दिवस उपस्थित राहिले. इतकेच नव्हे तर समरसतेने सहभागी झाले. हे निश्चितच प्रसादचिन्ह आहे. पुढील वर्षी संमेलन मुंबईतच आहे. तिथे अधिक आशादायक दृश्ये दिसतील का ?...रंगभूमीचे 'व्यवसाय स्वरूप' मान्य करूनही; बेभान चळवळीचा एखादा अंश तरी चैतन्याने त्यात संचरेल का ?...संमेलनाचा 'उत्सव' सोडून दिला तरी कठोर आत्मपरीक्षणाची गरज कधीतरी यातल्या मंडळींना भासेल का ? ..आणि आज दिसणारी भरभराट ही नव्या वैभवयुगाची नांदी ठरेल की इतिहासाची पुनरावृत्ती करणारी एखादी अंधारदरी दूर भविष्यात कराल जबडा चाळवीत वाट पाहत असेल ?–या साऱ्या प्रश्नांची उत्तरे अगम्य काळाच्या पोटात दडली आहेत. त्यातील अनुकूल उत्तरेच हाती यावीत यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणे आणि चांगल्याची इच्छा करीत राहणं इतकेच आपल्या हाती उरते – तेवढेच जरी सातत्याने व निदान स्वतःशी प्रामाणिक राहून आम्ही करीत राहिलो–तर, ..' हेही नसे थोडके...!!!'

□ □ □

# सिंडिकेट ते इंडिकेट

वि. शं. पारगावकर

अहमदावादचा निरोप घेताना मन जड झालेलं होतं. या शहरात माझं असं कोण होतं ? कोणी नसलं म्हणून काय झालं ? काही काही गावांविषयी, शहरांविषयीदेखील मनात जिव्हाळा वाटतो. पण मग त्या शहराचा सहवास तर खूप घडावा लागतो. अहमदावाद-विषयी तसंही काही नव्हतं. कॉंग्रेसच्या अधि-वेशनाच्या निमित्तान हे शहर मी प्रथमच पाहत होतो. तेही धावतं. सारं लक्ष होतं गांधीनगरवर. फक्त मुक्कामापुरत या शहरात आम्ही रात्री–बेरात्री येत होतो. कित्येक वेळा हे शहर एखाद्या पाखरासारखं दोन पायांवर बसून झोपलेलं मी पाहिलं होतं. एरवी माण-सांच्या थव्यांनी तुडुंब भरलेले बसस्टॉप्स रात्री शुष्क होऊन पडलेले मी पाहिलेले होते. कधीही शांत आणि मनुष्यविरहित नसणारं रेल्वे स्टेशनदेखील मी अगदी शांत, थंड, शब्दरहित अवस्थेत पाहिलेलं होतं. नुसते निळे दिवे जळत होते, प्लॅट फॉर्म्स संपूर्ण रिकामे होते, रुळावर एकही गाडी नव्हती.

अहमदावाद शहर तसं काही लहान शहर नाही. अगदी मुंबई एवढं अवाढव्य नसलं तरी बरंच मोठं आहे. पण त्याच्याही काही अशा अवस्था पाहायला मिळाल्या होत्या.

आदल्या दिवशी मात्र सकाळी सातपासून रात्री दहापर्यंत आम्ही या शहरातून हिंडलो होतो. टॅक्सीतून, रिक्शातून, बसेस मधून आणि पायीदेखील. एखाद्या नव्या

मोठ्या शहरातून मनुष्य जेव्हा पायी फिरू शकतो तेव्हा ते शहर अगदी सरळ, साधं आणि प्रेमळ असतं असं माझं मत झालेलं आहे. एखाद्या मोठ्या व्यक्तित्व असणाऱ्या, परंतु प्रेमळ माणसासारखं. ती मोठी असते परंतु तिच्याशी बोलायला आपल्याला जशी भीती अथवा दडपण वाटत नाही तसे.

अहमदाबाद शहर मला अगदी तसं वाटलं.

मोठ्या शहरातून जो एक बकालीपणा दिसतो त्याचे फारसे दर्शन मला या शहरात घडले नाही. मणिनगर, भद्र, मिल्एरिया, कालपुरा, लालदरवाजा या भागांतून जसे आम्ही फिरलो, रमलो तसेच शहराच्या बाहय भागातूनदेखील फिरलो. परंतु मी माझ्या पहिल्या लेखात म्हटलं होतं की गुजराती माणूस–वेगवेगळ्या व्यवसायातील गुजराती माणूस–मला पहायची इच्छा आहे–गुजराती भिकारीदेखील ! परंतु मला अहमदाबादमध्ये एकही गुजराती भिकारी दिसला नाही. भारतातील बरीच राजधानीची शहरे मी पाहिली आहेत. मध्यवर्ती सरकारची राजधानी दिल्लीदेखील. तिथंदेखील रस्त्यावर भिकारी नाही असं दृश्य काही मला दिसलं नाही. आंध्र सरकारची राजधानी हैद्राबाद शहर. हे राजधानीचं शहर अतिशय सुंदर आहे. रात्री तर ते एखाद्या ' जादूई नगरी 'सारखं शोभिवंत दिसतं. परंतु तिथंदेखील देवळासमोर, रस्त्याच्या कडेला, मशिदीच्या आसपास आणि बसेसच्या थांब्याजवळ तर प्रवाशांच्या संख्येइतके भिकारी अंगावर धोंघावत येतात. एखाद्या अत्यंत सुस्वरूप माणसाच्या अंगावर कोडाचे चारपाच डाग असावेत, तसेच उत्तम संस्कृतीच्या आणि वैभवशाली शहरांच्या अंगावरील हे डागच आहेत अशी भावना भिकारी पाहिला की मनात येते.

मात्र याला अपवाद मला अहमदाबाद शहर वाटलं.

या शहराची सुंदर शहरात गणना होणार नाही कदाचित. पण स्वच्छ, वैभवशाली आणि हौशी व आनंदी शहर म्हणून हे शहर कोणाही पाहुण्याच्या मनात राहील. सिंडिकेट कॉंग्रेसच्या अधिवेशनप्रसंगी खुल्या अधिवेशनाच्या सभेला जी लाखोंनी गर्दी जमली होती, अहमदाबाद शहरापासून वीस मैल दूर असलेल्या ठिकाणी, तिच्या मुळाशी लोकांच्या पोटतिडिकीपेक्षा त्यांची हौस आणि आनंदी स्वभावच जास्त होता असे माझे मत आहे. सडकेवर दोन गटात मारामारी चालली तरी तिथे शेकडो लोक जमा होतात. ते का ? तोही एक मनुष्यस्वभावच आहे. वरील दोन्ही गुणविशेषांत तिसरा हा मनुष्य स्वभावदेखील जमेस धरला म्हणजे त्या अफाट गर्दीचे इंगित लक्षात येईल असे वाटते.

बारा कोसांवर भाषा बदलते म्हणतात, भाषा म्हणजे बोलीभाषा. भाषा तीच पण बोलण्याची पद्धत बदलते. तसेच मनुष्यस्वभाव हा कितीही सनातन आहे असे म्हटले तरी निरनिराळ्या गावातील, शहरातील मनुष्य, त्याच्या वागणुकीच्या छटा वेगळ्या असतात. मुंबईचा माणूस पुण्याच्या माणसापेक्षा किती तरी वेगळा वाटतो;

वागतो. मला अहमदाबादचा माणूस अशाच अर्थाने अगदी वेगळा वाटला. तो मनमिळाऊ आहे, दुसऱ्याशी सहकार्य करण्याची वृत्ती त्याच्या रक्तातच आहे. काही दिवसांच्या सहवासातच त्याची ही वृत्ती माझ्या लक्षात आली होती. त्याचं एक साधं उदाहरण देतो. सोमवारी सकाळी आम्ही 'भद्र' भागात काही महाराष्ट्रीय लोकांना भेटण्यासाठी गेलो. बसमधून उतरलो आणि इकडे तिकडे या कॉलनीचा शोध करीत खूप हिंडलो. पण ती आम्हाला सापडली नाही. शेवटी स्टेट बँकेच्या इमारतीसमोर हमरस्त्यावर आम्ही येऊन उभे राहिलो. फूटपाथवरून एक बुटासुटातला गुजराती माणूस चालला होता. तो मोठा ऑफिसर असावा असे त्याच्या एकंदर चेहऱ्यावरून आणि रुबाबावरून वाटत होते. मी त्याला भीतभीतच विचारले,

'येथे 'भद्र' विभाग कुठं आहे ?'

तो थांबला. वेळ साडेदहाची होती. त्याच्या ऑफिसची वेळ झालेली असावी. माझा प्रश्न ऐकल्याबरोबर त्याने आपल्या मनगटावरील घड्याळात पाहिलं. मला वाटलं त्याच्या कपाळावर आता आठी उमटणार. पण तसं काही झालं नाही. आठीऐवजी त्याचा सारा चेहराच आनंदाने फुलला. हसत हसत तो म्हणाला,

'चला, मी दाखवितो !'

मी चाटच पडलो. आणि तो माणूस आमच्याबरोबर चालूही लागला. तो अगदी मनमोकळेपणाने आमच्याशी बोलत होता. राजकारणात त्याला फारसा रस नसावा. 'आम्ही सिंडिकेटच्या अधिवेशनाला आलो आहोत' असे सांगितले. परंतु त्याच्या चेहऱ्यावर त्याचा कसलाही परिणाम व फेरफार झाला नाही.

जवळजवळ पंधरा मिनिटे आमच्याबरोबर फिरून त्याने आम्हाला भद्रमध्ये सोडले, आणि नमस्कार करून तो गेला.

तो निघून गेला तरी त्याची आठवण अजून मनात आहे ! काही मिनिटांतीलच त्याची आमच्याशी झालेली अकृत्रिम आपुलकीची वागणूक. तसेच चेतना हॉटेलमधील जेवणाचा एक प्रसंग आठवतो. रात्री नऊला आम्ही थकून भुकेजून या हॉटेलमध्ये गेलो. दिवसभर मला खायला काही मिळालं नव्हतं. 'अल्सर' हा जीवश्चकंठश्च (जिवाशी आणि गळ्याशी सलगी करणारा !) मित्र माझ्याबरोबर असल्यामुळे त्याच्या हुकुमाव्यतिरिक्त मला इतर काही खाता येत नाही. अधिवेशनात त्याला आवडेल, चालेल असं काहीच दिवसभर खायला मिळालं नव्हतं.

चेतनामध्ये तरी आपल्याला चालेल असं काय मिळणार ? तिखट, आंबट, मसालेयुक्त सारंच आम्हांला वर्ज्य. आणि हॉटेलमध्ये आमची तशी बरदास्त कोण ठेवणार ? त्यातही हॉटेल बंद होण्याची वेळ. आम्ही पानावर बसलो. समोर ताट आलं. आणि त्याच्या मागोमाग भाज्या, चटण्या आणि कोशिंबिरींनी भरलेलं पंचपाळं घेऊन दुसरा माणूस आला. त्यातलं मला काहीच चालण्यासारखं नव्हतं. त्याने मी ताटावर धरलेल्या हाताकडे आश्चर्याने पाहिलं. 'मला तिखट, मसाले

वगैरेचं चालणार नाही. फक्त भात आणि साधं वरण घाला म्हणजे पुरे.' एवढं मी सांगितलं. 'पाच सात मिनिटं थांबा' असं तो म्हणाला आणि निघून गेला. आणि अक्षरशः दहा मिनिटांच्या आत त्यानं मला बिनतिखटाचं गरम गरम पिठलं, कोथिं-बीर आणि आलं लावलेलं ताक, केळ्याची शिकरण आणि पुरी असं माझं ताट सजवून आणलं आणि तो म्हणाला, 'साहेब, स्वस्थ होऊ द्या. तोवर बिनतिखटाची भाजी आणतो.'

—आणि त्याने मला खरोखरच एखाद्या स्वतःच्या नातेवाईकांप्रमाणे वागविले. एवढी आपुलकी आणि अगत्य मला इतर ठिकाणच्या हॉटेलात आजवर दिस-लेलं नाही.

म्हणून अहमदाबाद सोडताना माझं मन जड झालेलं होतं. गाडी मुंबईकडे धावत होती आणि मन मागे मागे रेंगाळत होतं. सकाळचे साडेसात वाजले होते. सूर्य उग-वून हातभर वर आलेला होता. पिवळी, कोवळी उनं आजूबाजूच्या पिकांवर पडली होती. ती ताजी, लुसलुशीत पिकं सकाळच्या ताज्या वाऱ्याबरोबर डोलत होती. आमच्या डब्यातली माणसंदेखील ताजी-प्रसन्न दिसत होती. तो आठ माणसांचा डबा होता. त्यातील व्यापारी, सरकारी वरिष्ठ नोकर आणि एक प्राध्यापक होता. कोणी कोणाशी फारसं बोलत नव्हतं. प्रत्येकाच्या हातात इंग्रजी वर्तमानपत्र होतं आणि तोंडात सिगारेट होती. गेले दोन तीन दिवस ज्या बातम्या घडताना आम्ही प्रत्यक्ष पाहिल्या होत्या, त्या बातम्या हे प्रवासी अगदी शांतपणे, थंडपणे वाचीत होते. चहा घेताना वर्तमानपत्र वाचणं आणि प्रवास करताना वर्तमानपत्र वाचणं या क्रियात इथं तंतोतंत साम्य होतं!

मी जोशीबुवांकडे पाहिलं. ते अस्वस्थ झाले होते, या पहिल्या वर्गाच्या डब्यात त्यांचा जीव गुदमरत होता हे उघड उघड त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होतं. कुणा-कडून काडी मागून आण, कुणाचं वर्तमानपत्र घे किंवा काही तरी संधी साधून कुणाशी तरी संभाषणाला तोंड फोड या त्यांच्या सहजस्वभावातील वृत्ती इथं गुदमरून गेल्या होत्या!

जोशीबुवांना मी म्हटलं,

'प्रवास कसा काय वाटतो?'

'या वर्गातून प्रवास करताना असं वाटतं की देशात काही प्रॉब्लेम्सच नाहीत. सारं कसं सुरळीत सुखात चालू आहे!'

मी डब्यातील इतर प्रवाशांकडं पाहिलं. सर्वांचे चेहरे निर्विकार होते. कुणालाही मराठी येत नव्हतं त्यामुळे जोशीबुवा सुरक्षित होते! थोड्या वेळात गाडीचा वेग कमी झाला आणि एका स्टेशनवर ती थांबली. वेटर आत आला, त्याला आम्ही ब्रेकफास्ट आणायला सांगितलं. दोन-तीन मिनिटात दोन प्रवासी या डब्यात आले. पण आमच्या कुपेत जागा नव्हती. ते पति-पत्नी असावेत. दोघंही तरुण, सुंदर

आणि गोरेपान होते. त्यांनी आपल्या हँडबॅग्ज आमच्या कुपेत ठेवल्या आणि गॅंगवे-मध्ये जाऊन ते उभे राहिले.

गाडी वेगात धावत होती. जोशीबुवा आणि मी नाइलाजाने एकमेकांशी बोलू लागलो. आमच्या बोलण्यात मोरारजी, निजलिंगप्पा, कामराज, तारकेश्वरी यांची नावे येऊ लागली तसे कुपेतील दोन प्रवासी जाग आल्यासारखे सावध झाले. त्यातला एक प्राध्यापक होता. दुसरा सरकारी नोकर होता. जोशीबुवांच्या चेहऱ्या-वर उत्साह फुलला, आणि ते जास्तच तावातावाने बोलू लागले. शेवटी परिणाम असा झाला की प्राध्यापकांना राहावले नाही आणि ते संभाषणात उतरले. त्यांनी इंग्रजीत विचारले,

'तुम्ही या अधिवेशनाला म्हणून खास आला होता काय?'

मी मान हलविली.

एखाद्या लहान मुलाकडे कौतुकाने पाहावं तसं त्यांनी आमच्याकडे पाहिलं. सावज पकडलं या आनंदात जोशीबुवांनी सिगारेट काढली आणि खिशात काड्याची पेटी असून जवळच्या सरकारी नोकराजवळ 'मॅचबॉक्स' मागितली! त्यानेच जोशीबुवांची सिगारेट पेटविली. त्याने विचारले,

'आपण जर्न्यालिस्ट आहात काय?'

'Not by profession' जोशीबुवा म्हणाले. 'आम्ही प्रथम जिज्ञासा म्हणून अधिवेशनाला आलो.'

'पण तुमची जबर निराशा झाली असेल नाही?' प्राध्यापकांनी विचारलं.

'का? निराशेचं कारण काय? अधिवेशन त्या लोकांच्या अपेक्षेपेक्षाही अधिक यशस्वी झालं!' मी म्हणालो.

'यश आणि अपयश गर्दीवरून मोजणं योग्य नव्हे!' प्राध्यापक.

'आपण म्हणता ते खरं आहे. पण इतर पक्षांच्या अधिवेशनाला तेवढीही गर्दी लाभत नाही. वार्षिक अधिवेशने केव्हा, कुठे सुरू होतात नि थांबतात तेही कळत नाही!'

'तरी पण गर्दी हे निकष असू नये!'

'लोकशाही राज्यपद्धतीत राजकीय पक्षांना आपल्या मागे-पुढे लोकांची गर्दी जमवावीच लागते. आपल्या आचार-विचारांना जनतेचा पाठिंबाच मिळवावा लागतो.' माझ्या बोलण्यावर प्राध्यापक विचार करू लागले असावेत. ते अंतर्मुख झाले आणि थोड्या वेळाने म्हणाले,

'आपला देश पुराणवस्तूंचं अजब प्रदर्शन आहे. आम्हाला जुन्याचा अतिशय अभिमान आहे आणि फॅशनपुरतं नव्याचं आकर्षण आहे!' सरकारी नोकर म्हणाले, 'कशावरून?'

'ही काँग्रेस आम्हाला प्रिय का वाटते तर ती सर्वात जुनी आहे म्हणून!' प्राध्यापकांनी उत्तर दिलं. बाकीचे दोन प्रवासी अजून गप्पच होते. वर्तमानपत्रे

चाळण्याचा त्यांना कंटाळा आला होता आणि आमच्या संभाषणातही त्यांना रस वाटत नसावा. बाहेर उभे असलेले दोन प्रवासी आमच्याकडे पाठी करून बाहेर बघत होते. नवऱ्याच्या अंगात निळा सूट होता आणि बायकोच्या निळाच पंजाबी ड्रेस होता. त्यांचा वर्ण अतिशय गोरा होता. आणि व्यक्तित्व शालीन होते. म्हणून त्या भडक (परंतु उंची) रंगाच्या कपड्यातही त्यांचे व्यक्तिमत्त्व आकर्षक वाटत होते.

गाडीचा वेग कमी होत होत ती आनंद स्टेशनवर थांबली. प्राध्यापक आणि सरकारी नोकर डायनिंग कारमध्ये गेले. कुपेत आमोरासामोर दोन जागा रिकाम्या झाल्या. बाहेरचे पति-पत्नी आत आले. समोरासमोर बसावं लागणार हे त्यांच्या लक्षात आलं. जोशीबुवा उठले. म्हणाले,

'मी तुम्हाला जागा देतो. पण ते लोक उतरून गेले नाहीत.'

त्या तरुणाने जोशीबुवांना जागचे जागी बसविले. पत्नीला तिथल्या रिकाम्या जागेवर बसायला सांगितले आणि स्वतः माझ्याजवळ येऊन बसत तो जोशीबुवांना म्हणाला,

'ते डायनिंग कारमध्ये गेलेले मला माहीत आहे. पण ते परत येईपर्यंत तेवढी विश्रांती व तुमचा सहवास!'

तो इंग्रजीत बोलत होता. परंतु त्याचं इंग्लिश इंडियन इंग्लिश वाटत नव्हतं. मी त्याला विचारलं,

'तुम्ही गुजरातमधलेच का?'

त्याने हसत हसत मान हलविली. मग म्हणाला,

'माझे आजोबा वडोद्याचे आहेत. माझे वडील दक्षिण आफ्रिकेत स्थायी झालेले आहेत. पंचवीस वर्षांपूर्वी माझा जन्मही तिथंच झाला!'

'तुम्ही इथं आजोबाजवळ असता की काय?'

'नाही. बारा वर्षांनंतर मी भारतात माझ्या बायकोला घेऊन सर्व नातेवाइकांच्या भेटीसाठी आलो आहे. आम्ही आफ्रिकेतच असतो.'

'आता कुठं निघाला?'

'आज मुंबईला जातोय. महिनाभर असा दौरा करणार. दिल्ली, कलकत्ता, मद्रास, हैद्राबाद, काश्मीर वगैरे.'

'छान छान. मग काल परवा तुम्ही अहमदाबादेत होता काय?'

'नाही.'

'पण तिथं काँग्रेसचं अधिवेशन झालं ते पाहण्याची संधी का नाही घेतली?'

तो हसला. हसण्यात कसलेही भाव नव्हते सहजता होती. मग म्हणाला,

'वर्तमानपत्रांतून वाचायला मिळतं ना सारं. प्रत्यक्ष एवढ्या गर्दीत जाऊन काय पाहायचं?'

' साहजिकच आहे. तुम्हाला भारतीय राजकारणाविषयी विशेष ओढ नसणारच.' मी म्हणालो.

' असं नाही. ओढ का असू नये. मी तिकडे राहत असलो तरी आम्ही इंडियन्स म्हणूनच तिकडे राहतो आणि ओळखले जातो. माझा जन्म जरी तिकडे झाला. आणि वास्तव्य तिथेच आहे तरी इकडची ओढ आहेच ना ? अमेरिकेला न जाता सुटी काढून आम्ही इकडे भारतातच नाही का आलो ?' त्याने आपल्या बायकोकडे पाहिलं. तीही अनुमतिदर्शक हसली.

मला त्या जोडप्याविषयी अधिक कुतूहल आणि आकर्षण वाटू लागलं. मी त्याला विचारलं,

' इंडियन आहात म्हणून विचारतो. रागावू नका. तुमची जात कोणती ?'

' हत् तिच्या ! यात रागवायचं काय ? जातीयवाद न आणता आपली जात सांगणं किंवा तिचा जास्त अभिमान धरणं हा गुन्हा थोडाच आहे ?'

' तसं नाही. आमच्या देशात अठरा पगड जाती आणि शंभर पगड जातीयवाद आहे. अगदी नोकऱ्यात, लष्करात आणि राजकारात देखील !'

' आर्थिक विषमतेमुळे जातीयवाद भीषण वाटतो एवढेच !' तो स्वत:शीच बोलावे इतक्या सहजपणे म्हणाला, पुढे थोडा वेळ थांबून तो सांगू लागला,

' आम्ही मुसलमान परंतु आम्हाला उर्दू भाषा येत नाही ! आणि तिकडे आफ्रिकेत मुसलमान असा, मारवाडी असा तुम्हाला फक्त इंडियन म्हणून ओळखतात. कुठलाही फॉर्म भरायचा असेल किंवा स्वत:विषयी माहिती द्यावयाची असेल तर ती फक्त ' इंडियन ' एवढी द्यावी लागते आणि पुरते.'

' नागरिक म्हणून तुम्हाला तिथं काय सुखसोयी मिळतात ?'

' नागरिक म्हणून आम्हाला तिकडे बऱ्याच सुखसोयी आहेत. परंतु नागरिकत्वाचं खरं भूषण जो मतदानाचा हक्क तो आम्हाला नाही !'

' कमाल आहे नाही ? हा अन्याय आहे !'

' अन्याय तर खराच. तिथं आम्हांला तिय्यम दर्जाचे नागरिक समजतात. पहिले गोरे, दुसरे निमगोरे आणि तिसरे ब्लॅक ! आम्ही ब्लॅकमध्ये मोडतो.'

' मग त्या मानाने भारत देश आदर्श मानावा लागेल नाही ?'

' तत्त्व आदर्श आहेत, पण प्रत्यक्षात आफ्रिकेतील राजवटीपेक्षाही इथली राजवट आणि राजकीय विचारसरणी निकृष्ट आहे !'

' ते कसं काय ?' मी आश्चर्य वाटून विचारलं.

' भारतात सर्व जाती, जमातींच्या आणि वर्णांच्या लोकांना मतदानाचा हक्क आहे ही चांगली गोष्ट आहे, पण मतदान नि:पक्षपाती होत नाही. मुसलमानासाठी मुसलमान, मारवाड्यासाठी मारवाडी, मागासलेल्या जमातीसाठी त्यांचा प्रतिनिधी असे उमेदवार उभे करतात ही लोकशाही पद्धतीची विटंबना आहे. यामुळे वैमनस्य

वाढते आणि नालायक लोकांची वर्णी लागते.'

गाडी मुंबईकडे धावत होती. हिवाळ्यातलं पिवळं ऊन बाहेर नाचत होतं. सपाट जमीन शेवटी क्षितिजाला जाऊन भिडली होती. मध्ये एकही डोंगर आडवा नव्हता. हिरवी गच्च झाडी, हिरवीगार शेते मात्र डावी-उजवीकडे दिसत होती. खिडकीवाटे बाहेर पाहत मित्र म्हणाला,

'इथं मला पडीक जमिनीचा एकही तुकडा दिसत नाही! आफ्रिकेत एवढ्या जमिनीचं काय करावं असा प्रश्न पडतो. लोक खाऊन-पिऊन सुखी आहेत. सरकारचा उद्योग-धंद्यांना पाठिंबा असतो, त्यामुळे समृद्धी आहे. या देशात मुख्य प्रश्न दोन आहेत असं मला वाटतं!'

मी त्याच्याकडे पाहिलं. तो पुढे म्हणाला,

'एक दारिद्र्याचा आणि दुसरा अज्ञानाचा.'

'अगदी बरोबर आहे.'

'या देशात लोकांना सक्तिचं शिक्षण आहे खरं, पण वाचनाची, ज्ञान मिळवण्याची मुळीच आवड, ओढ नाही. गेले पंधरा दिवस मी निरनिराळ्या कुटुंबांकडे या दृष्टीने पाहात आहे. साधी ललितवाङ्मय वाचायची आवड नाही, तर वैचारिक साहित्य तर दूरच.'

'ते खरं आहे'

'अहो, लोकशाही देशात तर नागरिक विचारवंतच असावा लागतो. मला हसू येतं, तुमच्या पंतप्रधान समाजवादाच्या घोषणा करीत आहेत, पण समाजवाद म्हणजे काय ? हे या देशातील किती लोकांना माहीत आहे?'

'हेच या देशाचं वैशिष्ट्य आहे!' मी उत्तरलो.

'आता हेच पाहा काँग्रेस पक्ष हा या देशातील सर्वात जुना पक्ष. तसाच देशव्यापी, सर्वात मोठा पक्ष. केवढ्या अनुभवाचं पाठबळ या पक्षाला आहे. हा पक्ष कालपर्यंत एक होता. राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीचा फार्स काय होतो आणि एका रात्रीत पक्ष दुभंगतो. ही काय राजकीय विचारसरणी झाली, का आपल्यावर असलेल्या मोठ्या जबाबदारीचं प्रतिपालन झालं ? माझ्या दृष्टीनं तर हा पोरकटपणा चालला आहे' पाहुण्याला सात्त्विक संताप आला होता. तो संतापला होता तरी त्याचं म्हणणं बरोबर होतं.

सिंडिकेटपक्षाची कालची बेजबाबदार वागणूक अजून ताजी होती. जनतेविषयी यांना काय आस्था आहे हे दिसून आलं होतं. लाखो लोकांच्या साक्षीनं यांनी काय प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला होता तर इंडिकेटचे लोक कसे स्वार्थी आहेत, बेजबाबदार आहेत, मूर्ख आहेत हेच.

जनतेच्या कल्याणाची, या देशाचं भलं व्हावं याची तळमळ एकाही नेत्याच्या बोलण्यातून अथवा वागण्यातून दिसत नव्हती.

—आणि आता हे इंडिकेटचं अधिवेशन ! मुंबईसारख्या भव्य शहरात साजरं होणारं. श्रीमंत शहरात साजरं होणारं गरिबांच्या कैवाऱ्यांचं भव्य अधिवेशन !

आमची गाडी दादरला थांबली. आम्ही खाली उतरलो. स्टेशनबाहेर पडलो तेव्हा सडकेच्या दुतर्फा लोकांची तुफान गर्दी जमा झाली होती. ७३ व्या काँग्रेस अधिवेशनाच्या (इंडिकेट) नियोजित अध्यक्षांची मिरवणूक निघणार होती. जगजीवन बाबू गाडीने येणार होते. अवघ्या अर्धा-पाऊण तासाचा अवधी होता. दुपारचे तीन वाजले होते. डिसेंबर महिना असला तरी ऊन जाळीत होतं. परंतु भर उन्हात मुंबईतील मराठी माणूस रस्त्याच्या दुतर्फा उभा होता.

अहमदाबादच्या माणसापेक्षा हा माणूस चटपटीत होता. चलाख दिसत होता. त्याचे डोळे भावूक दिसण्याऐवजी मिस्किल दिसत होते. नेहरूंच्या व्याख्यानाला जमणाऱ्या गर्दीच्या तोंडवळ्यांचा मी अभ्यास केला होता. ते भाव आणि हे भाव यात जमीनअस्मानाचा फरक मला जाणवत होता !

महाराष्ट्रातील निरनिराळ्या जिल्ह्यातून, खेड्यातून मागविलेल्या ट्रक्स सजून, नटून-थटून रस्त्याने धावत होत्या. पाटण, कऱ्हाड, सातारा या भागातून आलेल्या ट्रक्सची संख्या अधिक दिसत होती. यशवंतराव चव्हाण आणि बाळासाहेब देसाई यांचे हे वैभव व हुकमतीचं प्रदर्शन भरल्याचा भास होत होता. ट्रक्समधून भजनी मंडळींचा ताफा, पहिलवानांचा ऐटबाज फड, झोपड्यातील जीवनाची निरनिराळी दृश्ये, तमाशाचे फड असे नाना प्रकारचे चमत्कार रस्त्यावरून मिरवले जात होते. मध्येच लालबहादूर शास्त्री, पंडित नेहरू आणि इंदिराजींच्या नावाचा जयजयकार होत होता.

मला ते सारं चित्र मुंबई शहराला विसंगत असं वाटत होतं. आधुनिक वस्त्राला जुन्या पैठणीची ठिगळे द्यावीत तसे मुंबईतील नव्या, सळसळत्या जीवनाला जुन्या जीर्ण संस्कृतीची ठिगळे जोडली जात आहेत असं वाटत होतं. हा विचित्र विचार माझ्या मनाला पोखरीत होता. अस्वस्थ करीत होता, उदास करीत होता....

तेवढ्यात 'बाबू जगजीवनराम आले'ची कुजबुज जमावात सुरू झाली. मंद गतीनं ज्या ट्रक्स जात होत्या त्यांचा वेग वाढला. आणि हजारो लोकांच्या माना किंग्जसर्कलच्या दिशेकडे वळल्या.

दोन-तीन मिनिटातच बाबूजी त्यांच्यासाठी खास सजविलेल्या गाडीत बसणार होते आणि मिरवणूक थाटामाटात सुरू होणार होती.

एकाएकी एडवर्ड केनेडींची आठवण झाली. काही महिन्यांपूर्वी त्यांच्या आयुष्यात एक दुर्दैवी घटना घडली आणि त्यांना राजकीय जीवनाचा संन्यास घ्यावा लागला. परंतु इकडे बाबूजींनी दहा वर्षांचा प्राप्तीकर चुकविला आणि आज त्यांना नव्या काँग्रेसचे अध्यक्षपद मिळाले !

□ □ □

# एक दिवस

**भारताचे पहिल्या क्रमांकाचे टेस्ट पायलट ग्रुप कॅप्टन सुरंजन दास ह्यांना हिंदुस्थान फायटर–२४ ह्या विमानाची चाचणी घेत असताना ११ जानेवारी ७० रोजी बंगलोरच्या धावपट्टीवर अपघाताने मृत्यू आला. ह्या थोर वैमानिकास मरणोत्तर पद्मविभूषण हा सन्मान देऊन राष्ट्राने आपली कृतज्ञता व्यक्त केली आहे.**
**फिल्मस् डिव्हिजनच्या विमानदलावरील डॉक्युमेंटरीच्या निमित्ताने प्रभाकर पेंढारकर यांना ग्रुप कॅप्टन दास ह्यांच्याबरोबर एक दिवस काम करण्याची संधी लाभली. त्या दिवसाचे हे शब्दांकन !**

स्क्वॉड्रन लिडर फोन्सेका घामाघूम झाले होते. त्यांच्याबरोबरचे दोन पायलट ऑफिसर्सही तितकेच थकले होते. घड्याळाचा काटा पुढे सरकत होता तशी त्या तिघांची अस्वस्थता वाढत होती....

...पण हे लिहिण्यापूर्वी मला थोडं स्पष्टीकरण केलं पाहिजे. हा काही भारत–

पाक संघर्षाच्या वेळी सीमेवर घडलेला समरप्रसंग नाही. हे फोन्सेका आणि त्यांच्या-बरोबरचे पायलट ऑफिसर काही एखाद्या फायटर–बाँबर विमानातून शत्रूच्या प्रदेशावर हल्ला करायला निघालेले नव्हते. आम्ही तसे अगदी सुरक्षित जागी उभे होतो. फार काय धावपळ करून, किंवा भीतीने वा काळजीने घसा कोरडा पडला तर थंडगार कोकाकोला अथवा ऑरेंज घ्यायला समोरच कँटीन होते.

हिंदुस्थान एरोनॉटीकल लिमिटेड, बंगलोर येथे विमानतळाच्या कँटीनसमोर आम्ही म्हणजे मी, कॅमेरामन श्री. जयेंद्र देसाई आणि त्यांचा साहायक गंगाधर उभे होतो.

समोरच्या विमानतळावर आणि हँगरमध्ये कॅनबेरा, हंटर, नॅट, एच्. एफ्. २४, विमाने उभी होती. काहींची दुरुस्ती चालली होती. काहींची तपासणी ! फोन्सेका, आणि त्यांच्याबरोबरचे दोघे अधिकारी एका विमानापासून दुसऱ्या विमानाकडे धावत होते, चौकशी करत होते, घड्याळाकडे पाहत होते, आणि स्वतःवरच चिडत होते.

घाम पुसत फोन्सेका माझ्याजवळ आले. मी त्यांना विचारले, "थकलात, कोल्ड्रिंक घेऊ या का ?"

"नको ! ९ वाजून गेलेत. ग्रूप–कॅप्टन दासनी नऊची वेळ दिली होती. पण तेच कुठं सापडत नाहीत. त्यांच्या ऑफिसात पाहिलं, हँगरमध्ये शोधलं, विमान-तळाला चक्कर मारली. उशीर झाला तर दोष माझ्यावर यायचा !"

इतक्यात पायलट ऑफिसर राव आमच्याकडे आला. फोन्सेकांना सॅल्यूट करून त्याने सांगितले, "ग्रूपींच्या घरी फोन केला होता."

"मग–?"

"ते तेथेही नाहीत. त्यांच्या पत्नी म्हणाल्या, कँटीनमध्ये पाहिले का ?"

"कँटीनमध्ये–?"

फोन्सेकाबरोबर मी व देसाई कँटीनमध्ये गेलो.

दरवाज्याजवळच, खाकी पँट व सफेद शर्टातले एक गृहस्थ चहा पीत बसले होते. त्यांना पाहताच फोन्सेकांनी एकदम 'अटेन्शन' करून सॅल्यूट ठोकला.

मिश्कील हसत ते गृहस्थ म्हणाले, "सीट डाऊन फोन्सेका, हॅव अ कप ऑफ टी !"

ह्या गृहस्थांना मी मघाशीच पाहिले होते. फोन्सेका हँगरमध्ये चौकशी करण्या-करिता गेले होते त्या वेळी हे गृहस्थ कँटीनच्या दारात आमच्यासमोरच उभे होते. तेव्हा मला पुसटशीही शंका आली नाही की भारताच्या विमानदलाचे पहिल्या क्रमांकाचे टेस्ट–पायलट ग्रूप कॅप्टन दास ते हेच !

फोन्सेकांनी आमची ओळख करून दिली. चहा आला. गप्पा सुरू झाल्या. विमानदलाचा एवढा मोठा अधिकारी, अधिकाऱ्याच्या रुबाबदार युनिफॉर्ममध्ये तर

नव्हताच, पण चेहऱ्यावरही कोठे सेनादलातील उग्र गांभीर्य नव्हते.

नुकतेच दुरुस्त केलेले विमान घेऊन त्याच्या चाचणीसाठी आकाशात उड्डाण घ्यायचे ! हे विमान दुरुस्त झाले नसले तर, कोठे काही चूक राहिली तर, नव्यानेच काही बिघाड झाला तर,–अशी कितीतरी विमाने कोसळतात–ही मानाची, तितक्याच जोखमीची कामगिरी इतके वर्षे यशस्वीपणे पेलणाऱ्या अधिकाऱ्याच्या चेहऱ्यावर ती जोखीम, जबाबदारी आणि त्याने निर्माण झालेल्या काळजीच्या अस्पष्टशाही खाणाखुणा दिसत नव्हत्या.

बंगलोरच्या विमानदलाच्या टेक्नीकल कॉलेजावर निघणाऱ्या डॉक्युमेंटरीकरिता आम्हाला काही विमानांचे शॉटस् घ्यायचे होते.

पहिला वेळ गेला तो गेला. पण ग्रूप कॅप्टन दासनी सर्व व्यवस्था चोख करून ठेवली होती. आमच्यासाठी एक स्टेशनवॅगन तयार ठेवली होती. त्यात ट्रॅन्समिटिंग वायरलेस सेट होता. त्यावरून आम्हांला वैमानिकांना सूचना देण्याची सोय होती. वैमानिक पोशाख चढवून तयार होते. त्यांची विमानेही सज्ज होती.

जाता जाता डाव्या बाजूस उभ्या असलेल्या एच्. एफ्. २४ कडे माझे लक्ष गेले. मी कॅप्टन दासना विचारले,

" ह्याचाही आम्हांला शॉट घ्यायचा होता. "

दास मिश्कील हासले, म्हणाले, " अवश्य, पण एवढ्यात नाही. हे विमान अद्याप प्रयोगावस्थेत आहे. आणखीन काही दिवस जावे लागतील. " हे भारतात तयार झालेले पहिले फायटर–बॉंबर विमान ! हे उडवण्याचा पहिला मान श्री. दासनाच दिला गेला होता. ते सुपरसॉनिक करण्याच्या दृष्टीने काही प्रयोग चालू असल्याचे मी ऐकले होते. त्याचा शॉट घेता घेणार नाही हे समजल्याने मी जरासा नाराजच झालो.

शुटिंगकरिता पहिले विमान तयार ठेवले होते–नॅट ! छोटेसे, देखणे, इतर विमानांपुढे खेळण्यांतले वाटावे इतके लहान ! पण ह्या छोट्याशा विमानांनी पाकिस्तानची सेबरजेट विमाने लोळवली होती.

देसाईंनी धावपट्टीच्या जवळच कॅमेरा ठेवला. गंगाधरने मीटर रीडिंग घेतले, आणि ॲपरचर ठेवून, ' तयार ' म्हणून मला सांगितले.

दास म्हणाले, " रनवेच्या इतक्याजवळ कॅमेरा ठेवू नका. "

" का, धोक्याचं आहे ?" देसाईंनी विचारले.

" नाही, धोक्याचं नाही. पण तुम्हांला इतक्या जवळून विमानाला फॉलो करता यायचं नाही. " दास म्हणाले.

" पाहू. " देसाई आत्मविश्वासाने म्हणाले.

दास परत मिश्कील हसले, म्हणाले, " ऑल राईट. "

वायरलेसवरून दासनी पायलटला ' स्टार्ट ' म्हणून आज्ञा दिली. कॅमेरा चालू

झाला. फिल्म धावू लागली. आमचे डोळे धावपट्टीवर खिळले. विमानाच्या आवाजाने कान बधीर झाले. दुरून विमान येताना दिसू लागले त्याच्याबरोबर कॅमेरा फिरू लागला आणि क्षणार्धांत विमानाने जमीन सोडली. बंदुकीच्या गोळीचा वेग फिका पडावा अशी विमानाने आकाशाकडे झेप घेतली. जमिनीशी जवळ जवळ काटकोन करून मिनिटाला १० मैल या वेगाने ते आकाशात घुसले. गतीची एक धुंदी असते. विमानात न बसताही ती आम्हांला चढली. पाहता पाहता शुभ्र ढगाच्या पार्श्वभूमीवर एका छोट्याशा ठिपक्यासारखे ते दिसू लागले आणि मग तो ठिपकाही अनंत आकाशात अदृश्य झाला.

डोक्यावरचं काळं कापड बाजूस करून, भांबावलेले देसाई आकाशात विमान शोधत होते.

" कॅमेऱ्याच्या समांतर रेषेत येईपर्यंत मला विमान दिसलं आणि पुढं ते कुठं गेलं समजलंच नाही !"

मी म्हणालो, " आता ह्या शॉटचा रिटेक कसा घेता येईल ?" दास म्हणाले, " घेता येईल. तुम्ही कॅमेरा थोडा मागे घ्या. मी पायलटला सांगतो !"

देसाईंनी कॅमेऱ्याची जागा बदलली. दासनी वायरलेसवरून वैमानिकाला सूचना दिली.

पाहता पाहता विमान वळसा घेऊन खाली खाली येऊ लागले. जमिनीला भिडले, कॅमेऱ्यापर्यंत धावपट्टीवरून धावले आणि त्याने फिरून आकाशात झेप घेतली. ह्या झेपेस देसाईंनी त्याला बरोबर पकडले.

त्यानंतर हंटर ! ह्या विमानाचा रंग, नावाप्रमाणे खाकी आहे, नॅटपेक्षा थोडेसे मोठे. नॅट बंदूकीची गोळी तर हंटर म्हणजे लहानशा तोफेचा धगधगता गोळाच !

कॅनबेरा फायटर बॉम्बर विमान आहे. सहाजिकच ह्याचा आकार मोठा ! रोराघत ते आले आणि आमच्या डोक्यावरून निघून गेले.

आम्ही तिघेही स्तिमित होऊन पाहत होतो. दासच्या चेहऱ्यावर नेहमीचा मिस्कील भाव होता. ते आम्हांला पाहत होते. हा अफाट वेगाची विमाने हा माणूस लीलया उडवतो. सहजतेने, निर्भयतेने !—येथे सेकंदाची चूक मैलांचा फरक पाडते. थोडासा चुकीचा अंदाज, क्षणाचे दुर्लक्ष, विमानावाचून वैमानिकाला स्वर्गाची कायमची वाट दाखवते. ह्या वैमानिकांची कामगिरी जोखमीची असते हे ऐकले होते, पण ती जोखीम प्रत्यक्षात पाहिली तसे अंगावर शहारे आले.

ही विमाने, ते चालवणारे धाडसी वैमानिक, ती सुसज्ज ठेवणारे कुशल तंत्रज्ञ ह्या सर्वांकडे पाहताना आता आमच्या नजरेत कौतुकाबरोबर आदर मिसळत होता. आपल्या देशाच्या सीमा स्वतःच्या प्राणांची बाजी लावून सुरक्षित ठेवणारे जवान ! विज्ञानाने त्यांना दिलेली ही प्रगत शस्त्रे ! अफाट विध्वंसनाची शक्ती असलेली, गावेच्या गावे बेचिराख करणारी, अनेकांचे प्राण क्षणात घेणारी !

मनात आले, आपली विमाने म्हणून आपण त्यांकडे कौतुकाने पाहतो आहोत. पण जर अशीच विमाने आपल्या प्रदेशावर घोंघावत आली तर–! खेडी, शहरे, घरे, दवाखाने, शाळा ह्यांवर बॉम्ब पडत आहेत. काही वेळापूर्वी बागडणारी मुले– आता त्यांचे छिन्न विछिन्न देह माडीवर घेऊन माता आक्रोश करत आहेत. आसऱ्या-पर्यंत वेळेत पोहोचू न शकलेल्या देहांची चाळण झालेली आहे. ह्यात कुणाचे वृद्ध आई वडील आहेत. पत्नी, मुले आहेत.

फिरून धोक्याचा भोंगा वाजतो, दुसऱ्यांदा विमाने येतात. आता माणसे आसऱ्यासाठी धावत नाहीत. पळून, आडोसा घेऊन वाचविण्याजोगे त्यांच्याकडे काही उरलेलेच नसते. ज्यांच्यासाठी जगावे असे कोणी शिल्लक उरलेले नसते. ती माणसे अशा विमानाकडं कशी पाहत असतील ?

काम संपवून आम्ही परत निघालो. देसाई आणि गंगाधर कॅमेरा बंद करून पेटीत ठेवत होते. स्टेशनवॅगनच्या सावलीत सिगरेट ओढत दास उभे होते. मी त्यांच्याजवळ गेलो. राहवेना म्हणून मनात आलेले विचार मी त्यांच्याजवळ बोलून टाकले.

दास शांतच होते. म्हणाले, " खरं आहे. अलीकडचं युद्ध असंच असतं ! अमानुष, निर्दय आणि विध्वंसक ! ते वाईट तर खरंच पण ते जेव्हा एखाद्यावर लादलं जातं तेव्हा आपल्या देशातील मुले, स्त्रिया, नागरिक जगावेत म्हणून काहींना मारावे लागते, मारता मारता स्वत: मरावे लागते–! युद्ध हा माणुसकीला शाप आहे. पण गुलामगिरीपेक्षा तो पत्करण्याजोगा आहे. मृत्यू हा भयानक खरा, पण देशाच्या स्वातंत्र्याचे मोल मृत्यूपेक्षा फार फार मोठे आहे ! खरं ना ?"

बोलण्याजोगे काही राहिलेच नव्हते. अगोदरच आदराने मान झुकली होती. क्षणभर गंभीर झालेले दास सिगरेट विझवत म्हणाले, " चला निघू या !" आम्ही चालू लागलो. मृत्यूशी रोजच खेळणाऱ्या आणि देशासाठी प्राणावरील जोखमीची जबाबदारी उचलणाऱ्या ह्या गृहस्थाच्या चेहऱ्यावरील स्मित आता मला वेगळाच दिलासा देत होते.

**मंगला कुलकर्णी**



**दरवाजा उघडल्याचा आवाज येतो...
कुणीतरी आल्याची चाहूल जवळ येते...
मग एक मंद आवाज—
‘अरे, तिथं अंधारात काय बसला
आहेस भुतासारखा !**

# संध्याकाळ

संध्याकाळ होऊन गेली आहे. आकाशाच्या कोपऱ्यातून अंधार भरतो आहे. रस्त्यावरचे दिवे लागले आहेत. फाटकाच्या बाजला असलेल्या खांबावरचा दिवा पानांच्या मागे लपला गेला आहे. आणि त्याची पानांआडून डोकावणारी किरणे एखाद्या जाळ्यासारखी एकमेकांत मिसळताहेत. वारा वाहतो आहे. मंद आणि गार! चहू बाजूला शांतता आहे.

काही वर्षांपूर्वी, जेव्हा मी इथेच शिकायला होतो, तेव्हा सगळ्या संध्याकाळ अशाच व्हरांड्यात बसून जायच्या. रस्त्यावरून वाहनं जात असायची, आणि मी

गुपचूप, एका खुर्चीवर बसून ते पाहत राहायचा. घरांतून निरनिराळे आवाज येत असायचे...मध्येच केव्हातरी येऊन आई म्हणायची,

"अरे, इथं अंधारात काय बसला आहेस भुतासारखा !.. जरा बाहेरून फिरून ये, कंटाळा आला असला तर !..."

—अगदी हळूच एक कार फाटकासमोर येऊन थांबते...कुणीतरी उतरलं... दरवाजा बंद करण्याचा आवाज...कार पुढे सरकल्याचा आवाज...फाटक उघडण्याचा, बंद करण्याचा...आणि पायऱ्यांवर कुणाच्या तरी पावलांचा गंभीर आवाज...

..."काका नमस्ते !...मिनी आहे ?"

—एक बारीक आवाज माझ्या कानांना स्पर्श करतो. मी हात पुढे करून दिवा लावतो.

"...अरे...तुम्ही !..."—वर्षा चकीत होते. "तुम्ही केव्हा...

मी...मला...

—"मी कालच इथं आलोय..."—मी जरा थांबून बोलतो.

"घरांत मिनी नाही...,आणि काकाजी नाहीत !"

—थोडा वेळ शान्तता. मी एक चोरटी नजर तिच्यावर टाकतो...तिची साडी जमिनीला स्पर्श करते आहे. तिच्या उजव्या हातात एक पुडकं आणि पुस्तकं घट्ट धरली आहेत. तिचे कोरडे केस उडताहेत.

..."माझ्या तीन पत्रांचं उत्तर का पाठवलं नाही, याचं उत्तर मिळेल का ?"—ती पाठ खांबाला टेकवून, एक पाय सैल सोडून, हात छातीशी दूमडून उभी आहे.

—मी गप्पच राहतो. वाटतं, असं काही ऐकण्याची अपेक्षा होती ?

..."इतक्या दिवसांनंतर घरची आठवण आली ?" —काहीसं थांबून ती पुन्हा विचारते.

...सगळ्यांच्या माझ्याबद्दल काही ना काही तक्रारी आहेत. पण मी स्पष्टीकरण देणं सोडलं आहे. मी जसा आहे, ज्या स्थितीत आहे. बस ! त्या वरून मला समजायचं असलं तर समजा, आपणहून समजा !...मी कुणापुढे व्याख्यान करायला जाणार नाही. माझ्याजवळ रंगीबेरंगी शब्द नाहीत. उद्या आणि परवाची रंगीत स्वप्नं नाहीत. जे आहे, जसं आहे, हेच आज...सपाट आणि कोरडं...!

— पण मी काहीच बोलत नाही

..."किती राहणार आहात ?"—काहीसं थांबून ती विचारते.

"उद्या जाणार आहे...एक इन्टरव्हू आहे...!

—पण मी पुढं बोलायच्या आतच माझं वाक्य तोडून ती बोलते,

"तीस–पस्तीस तासांसाठी येण्याची तरी काय जरुरी होती !"

—आणि दुसरीकडे पाहत पदराचे टोक बोटाला गुंडाळीत, ते भराभर सोडते.

..."हो ! तशी फारशी जरूरी नव्हती ..."—इच्छा नसतानासुद्धा तोंडातून फडवट वाक्य जातंच !

—मग वाटतं, असं बोलायला नको होतं ! तिला वाईट वाटेल ? ...तिला वाईट वाटलं तर मला काय मिळेल ?...

—वाढत्या विचारांना जागच्या जागीच दाबून टाकतो.

"बस ना ! ...उभी का...!"

..."जरा आत जाऊन येते...! —" ती दरवाज्याकडे वळते.

..."घरांत कुणी नाही..."—मी जरा थांबून बोलतो.

"इथं मी एकटाच आहे."

ती एक वेधक दृष्टी माझ्यावर टाकते, नी पूर्ववत खांबाला टेकून उभी राहते... हात छातीशी बांधून...वाऱ्याने उडणाऱ्या केसांच्या बटा न सावरता...

"थंडी किती आहे ! स्वेटर नाही आणलास ?"—तिला गप्प पाहून मी बोलतो.

"मिनीचा स्वेटर वगैरे आणू का ?..."

..."थँक्यू ! मला तेवढी थंडी जाणवत नाही...!"

"ओ...हो !"

—काही वेळ शांतता !...समजत नाही, ही इथं का थांबली आहे ?...जर तिला वाटत असलं, मी काही बोलेन, तर ती तिची चूक आहे. माझ्या मागच्या वागणुकीवरून तिला समजायला हवं, की इथं आता तशी कमकुवतता नाही... आणि जर असलीच तर नाइलाजाच्या सावल्यांखाली ती लपली आहे...

.. जसं, नव्या वर्षाच्या सुरुवातीला, उंच, दाट झाडांनी वेढलेला तो नाजूक लांब रस्ता, सुकलेल्या पिवळ्या पानांखाली झाकला जायचा...पण आम्ही चालायचो, तेव्हा पायांखाली पानांच्या कुजबुजण्याचा बारीक आवाज निघायचा...

..."एक विचारू ?"—ती दुसरीकडे पाहते आहे.

..."काय ?"

"जर मी इथं आता आले नसते, तर तुम्ही जाण्यापूर्वी मला भेटला असतात...?"

आता ती माझ्याकडे पाहते आहे...साडीचा पदर हळूहळू थरथरायला लागला आहे,..किती लांब आहे तो...जमिनीपर्यंत पोहोचणारा !...काठावर रंगीत वेल-बुट्टी आहे...वेडीवाकडी...

..."सांगा ना !"—आवाज उंचसा आणि दृष्टी उद्धट.

—"वर्षा, मला तुला दुखवायचं नाही...तू मोठ्याघरची मुलगी आहेस... सुखात वाढलेली...जर उद्या..."

—थांबत थांबत बोलताना मी अडखळतो.

"सांगा...थांबलात का ?"

..."या क्षणी माझं भवितव्य अगदी अनिश्चित आहे...कदाचित..., एक वर्ष-पर्यंत...कदाचित, ..मी काही करू शकलो नाही...!...मग तुला अडचणीत टाकण्याचा मला काय अधिकार आहे ?...शिवाय...माझ्यावर आणखीही काही

जबाबदाऱ्या आहेत...स्वत:बद्दल काही विचार करण्याची किंवा निर्णय घेण्याची वेळ आलेली नाही."

—खाली पाहात मी दोन्ही हातांची बोटं एकमेकात गुंतवतो.

...काही वेळ शांतता राहते...मधेच वाऱ्याचा एखादा झोत अंगावर शहारा आणतो.

—मला वाटतं, तिचे ओठ कापताहेत. पण ती काहीच बोलत नाही. एकदा आपले विखुरलेले केस सावरते आणि पुन्हा बांधते.

—साडीच्या खाली तिच्या मखमली चपलांचा एक पट्टा दिसतो आहे.... गारव्याने ती शहारते —

..."तुझ्यासाठी कॉफी बनवतो..."

—ती हळूच मान हलवते. मी आत जातो.

...पाणी भांड्यात घेऊन गॅस पेटवतो. पाण्यात छोटया छोटया लाटा निघताहेत...जाळीदार कपाटातून दूध काढून ठेवतो...कपाच्या गुलाबी कडा...मला असले गुलाबी कप आवडत नाहीत.. कधी कधी त्यांच्या वरच्या गोलाईवर ओठ टेकता टेकता वाटतं...चहा बरोबर हे गुलाबीपणसुद्धा तोंडात जाईल...कसा बरं असेल रंगांचा वास ..!

—कप घेऊन बाहेर येतो. त्यांच्यातून गरम वाफ येते आहे....कॉफीचा रंग चांगला दिसतो आहे...कॉफी चांगली झाली असली तर ती नक्की काहीतरी बोलेल. कप घेतानासुद्धा आपल्या नेहमीच्या संवयीप्रमाणे बोलेल,...थँक्यू !'

...आणि मी काहीच उत्तर दिलं नाही, तर...

एका हाताने पडदा सारीत मी व्हरांड्यात येतो.

—तिथं कोणी नाही !

व्हरांड्याच्या टोकाशी जाऊन फाटकाकडे पाहतो...फाटक बंद आहे. रस्त्यावर अजीबात रहदारी नाही ..डाव्या बाजूला खांबावर दिवा मिणमिणतो आहे... झाडाची सावली फाटकावर लांब झाली आहे

—मी हळूच कप टेबलावर ठेवतो, तरीही आवाज येतोच. कपातून अजूनही वाफ येते आहे.

—खुर्चीवर बसून हातांवर हनुवटी ठेवतो. तळवे गरम झालेत. व्हरांड्यापासून फाटकापर्यंतची जमीनसुद्धा मघासारखीच आहे...मखमली चपलांची कुठेच काही खूण नाही.

मी खांबाकडे पाहतो. इथेच काही वेळा पूर्वी ती उभी होती...एका बाजुला झुकलेली...हात छातीशी बांधलेले...आणि कोरड्या केसांच्या बटा कपाळावर...

—दरवाजा उघडल्याचा आवाज येतो. कुणीतरी आल्याची चाहूल हळूहळू जवळ येते....मग एक मंद आवाज येतो,

"अरे, तिथं अंधारात काय बसला आहेस ? भुतासारखा !" ◻ ◻ ◻



# २६ फेब्रुवारी

## स्वा. सावरकरांचा आत्मार्पण दिवस

**सौ. निर्मला वैद्य**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर काही नवे उपक्रम सुरू झाले. कै. मामा वरेरकर हे आकाशवाणीवर प्रमुख अधिकारी होते. त्यांचा तात्यांना निरोप आला की आकाशवाणीवर कविसंमेलनाचा कार्यक्रम योजलेला आहे त्याचे अध्यक्षपद आपण भूषवावे. खरे म्हणजे हा एक चांगला सन्मानच होता.

भारतीय स्वातंत्र्याची भव्य दिव्य स्वप्ने रेखाटून ती प्रत्यक्षात उतरविण्यासाठी तितकेच भव्य, दिव्य, उत्कट जीवन जगणाऱ्या ह्या महाभागाला हा सन्मान तितकासा महत्त्वाचा वाटला नाही व त्यांनी ह्या गोष्टीस नम्रतापूर्वक आभार मानून आपला नकार कळविला.

तात्या सांगत होते, ' अरे ! देश स्वतंत्र झाला ही केवढी मोठी आनंदाची नि महत्त्वाची घटना आहे. मला केवळ कविसंमेलनाचे अध्यक्षपद कसले देता ? ह्या अध्यक्षपदापेक्षा तुमची ही आकाशवाणीच मधून मधून मला द्या. म्हणजे मग बघा, हा सारा आसिंधू हिमाचल भारत देश कसा जागृत नि सावध ठेवतो ते ! स्वातंत्र्य आले, आता देशसेवेचे मार्ग बदलले पाहिजेत ! मिळालेल्या स्वातंत्र्याला कोणते धोके आहेत, त्यापासून कसे

रक्षण केले पाहिजे, डोळ्यात तेल घालून सावध कसे राहिले पाहिजे, अशा नानाविध गोष्टी मी माझ्या देशबांधवांना सांगेन.' हे सारे बोलताना तात्यांच्या बोलण्यातील आत्मीयता, धार नि डोळ्यांतील चमक ही काही न्यारीच होती; पण त्यांच्या इच्छेप्रमाणे कधी घडलेच नाही. कारण घडणे शक्यच नव्हते. तरीही अजून मनात येते की अशी संधी जर त्यांना मिळाली असती तर स्वतंत्र भारताच्या इतिहासातली काही पाने आज जी मलीन दिसतात, तशी कदाचित् ती दिसली नसती.

□ भालजी पेंढारकरांनी 'छत्रपती शिवाजी' हा चित्रपट काढला होता. त्याचे उद्घाटन मुंबईत तात्यांनी करावे, असा निरोप घेऊन लता मंगेशकर तात्यांना भेटायला आल्या होत्या. नेमकी मी तेव्हा तिथे होते. लताबाईंनी भालजींचा खूप आग्रहाचा निरोप तात्यांना सांगितला. तात्या थोडे हसून व उदास होत म्हणाले, 'मला बोलावल्याबद्दल मी आपला फार आभारी आहे. पण ह्या कामाला माझ्यापेक्षा योग्य अशी पुष्कळ माणसं आहेत. माझा हातगुण काही बरा नाही, माझा हात अपेशी आहे.' नि नंतर ते हसून म्हणाले, 'मी ह्या चित्राला हात लावला तर ते चित्रच चालेनासं होईल.' ह्यावर लताबाई चटकन् म्हणाल्या, 'छे: छे: असं काही होण्याची आम्हांला मुळीच भीती नाही.' वगैरे वगैरे. (अर्थातच हा हट्टी माणूस त्या उद्घाटनाला अखेर गेला नाहीच.) तात्या बोलत होते ! 'तुला कळत नाही म्हणून तू भीत नाहीस. बरं' तुझं कसं काय चाललं आहे ! चित्रपटसृष्टीत, गाण्यात तू चांगला नावलौकिक मिळवते आहेस हे ऐकून खूप समाधान वाटतं. वडिलांचा तो गुण तू चांगला उचलला आहेस. पण हे बघ, पैशांचे व्यवहार वगैरे नीट सावधपणे करीत जा हं ऽ ! हे चित्रपटाचं जग तसं चंचलही असतं. पैसाअडका नीट राखून ठेवीत जा. नाहीतर लबाड, फसवी माणसं तुला भेटतील. तू आपली जपून राहा.'

मास्टर दीनानाथ नि तात्या ह्यांचा खूपच चांगला स्नेह होता. आपल्या वडिलांवरील प्रेमामुळे, आपल्या वडिलांच्या स्नेह्याने अतीव आपलेपणाने, मायेने केलेला हा उपदेश ऐकून लताबाईंचे कान खरोखरीच धन्य झाले असतील, मन प्रसन्न झाले असेल.

□ लताबाईंनी एक चित्रपटसंस्था काढली होती. तिच्या उद्घाटनाला तात्यांनीच यावे, असा त्यांनी आग्रह धरला. तात्यांनी 'माझा हातगुण बरा नाही, माझ्यासारख्याबद्दल असा आपलेपणा, असा घरोबा ठेवलास तर तुझ्या प्रगतीला कदाचित् तो मारक ठरेल' असे विविधपरीने सांगितले. पण भालजींच्या पठडीत तयार झालेल्या लताबाईंनी कुठल्याही भीतीने ह्यात माघार घेतली नाही. 'हे उद्घाटन तुमच्या हस्तेच झालं पाहिजे. त्यामुळं जे काय होईल ते सोसायला मी तयार आहे, त्याची तुम्हांला चिंता नको, अशा आशयाचा हट्टच लताबाईंनी धरला. ह्या गुणी लेकीचा हा हट्ट मात्र शेवटी तात्यांना पुरवावाच लागला.

◻ आपल्याशी जवळीक केल्याने कुणाचेही नुकसान होऊ नये ह्या बाबतीत तात्या फार फार सावध असत.

◻ 'अभिनव भारता'चे स्मारक करावयाचे ठरले. त्याच्या निधीसाठी कमीत कमी १०० रु. दिल्यास एक व्याख्यान देण्याचा उपक्रम तात्यांनी सुरू केला. आम्ही दादरच्या भगिनींनी त्यासाठी बराचसा निधी जमा करून तात्यांचे व्याख्यान करावयाचे ठरविले. झाले ! आम्ही साऱ्याजणी अगदी कसून कामाला लागलो. अभिनव भारत, क्रांतिकारक, सावरकर, वगैरे विषयांवर साहजिकच खूप गप्पा होत. तारुण्याचा जोर असल्याने माझ्या वाणीला तेव्हा बहुधा खूपच धार नि तेजस्वी भरते येत असावे; कारण आमच्या कार्यकारी मंडळातील काही बायकांना हा पैसा जमवू नका, तात्यांचे व्याख्यान करू नका, अशी धमक्यांची वेडीवाकडी पत्रे येऊ लागली होती. त्यातल्या काही पत्रात ती निर्मला वैद्य हल्ली फारच रंगात आली आहे. मारे जोरजोरात गप्पा मारत असते, जरा तोंड आवर म्हणावं ! एक नि दोन. असला काहीतरी मजकूर असायचा. ही पत्रे अत्यंत गलिच्छ अक्षरात व शब्दात लिहिलेली असत. हे सारे वृत्त तात्यांनाही अर्थात समजलेच.—हा समारंभ दादरच्याच लक्ष्मीनारायण बागेत झाला. अध्यक्ष म्हणून यायला अत्र्यांनी होकार दिला होता, पण तात्यांच्या सांगण्याप्रमाणे अ. ह. गद्रे हे अध्यक्ष म्हणून बोलावले. ह्या समारंभात मी एक गीत गाणार होते नि प्रास्ताविक भाषणही मीच करणार होते.

तात्यांसमोर आपल्याला भाषण करायला मिळणार ह्या कल्पनेने माझ्या आनंदाला, उत्साहाला नुसते उधाण आले होते. कल्पकतेला बहर आला होता. मनाला रिकामेपण मिळाले रे मिळाले की काय भाषण करायचे ते मी ठरवी. त्यात रोज थोडा थोडा बदल होई हे वेगळे ! अशा मस्त धुंदीत मी वावरत असताना, मला तात्यांनी बोलविल्याचा निरोप आला. मी त्याप्रमाणे गेले. थोड्या इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर तात्या मला शांतपणे सांगू लागले,

'हे बघ ती पत्रे वगैरे आल्याचं सर्व मला समजलं आहे. तरीपण हा समारंभ ठरल्याप्रमाणं होणारच. पण ह्यात तू मात्र मुळीच भाग घ्यायचा नाहीस.'

'का ?' मी एकदम दुःखी स्वरातच विचारले.

'मी सांगतो म्हणून ! सोन्यासारखी दोन मुलं आहेत. चांगली चाकरी आहे, सगळं कसं नीट चाललं आहे तेव्हा उगीचच लोकांच्या नजरेत येण्याची काही जरूरी नाही; नि देशभक्ती करायला हा सोडून वाटेल तेवढे मार्ग आहेत.'

'शी : बाई !' मला निराशेने खरे जरा रडूच आले. तरीपण 'मग मी नुसतं गाणंच म्हणेन. बोलणार नाही, चालेल ?' मी विचारले.

'तेसुद्धा नको गाणं. तू घरी म्हणून दाखव. मी नि माई ऐकू पाहिजे तर ! आणि चार बायका बोलवू. तू तिथं व्यासपीठावरसुद्धा यायचं नाहीस.'

मला जरा वेळ काहीच बोलता न आल्याने मी गप्पच राहिले. 'हे बघ, तुझ्या-पेक्षा तुमची सर्वांची मला जास्त काळजी आहे. तू अजून लहान आहेस, तुझा उत्साह मला समजतो. पण मी तुझ्या हिताचंच सांगतो आहे ' तात्या मला समजावीत होते.

'मग मी तिथं व्याख्यानालासुद्धा येऊ नको का?' दुःखाने नि थोडे रागावूनच मी विचारले.

'अग वेडाबाई! व्याख्यानाला तू जरूर ये! व्याख्यानाला तर तू आलंच पाहिजेस.' आणि मग थोडेसे चिडविण्याच्या स्वरांत ते मला हसत हसत सांगू लागले, 'हे बघ, मी तुला एक छान काम सांगणार आहे. आमच्या चहापाण्याची व्यवस्था असेल ना, ते काम तू कर. तुला खादाडोला अगदी योग्य काम आहे ते! ते काम मात्र नीट सावधपण कर हंऽ! नाहीतर तुझा सगळा भोंगळ कारभार, तुझी नजर चुकवून आमच्या चहापाण्यात घालील कुणीतरी काहीतरी. तिथं जर काही दगाफटका झाला तर मात्र महाराज, ती तुमची जबाबदारी हंऽ!' असे सगळे गमतीने हसून समजाविल्यावर माझा राग नि दुःख कुठल्याकुठे पळून गेले. तात्यांच्या बोलण्याचा प्रभावच हा असा विलक्षण होता.

गप्पांच्या ओघात अनेक विषय येत. पण राजकारणावर मात्र तात्या माझ्याशी कधीच बोलत नसत. कारण त्यातली आमची अक्कल नि गती ते चांगले ओळखून होते. माणसाची बौद्धिक कुवत, त्याचा व्यवसाय हे ओळखून ज्याच्या त्याच्या कुवतीनुसार त्या त्या विषयावर प्रत्येकाशी बोलणे ह्यात ते अगदी निष्णात होते.

एकदा ते म्हणाले होते, 'लोक माझ्या राजकीय कर्तृत्वाचाच जास्त उदो उदो करतात, पण माझ्या सामाजिक कार्याचा तसा करीत नाहीत. वास्तविक हे चूक आहे. खरं म्हणजे माझं सामाजिक कार्यच राजकीय कार्यापेक्षा अधिक महत्त्वाचं आहे. पण ते लोकांनी लक्षात घेतलेलं नाही.' तात्यांचे हे उद्गार आज जेव्हा मी त्यांच्या संपूर्ण जीवनचरित्राकडे बघते तेव्हा अगदी सार्थ वाटतात, मनोमन पटतात.

□ ५१–५२ साल असेल. लियाकत अलीखान नेहरूंना भेटायला आले होते. झाले! पटापट काहीही कारण न सांगता काही व्यक्तींना पकडण्यात आले. कारण, हाती सत्ता एवढेच. तात्यांनाही पकडण्यात आले. दीड-दोन दिवस झाले तरीही त्यांना कुठे नेले आहे ह्याचा पत्ताच नव्हता. बिचाऱ्या माई, विश्वास व मी. आम्ही आपले काळजी करीत होतो. शेवटी मग तात्यांना बेळगावला नेले आहे असे कळविण्यात आले. तिथून आल्यावर तात्या तिथल्या काही गमती सांगत होते. त्यातली ही एक–

मोरारजी देसाई तेव्हा महाराष्ट्र की मुंबई राज्याचे गृहमंत्री वा कुणीतरी होते. ते बेळगाव तुरुंगाला भेट द्यायला गेले होते. ते येणार ही बातमी तात्यांच्या कानांवर आली होती. पण त्यासंबंधी एक अवाक्षरही तात्यांनी कुणाला विचारले नव्हते. ठरल्याप्रमाणे मोरारजी आले. त्यांनी तुरुंगाधिकाऱ्याला विचारले,

‘ काय म्हणताहेत सावरकर ?’

‘ ठीक आहेत. ’ तो उत्तरला.

‘ मी यणार हे त्यांना समजलं आहे का ?’ मोरारजी.

‘ काहो कल्पना नाही. काही बोलले नाहीत. कदाचित असेलही माहीत. ’

‘ पण मग मला भेटायचं वगैरे काही म्हणत होते का ?’ मोरारजी.

‘ नाही बुवा. ’

‘ बरं ! पण त्यांची नीट काळजी घ्या ! त्यांना ज्या काही विशेष सोयी सवलती हव्या असतील त्या त्यांना देत जा. ’ मोरारजींनी त्या अधिकाऱ्याला जाताना हे सांगून ठेवले. ते गेल्यावर हे सारे वृत्त - त्या अधिकाऱ्याने तात्यांना सांगितले व म्हटले, ‘ आपल्याला जे काही हवं असेल ते सांगा. अनमान करू नका. जे हवं असेल ते आपल्याला दिलं जाईल. ’

‘ छे छे ! मला काहीही वेगळं नको आहे. मी ज्या वर्गाचा बंदी आहे, त्याला कायद्यानं मिळणाऱ्या ज्या ज्या गोष्टी, सोयी, सवलती, आहेत तेवढ्याच मला द्या म्हणजे झालं ! याहून अधिकाची मला गरजही नाही, अपेक्षाही नाही. दयेची तर मुळीच ज़रूर नाही. मला विचारल्याबद्दल मात्र मी आपला फार फार आभारी आहे, ’ असे तेजस्वी उत्तर तात्यांनी चटकन् दिले होते.

▫ असो ! शिवाजी महाराजांनी दिल्लीला जाताना छोट्या संभाजीलाही बरोबर का नेले असावे ह्या विषयावर मध्ये एकदा एक छोटासा मजकूर ‘ महाराष्ट्र टाइम्स ’मध्ये कुणीतरी लिहिला होता. त्यावरून आपली मला एक आठवण झाली.

अशाच एकदा इतिहासावर गप्पा चालल्या होत्या. कारण त्या आधी नुकतेच ओतुरकर की कुणीतरी इतिहासकार तात्यांकडे येऊन गेले होते. तात्या त्यांना म्हणाले, ‘ बघा, तुम्ही केवळ इतिहास लिहून केवढे मोठे झालात, घरं बांधलीत, पैसा केलात, ’ त्यावर ते इतिहासकार म्हणाले होते, “ अहो ऽ आम्ही कसले मोठे ? तुमच्यासारख्यांनी इतिहास घडवले तेव्हा आम्ही लिहिले. आमचं मोठेपण उभे राहिलं ते तुमच्यासारख्यांच्या कर्तृत्वावर नि पुण्याईवर. त्याच वेळी मीही माझी आपली एक बारीकशी शंका तात्यांना विचारली होती. ‘ तात्या ! तुम्ही लोक त्या गुरू गोविंदसिंहाचे एवढे गोडवे गाता, पण तो तर नांदेडला मुसलमान बादशाहाबरोबर त्यांच्या मदतीसाठी लढाईवर आला होता नि तिथंच एका मुसलमानाकडून त्याचा खून झाला. हे कसं काय ?’

‘ हे तू कुठं वाचलंस ? तो मुसलमानांबरोबर त्यांच्या बाजूनं लढाईला गेला होता ? मला एकदा इतिहास बघितला पाहिजे परत. ’ तात्या उत्तरले. ‘ बाकी वाचन उघड्या डोळ्यांनी, डोकं ठिकाणावर ठेवून करतेस हा काही माझ्या संगतीचा कमी लाभ नाही. ’ असे चिडवायलाही कमी केले नाही. अस्सल पुराव्याशिवाय

बोलायचे नाही नि आपणांला ज्ञात नसलेल्या गोष्टी कळल्या तर आपणच शहाणे ह्या थाटात त्या न नाकारता त्यांची परत चौकशी करायची, अशी सत्यनिष्ठ नि तर्कशुद्ध विवेचन करण्याची त्यांची वृत्ती होती. त्याचाच हा पुरावा होता. मग अशाच गोष्टी चालू होत्या. तात्या सांगू लागले, 'लहानग्या संभाजीला आपल्या बरोबर आग्र्याला घेऊन जाण्यात महाराजांचा काहीतरी खास हेतू असला पाहिजे. लहानग्या पोराला इतकं दूर केवळ गंमत म्हणून बरोबर घेऊन जाण्याइतके काही ते वेडे नव्हते. माझ्या मते इतिहासकार जे त्यांना बसावयास दिलेली जागा अपमानास्पद असल्यानं महाराजांना अनावर राग आला, ते कापू लागले वगैरे लिहितात ते खरे नाही. माझ्या मते त्यात दुसराच अर्थ आहे. महाराजांनी सिंहासनावर बसलेल्या औरंगजेबावर जिव्हारी वार ज्या जागेवरून करता येईल त्याचा अचूक अंदाज व हिशेब मनाशी केलेला असावा. औरंगजेबाला ठार करून जयसिंहादी राजपुतांच्या साहाय्यानं त्या गादीवर संभाजीची स्थापना करावयाची, असा त्यांचा मनसुबा असावा. पण नेमका तोच बेत, त्यांना योग्य व हवी असलेली जागा न मिळाल्यानं मनाशी काटेकोर योजलेला व्यूह ढासळल्यानं, ते अतिशय निराश, हताश झाले असावेत. आपली योजना फसली आता आपणच उलटे बादशाहाच्या हाती सापडलो या विचारानं महाराजांना संताप आला असावा व कापरं भरलं असावं.' तात्यांचे हे विवेचन योग्यच होते. कारण स्वतःच्या सुटकेसाठी मार्सेलिसला अफाट सागरात,-नव्हे प्रत्यक्ष काळसागरातच बेडर निर्भयतेने आपला देह झाकून देण्याचे अपूर्व साहस करणाऱ्या ह्या नरशार्दुलाचा शिवाजी महाराजांच्या त्या प्रसंगीच्या वर्तनाबद्दल असाच काही धाडस वा पराक्रमाचा तर्क चालावा. त्यात अयोग्य वा चूक काय आहे? शूरांची जात शूरांनाच ओळखता येते!

□ अशाच एकदा कधीतरी काव्यावरून गप्पा निघाल्या होत्या. मी वेडी कधीतरी त्यांना माझ्या कविता (?) दाखवीत असे. (मी लिहिते त्या आकाराने व दिसण्याने तरी कविता असतात असे मला तेव्हा वाटे, आज नाही.) एकदा दोनदा मी त्यांच्यावर केलेल्या कविताच त्यांना दाखवल्या. मग काय? चेष्टेला आयतेच खाद्य मिळाले. 'वा महाराज! हा छान उद्योग आहे. काव्यविषयालाच विचारायचं, काय रे बाबा कविता कशी झाली आहे? स्तुतीच्या दोनचार शब्दांनी भारलेला, कृतज्ञ झालेला, बिचारा सज्जन विषय तो त्या काव्याला वाईट कसे म्हणणार?' अर्थात् ह्या उत्तरावर मी वेडी तरी काय बोलणार? 'वा वा, जे वाईट असेल, चूक असेल ते सांगायचे' आमचा अति उत्साह त्यावर हे बोललाच.

'बाकी, संगतीनं कविता करायला लागलीस हा काही कमी फायदा नाही.' तात्यांनी तेवढ्यात चिडवलेच. अशाच धर्तीवर गप्पा चालू होत्या.

'तात्या, काव्य हा बुद्धीचा विषय आहे की हृदयाचा, म्हणजेच भावनांचा?'

मी विचारले. त्यावर 'का? कुठं व्याख्यान वगैरे द्यायला जाणार आहेस की काय? काव्याबद्दल फार बारं क सारीक तपशील विचारते आहेस ती? अग वेडा-बाईऽ! हा विषय बुद्धीचा, हा विषय हृदयाचा, असं का कुठं असतं? काव्य हा भावनेचा पण विषय आहे नि बुद्धीचा पण आहे. बुद्धी नि भावना ह्या काय एक-मेकींशी न पटणाऱ्या, तुझ्यासारख्या भांडखोर–दोन स्वतंत्र गोष्टी आहेत होय? अर्थात काव्यात भावनेला अधिक प्राधान्य असते, नव्हे हवे, हे खरं आहे आणि हे बघ खूप मोठं लांबलचक ओळींचं लेखन म्हणजे मोठं श्रेष्ठ काव्य असं मात्र मुळीच नाही हंऽ! काव्याचं मोठेपण त्याच्या लांबीरुंदीवर अवलंबून नसतं, ते असतं विषयासंबंधी विचारांवर. अलीकडे ही लहान मुलं सारखी म्हणत असतात ते गाणं तुला माहिती आहे ना? तू ऐकलंच असशील.'

'कुठलं?' मी विचारले.

'तेऽग! 'नाचरे मोरा आंब्याच्या बनात.' फार सुंदर काव्य आहे ते. हे माडगूळकर मोठे प्रतिभाशाली कवी दिसताहेत हंऽ! कसं छोटं पण छान गाणं आहे.' नि मग त्यांनी माडगूळकरांची खूप तोंडभरून स्तुती केली. पुढेही एकदा केली होती. मला वाटतं गीतरामायणाबद्दल बोलताना असेल.

'तू कविता वगैरे वाचतेस की नाहीस? तुझ्यासारखीनं रोज ठराविक वेळ तरी काहीतरी वाचलंच पाहिजे' हे त्यांनी नेहमीप्रमाणे तेव्हाही सांगितले.

पण आम्ही म्हणजे काय? क्षणाचे सज्जन युगाचे दुर्जन (आळशी) त्यानंतर त्यांनी नुकतेच वाचलेले आणखी एक काव्य सांगितले. त्यातल्या ओळी सगळ्या काही आठवत नाहीत पण शेवटची ओळ मात्र आठवते ती अशी होती. 'वेड्या चंद्रा, कलंकाविना, जगि कुणी का सुटले?'



अस्मादिकांना संस्कृत काही आता चांगले येत नाही. तेव्हा मात्र बरेच चांगले येत होते. तात्यांनी शब्द चमत्कृतीनेही काव्याला कसा गोडवा येतो त्याचेही एक उदाहरण सांगितले होते. ते माझ्या पक्के लक्षात राहिले आहे. तो श्लोक असा. सखी म्हणते, 'कुंद कुंज इदं पश्य, सखी राजीवलोचने'

त्यावर दुसरी उत्तरते--

'अमुना कुंद कुंजेन सखी में किं प्रयोजनम ?' ज्या कुंदात मु-नाही म्हणजेच मुकुंद नाही त्याच्याशी मला कर्तव्य आहे ? हा ह्याचा भावार्थ.

'शैक्षणिक मानसशास्त्रात सूचन म्हणजे सजेशन ही जेव्हा फार प्रभावी व्यक्तिमत्त्वाकडून येते तेव्हा ते स्मरणात पक्के राहते. माझ्या ध्यानात राहिलेले हे श्लोक व इतरही अनेक ओळी म्हणजे त्या नियमांचा पुरावा आहेत. कारण त्या ओळी तात्यांसारख्या, प्रभावी व्यक्तिमत्त्वाने सांगितल्यानेच लक्षात राहिल्या हा त्या व्यक्तीचा प्रभाव.

□ आमचेही जरा लहरी नि विक्षिप्तच वागणे. त्यामुळे मी तात्यांकडे कधी सहा-सहा महिन्यांनी, तर कधी दोन तीन वर्षांनीही जायची. परंतु ते आजारी वगैरे कळले तर मात्र लगेच जरूर जायची. अशीच एकदा मी गेले होते. मला पाहताच 'या महाराज ! आलात. मला वाटलंच तू येणार म्हणून ! जिवंत आहेत की गेले, हे बघायला तरी येतेस हे काय कमी आहे ?' अशा शब्दांनीच स्वागत झाले. वृत्तपत्रांत छापून आली होती तेवढी काही प्रकृती बिघडलेली नव्हती, त्यामुळे गप्पा वगैरे मारता आल्या. तात्या म्हणत होते, असा आजार वगैरे आला म्हणजे थोडी चिंता वाटते नि अशा वेळी ते मला त्यांच्या भावंडांच्या आजाराविषयी बोलत. त्यांची वहीण श्री. माई काळे (ह्या माझ्या वहिणीच्या सासूबाई) ह्यांना शेवटी शेवटी काय आजार झाला, त्या कशाने गेल्या, हे तर मला ते नेहमीच विचारीत. तात्यांचे धाकटे बंधू डॉ. सावरकर हे बेशुद्धीतच गेले होते. वडील बंधू बाबा यांचेही खूप खूप हाल झाले होते. त्यामुळे स्वतःच्या मृत्यूबद्दलही त्यांना काळजी वाटे. एकदा ते म्हणाले होते, कधी कधी मला वाटत मला जर वात वगैरे झाला, तर मी वाटेल ते बडबडेन !' डोके दाबीत दाबीतच ते सांगू लागले. 'आजपर्यंत ह्या डोक्यात इतक्या अगणित गोष्टी साठवल्या आहेत, की एखादे वेळी त्या गोष्टी राखून ठेवण्याची मेंदूची शक्तीच नाहीशी होईल. मला वात होईल नि मग माझ्या तोंडून काय काय गोष्टी बाहेर पडतील त्याचा नेम नाही. अशा वेळेला माझ्यामोवती निष्ठावंत नि शहाणी माणसंच पाहिजेत. समजा असं, कधी झालं तर तू येशील की नाही ?' थोड्या भरल्या स्वरातच तात्यांनी हा प्रश्न मला विचारला होता नि मीही लगेच.

'हो होऽ ! एवढा जर तुमचा माझ्यावर विश्वास असेल, तर मी अवश्य येईन'

एवढे बोलले मात्र नि कसे कुणास ठाऊक पण माझे डोळे भरून आले. तात्या हे वरील वाक्य मजजवळ बोलले होते, म्हणूनच मी केव्हाही ते आजारी आहेत हे कळायचा अवकाश की ताबडतोब जात असे. वाटे, त्यांनी हा अशा तऱ्हेचा प्रश्न विचारला आहे हे ते कधी विसरणार नाहीत. तेव्हा आपण गेलो नाही तर ह्यांना वाटेल की, छे, हिची निष्ठा खरी नाही. मी अशी कधी खूप खूप उशीरा, तर कधी आठवड्यातून दोनदा, तीनदादेखील जायची म्हणून अलीकडे त्यांनी माझे नाव 'राजापूरची गंगा' ठेवले होते. गेले की 'काय ? गंगा आली ?' असे विचारायचे.

विसंगत असल्या तरी ह्या आठवणी सांगण्यासारख्या वाटल्या म्हणून सांगितल्या. लिहिता लिहिता आणखीही काही आठवणी मनात जाग्या होत आहेत. कालिदासाला रघुवंशाच्या आठवणींनी असेच घेरले नि त्या बिचाऱ्याला ते सारे मग सांगावेच लागले. त्याने केलेले ते रघुवंशाचे गुणगान अमर झाले; पण हे असले सुंदर काम आम्हांला कसे जमणार ? म्हणून आम्ही आपले आपल्या पराक्रमाने, देशप्रेमाने, व कर्तृत्वाने भारतीय इतिहासात अमर झालेल्या तात्यांचे गुणगान जमेल तसे केले, 'वेडे वाकुडे गाईन दास तुझा म्हणवीन' (भिकार असला तरी दास आहे हा आनंदही काही कमी नाही.)

आता आणखीन एकच आठवण सांगते. चिनी आक्रमणामुळे सुस्त भारताला पुन्हा एकदा जाग आली होती. देशप्रेम, आपण सर्व एक ही आत्मीयता, त्याग, इ. भावना हां हां म्हणता फुलून आल्या होत्या. सत्य अहिंसा पूजक प्रेमवीर आता वेगळे बोलू लागले होते कारण ह्या बोलण्यावाचून आता त्यांना गत्यंतरच नव्हते. कॉंग्रेस-वाल्यांचे त्यांना तुम्ही सभेस या, चारच शब्द बोला, केवळ उपस्थित राहा, असे निरोप येत होते. बाहेर जाण्याइतपत त्यांची प्रकृतीही ठीक नव्हती. मनःपूर्वक आभार मानून तात्यांनी उलट निरोप पाठवला की 'मी आजपर्यंत जे बोलत आलो, तेच आज तुम्ही बोलता आहात. परिस्थितीने आज ते तुम्हाला बोलायलाच लावले आहे. आज खरं म्हणजे अनेक मुखांनी बोलत आहेत ते सावरकरच आहेत.'

तात्यांच्या द्रष्टेपणाचा पुरावा काळाने असा एक जबरदस्त तडाखा हाणून अशा-प्रकारे सादर केला होता. या द्रष्ट्याला तरीही 'अद्रष्टे सावरकर' असे संबोधून एकदा एका नव्या शक्तीने त्यांच्यावर भाष्य केले होते. अर्थव्यवस्था ही समाजाची मूलभूत प्रेरणा आहे हे सावरकरांना समजले नाही असा त्या भाष्याचा सूर होता. हे म्हणणे काही अंशी खरे असले तरी तात्यांचे द्रष्टेपण म्हणून जे मान्य आहे ते 'अमुक अमुक मार्गाने देश गेल्यास देशाचा अमुक अमुक घात होईल, अमक्या तमक्यांचे नको ते लाड केल्यास त्याची अमुक अमुक फळे मिळतील, अमुक अमुक परिणाम होतील, यासंबंधीचे त्यांनी केलेले भविष्यदर्शन यासाठी. ते कसे अचूक होते याचे कैक पुरावे आज भारतात सर्वत्र उपलब्ध आहेत. तेव्हा त्यांना अद्रष्टे हे विशेषण (आंधळेपणाने) लावायचेच कसे ? ◻ ◻ ◻

# ग्रेटेस्ट शो ऑन अर्थ



५

दिल्लीश्वरो वा

जगदीश्वरो वा

बाबूमिया

मी जे आज लिहीत आहे ते मला स्वतःलाच दुःख देत आहे. जे स्वतःस दुःख देते ते दुसऱ्यास कोठून हसविणार ?

आत्मपरीक्षण नेहमीच अवघड असते. कारण त्यांत सत्य इन्व्हॉल्व्ह होते. सत्य कटू असले की प्रिय कोठून राहणार ?

प्रिय राहण्यासाठी नेहमी चांगले बोलत राहावे, असा राजकारणांत एक नियम आहे. पण वाईटास चांगले किती दिवस म्हणावे यालाही मर्यादा आहे. आशावाद–अगदी खोटा आशावाद–राखणार तरी किती दिवस ?

पार्किन्सन्स लॉजप्रमाणे माझे स्वतःचे काही लॉज् आहेत. आणि ते मी इंग्रजीतून प्रसिद्ध करणार आहे. कारण मराठी भाषा माधव ज्यूलियनांच्या काळी होती तेवढी आजही विचारीच आहे ! माझा एक लॉ असा : All good principles degenerate in Indian climate.

हिंदू धर्म एकेकाळी श्रेष्ठ होता. पण भारतीय हवेत त्या हिंदू धर्माचे संपूर्ण भ्रष्टीकरण पाहावयास मिळते. गौतम बुद्ध भारतात जन्मला. त्याच्या बौद्ध धर्माचे भ्रष्टीकरण त्याच्या मृत्यूनंतर दोन शतकांत झाले व आज आंबेडकरांचे शिष्य

सोडले तर बौद्ध अनुयायी भारतात जवळजवळ नाहीतच. आणि या बौद्ध शिष्यांनाही आज जुने शेड्यूल्ड् कास्टचे सारे नियम व साऱ्या सवलती पाहिजे आहेत. जैन अहिंसावादी. पण पूरमममध्ये पाहा कसे मुर्गीमटणावर तुटून पडतात ते ! इस्लाम धर्म खरे म्हणजे पाक धर्म. पण इस्लामची पावदेखील तत्त्वे भारतीय मुसलमान पाळीत नाहीत आज. ताबूत मक्का–मदीनेत आहे का ते विचारून पाहा म्हणजे मी म्हणतो ते खरे की खोटे ते कळेल. महंमदाची चित्रे इराणमध्ये...जाना दो !

हा भ्रष्टीकरणाचा नियम धार्मिक क्षेत्राप्रमाणे आर्थिक, राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रांतही तेवढाच लागू पडतो. मला एक पाक 'ब्राह्मण' दाखवून द्या आजच्या समाजात. साऱ्याचे डीव्हॅल्यूएशन झाले आहे. ते आज वैश्य तरी आहेत, नाही तर सारे शूद्र. साऱ्या 'क्लास 'वाल्या ब्राह्मणांना व्यापारी नाही म्हणावयाचे तर त्यांना कोणाचे लेबल लावायचे ?

'फ्री काँपीटीटीव्ह ट्रेड 'च्या तत्त्वावर अमेरिका पुढे आली. जर्मनी पुन्हा औद्योगिक राष्ट्र बनून जगात पुढे आले याचे कारण हा फ्री ट्रेड. कारण, स्पर्धा म्हटली की कमी किमती व सुबत्ता. आमच्याकडे फ्री ट्रेडला मानतात. आमच्या मिश्र अर्थशास्त्रांत त्यास फरंट लाईनमध्ये बसायला मिळते. पण प्रत्यक्षात पाहावे तो सारे व्यापारी एकत्र येऊन सिंडीकेट बनवून जादाच दर नक्की करतात. मग ती विक्री पेनिसिलीनची असो, डालडा तुपाची असो का शाईची असो. आज या प्रत्येकास डझन दीड डझन स्पर्धक आहेत. तरीही दर रोज वाढतच आहेत.

एका गांधीभक्ताने मला थट्टेने आकाशाकडे बोट दाखवून एक नियम सांगितला,

" When someone goes up, he cannot come down again. So is true of the prices. "

कम्युनिस्टांना या भारतात इतके नासवून टाकले आहे की कम्युनिस्टांचा कम्युनिस्टांवर विश्वास उरला नाही, तुमची माझी बात सोडा. केरळ व बंगाल येथील कम्युनिस्टांनी कम्युनिस्टांवर केलेले आरोप व प्रत्यारोप वाचले की शिसारी येते.

भारताने मार्क्सलाही सपशेल खोटे पाडले आहे. भारतात गेल्या दोन हजार वर्षांत बौद्धिक व सामाजिक गुलामगिरीने लोकशाहीस सुद्धा बदलून टाकले आहे. वरचा वर्ग व श्रीमान् वर्ग फक्त सत्ता बाळगून असतो. बाकीच्यांचे भारतीय लोकशाहीत सतत शोषण होत असते. मार्क्सने सांगून ठेवले आहे की हे शोषण कमालीचे झाले की समाजात क्रांती अटळ आहे. त्या नियमानुसार भारतात गेल्या अनेक शतकांत पंचवीस क्रांत्या व्हावयास पाहिजे होत्या. भारताच्या दक्षिण टोकास बिचारी कन्याकुमारी हात पुढे करून वराच्या शोधात अजून उभीच आहे त्याचप्रमाणे भारतात क्रांतिकुमारी तशीच उभी आहे वाट पाहात !

ह्या भारतीय हवेत भारतीय विरोधी पक्ष हाही एक मोठा फार्स आहे. 'ग्रेटेस्ट शो ऑन् द अर्थ.' सर्वांत मोठी सर्कस.



क्रांतिकुमारी अजून वाटच पाहत आहे...

भारताच्या फाळणीच्या वेळेस खऱ्या अर्थाने हिंदु-महा-सभा हा एकच विरोधी पक्ष भारतात होता. कम्युनिस्ट इग्रजांचे हस्तक बनले होते. समाजवादी पक्ष काँग्रेसचाच 'आले-पाक' (जिंजर ग्रुप) होता. १९४७ ते १९५७ या पहिल्या दहा वर्षांत खरं म्हणजे या विरोधी पक्षाने बाळसे धरायला पाहिजे होते. लोकशाहीत विरोधी पक्ष वाढणार नाही तर कुठे वाढणार ? पण ते होणे नव्हते. सावरकरांना खटल्यात गोवून हिंदुसभेस निष्प्रभ केली नेहरूंनी. पैशाच्या पाठबळावाचून सभेचे कार्यकर्ते अॅनिमियाने दुर्बळ ठरले. संघावर बंदी घालून संघास लंब केले गेले.

भारतात तत्त्वे कशी नासतात याचे एक मनोरंजक उदाहरण देतो. गांधीजी चुकत होते, राजकीय बुवाबाजी करीत होते, महात्मा नव्हते तर दुरात्मा होते वगैरे टीका आज तीस ते पन्नास वयाच्या लोकांनी प्रत्यक्ष कानांनी ऐकली असेल. मग एकदम ते प्रातःस्मरणीय, वंदनीय पुढारी कसे झाले ? त्यांच्या चुका दाखविण्याचे धाडस या खऱ्या फाळणीपूर्व विरोधकांत का नाही ? तसा प्रचार का होत नाही ?

आता उलटा प्रकार सुरू झाला आहे. आता काँग्रेसचेच लोक गांधींचे मुसलमानांचे धोरण चुकले अशी कबुली आज देत आहेत. हे मतांतर अहमदाबादेत जातीय दंगलीच्या वेळी उघडपणे दिसून येत होते.

त्यावरून मला संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीची आठवण होते. ती चळवळ विरोधकांच्या हातून काढून घेऊन काँग्रेस पुढारी यशवंतराव संयुक्त महाराष्ट्राचे विजयी वीर बनले ! असा प्रकार गेल्या दहा हजार वर्षात घडला नाही !

त्या हिंदू–महासभेचे आज नावनिशाणही शिल्लक आहे का ? त्यांच्याच एका पुढाऱ्याने मला सांगितले, डॉक्टरसाहेब, मदनमोहन मालवीयजींनी हिंदू–सभा-भवन बांधून ठेवले बिर्ला मंदीराशेजारी म्हणून कमसेकम आम्ही जगतो तरी आहोत. एखादा–दुसरा दौरा करू शकतो. एखादे कार्यालय थाटू शकतो. नाहीतर १९४८ साली आम्हालाच ' हे राम ' म्हणायची पाळी आली असती.

हे विधान इतके बोलके आहे की त्यावर जास्त भाष्य करणे वेडेपणाचे ठरेल.

हिंदूमहासभेची जी स्थिती नेहरूंनी केली तीच अवस्था इतर राजकीय पक्षावर ओढवून आणण्याचा नेहरूंचा बेत होता. सत्ता, पैसा व कायदा स्वतःच्या बाजूने असल्यामुळे नेहरू पुष्कळ वर्षे त्यांचा डाव उत्तम प्रकारे खेळू शकले. याचे उत्तम वर्णन व्ही. व्ही. (विष्णु विनायक) जॉन या शिक्षणतज्ज्ञाने पुढील शब्दांत केले आहे. हे तज्ज्ञ मूळचे पुणेरी चित्पावन. पेशव्यांचे हेर म्हणून यांचे पूर्वज केरळात वसले. ते बाटून 'जॉन' झाले. पण मूळची चिकित्सक वृत्ती थोडीच जाणार ? त्यांनी लिहिले आहे :

" The opposition's energies are expanded on contriving defections from the ruling party or coalition, but one soon discovers that this is a game that more than one can play. And whereas normally the opposition keeps an eye on the misdeeds of the Government and this vigilance keeps the Government on its toes, the watchfullness is now more evident in the treasury benches for the Government keeps itself in power by a continueing appraisal of the weakness of the opposition. "

या शिवाशिवीच्या खेळांत देशहित व समाजाचे हित साहजिकच दुर्लक्षिले जाते. कारण सर्वच राजकीय पक्षांचे लक्ष आणि शक्ती आपण सत्तेवर कसे राहू यावर केंद्रित झालेले असते.

ही सत्तेची हाव काढून टाकली तर खऱ्या देशभक्तीची व देशहिताची कसोटी सहज लागेल व कोणचा पक्ष चांगला व कोणचा पक्ष वाईट ते सहज कळून येईल.

भारतातील समाजवादी पुढाऱ्यांविषयी माझ्या मनात फार आदर आहे. पटवर्धन बंधू, नानासाहेब गोरे, नाथ पै, हेम बारुआ, जयप्रकाश नारायण, डॉ. राममोहन लोहिया, कर्पूरी ठाकूर, सनत मेहता वगैरे मंडळींशी माझा परिचय आहे. व्यक्ती म्हणून मला त्या पूज्य आहेत. विद्वत्ता, त्याग, देशभक्ती व गरीबांविषयी वाटणारी अनुकंपा यात ही मंडळी कोणालाही हार जाणारी नाहीत.

पण राजकारण हा धंदा झाला आहे, व्यवहार आहे व तो यशस्वी करण्यासाठी योग्य त्या भांडवलाची जरुरी लागते. भांडवल दुर्दैवाने वरून पडत नाही. ते चोरावे लागते, भिक्षा मागून मिळवावे लागते, वारसा हक्काने मिळते किंवा लाच घेऊन

'कमवावे' लागते. लक्ष्मी व नीती कधीच एकत्र नांदत नाहीत. म्हणून समाजवादाच्या घोषणा करणाऱ्या जयप्रकाशजींना Friend of America म्हणवून घेणाऱ्या जे. जे. सिंगांचा बंगला सोडावासा वाटत नाही. जे. पी. ना भेटावयाचे असेल तर टॅक्सीचा तेवीस रुपये खर्च येतो आपल्याला ! एकदा ऐषआरामात उठण्याबसण्याची सवय लागली की ती सुटत नाही. जयप्रकाशजींचा समाजवाद वेडीवाकडी वळणे घेतो ती उगीच नाही. नाहीतर नेहरूंचा वारसहक्क सांगणारा हा थोर समाजवादी पुरुष एवढे आपले समाजात हसे करून न घेता ! समाजवादी पक्षाचा हा सर्वोच्च सर्वोदयवादी बनतो काय व पुढे काश्मीर प्रश्नावर Voice of America काय बोलेल अशी विधाने करतो याचा काय अर्थ ? आणि राजाजींच्या स्वतंत्र पक्षाच्या पहिल्या कन्व्हेंशनला हजेरी देतो ! आणि आज पुन्हा राजकारणात प्रवेश करण्याच्या गोष्टी करतो ! बिहारात आजही जयप्रकाशजींचे नाव आहे. त्यांनी स्थापन केलेल्या समाजवादी पक्षांचे त्यागी कार्यकर्ते आजही आढळून येतात.

पण त्यांच्यातील तरुण पिढी मात्र बोंबाबोंब करताना आढळते, 'जे. पी. का म्हणून मोठे, मानायचे आम्ही ? त्यांच्यात consistency नावाची चीज आहे काय ? त्यांची तत्त्वनिष्ठा शून्य असली तर आम्ही काय म्हणून तत्त्वाशी एकनिष्ठ राहावे ? यथा राजा तथा प्रजा.' मी बिहारचे आपले उदाहरण दिले. महाराष्ट्रांत, गुजराथेत, मध्य प्रदेशात व केरळात व्यवहारी राजकीय समाजवादी पुढाऱ्यांची ही तरुण पिढी बोलताना कशी सालडी सोलून काढते हेही मी कानांनी ऐकले आहे. 'क्रांती' म्हणतात ती हीच असली पाहिजे. सुरुवातीस, मानसिक क्रांती व नंतर प्रत्यक्ष क्रांती.

मात्र समाजवादी पुढाऱ्यांना हा तरुण पिढीचा आगाऊपणा पसंत नाही. साहजिक आहे, तरुणांना म्हाताऱ्यांचा पोकळ घोषणावाद आवडत नाही.

समाजवादी गटात ह्या बंडाचा झेंडा प्रथमत: लोहियांनी उभारला व रूढिप्रिय, म्हाताऱ्या समाजवादी पुढाऱ्यांना अक्षरश: कंप सुटला. मला वाटते, पुढें लोहियांनी विवेक सोडला व त्यानंतरचे सारे समाजवादी राजकारण 'स्व' च्या भोवती गुंतले. विशेषत: पट्टम् थाणू पिल्ले व अशोक मेहता यांच्या सरकारप्रवेशानंतर !

प्रत्येक देशाचे एक विशिष्ट 'राष्ट्रीय धोरण' ठरलेले असते. तेथे तडजोड होऊ शकत नाही. त्या दृष्टीने लेबर व कॉन्झर्व्हेटिव्ह ब्रिटिश पक्षात फार थोडा फरक इंग्लंडमध्ये दिसून येतो. अमेरीकेत रिपब्लीकन्स व डेमोक्रॅट्स् यांच्या बाबतीत हेच म्हणता येईल. फ्रान्सची इतकी मंत्रिमंडळे गडगडली तरी फ्रेंच सरकारचे मूळ धोरण तेच राहिले. आमच्याकडे राष्ट्रीय धोरण अजून ठरले गेलेच नाही ! त्याबाबतीत आमच्या लोकांचा दुटप्पीपणा सर्वात जास्त आहे. बोलायचे एक व करायचे दुसरे यास राजकारण म्हणतात. तरीदेखील, या राजकारणात राष्ट्रहिताची आहूती पडू नये याची जपणूक करावयास नको काय ?

'कॉंग्रेसमध्ये इंडिकेट–सिंडिकेट, समाजवाद्यांमध्ये पी. एस. पी.–एस्. एस. पी.

कम्युनिस्टांमध्ये मॉस्कोवाले–पीकिंगवाले, जनसंघ–हिंदूसभा–ही दुही व सुंदोपसुंदी ह्या आजच्या काळाचा स्थायीभाव तर नाही ना ?' असा प्रश्न मी ना. ग. गोऱ्यांना विचारला.

गोरेसाहेबांच्या मते ही फूट थोडीफार मुळाशी Clash of personalities ची असली तरी त्यात मुळाशी तत्त्वज्ञानाचा संघर्ष आहेच.

' मला नाही वाटत. उदाहरणार्थ, एस. एस. पी. चा समाजवाद व पी. एस. पी. चा समाजवाद यांत काय फरक आहे ?'

नानासाहेब घुटमळले व म्हणाले, ' तसा फरक काही नाही – फक्त means चा भेद आहे –'

' उदाहरणार्थ ?'

' लोकसभेत वागणूक कशी असावी ? लोकसभेत आपली इभ्रत आपण ठेवायची नाही तर कोणी ठेवायची ? आज काँग्रेसविरोध म्हणून वेड्यासारखे वागलेले चालवून घेतले तरी उद्या ती वेळ आपल्यावर येईल. हे अनिष्ट वळण वेळच्या वेळी थोपवायवयास नको काय ?'

' ते ठीक आहे. पण मी तुम्हांला एस. एम. जोशांचे उदाहरण देतो. हा ' शांत आणि सोज्वळ ' पुढारी तुमच्या राजनारायण किंवा मधू लिमयांपेक्षा जवळ वाटतो. लोहीयांना जवळ करून या दोन गटांना एकत्र जोडण्यासाठी ते सं. सो. पात गेले. लोहीयांच्या नंतर ते एकाकी पडल्यासारखे वाटतात. संसोपातील उच्च पुढारी एस. एम. यांना काढण्याच्या मागे आहेत असे मी चांगल्या पुढाऱ्यांकडन ऐकले.'

' एस. एम. नी आपल्या हातांनी ही स्थिती ओढवून घेतली. त्यांना संसोपाचा गट जास्त समर्थ, सत्ताधारी व एकसंध वाटला. ते तिकडे वळले.'

' मला वाटते, या सर्व भांडाभांडीत राजकीय कार्याचा नेमका बळी पडतो. भांडाभांडीची ही वेळ नाही असे मला वाटते.'

' खरं आहे. आम्ही संसोपाशी सहकार्य करण्यासाठी तयार आहोत. अगदी उत्सुक आहोत पण त्यांचीच ह्यासाठी तयारी नाही. काय करणार ?'

इंडिकेट-सिंडीकेटप्रमाणे येथेही आरोप व प्रत्यारोप आहेतच.

मधू लिमयांचे म्हणणे, संसोपा प्रजासमाजवाद्यांशी हातमिळवणी करायला एका पायावर तयार आहे, पण त्यांनाच एकी नको आहे.

हिंदूसभा व जनसंघ यांचे एकमेकांवरचे आरोप ह्याच सुरातले आहेत. मी वैयक्तिक पातळीवर बऱ्याच वेळा दोघांच्या टॉप पुढाऱ्यांत समझौता घडवून आणण्याचा प्रयत्न केला होता व दोघांकडून थपडा खाल्ल्या होत्या ! दोघांचेही अहंकार जबरदस्त आहेत.

पी. एस. पी. – एस. एस. पी. या दोन गटांत हाच वांधा पडला आहे. यदुनाथ थत्त्यांची माझ्यासारखी अवस्था होत असेल. गोरे व एस. एम. दोघेही ' साधना 'चे

मार्गदर्शक म्हणून थत्ते प्र. स. पक्षाचे सिंफथायझर आहेत, मेंबर नाहीत !

नाथ पैंनी मला पी. एस. पी. – एस. एस. पी. यांची व्यक्तिगत हेव्यादाव्याची लाथाळी समजावून सांगितली. संसोपाचे हुच्चेगिरीचे राजकारण त्यांच्यासारख्या 'सनदशीर' नेत्यास कोठून मानवणार? लोकसभेची प्रतिष्ठा आपण बिघडवू नये अशा मताचे ते आहेत. हिंसामय वागणूक कॉंग्रेसविरुद्ध आज चालते, पण तीच उद्या आपल्यावर बूमरँग झाली म्हणजे? तारकेश्वरीवर हल्ला झाला तो तुम्हांस का मानवत नाही? प्रत्यक्ष मधू लिमयांवर गेल्या निवडणुकीत हल्ला झाला! नाथ पै सांगत होते, 'हे लोक इंदिरा गांधीस 'गुंगी गुडिया' म्हणतात. हा वाह्यातपणा आहे.'

'नेहरू गेल्यावरची गोष्ट. जवाहरलालांच्या परराष्ट्रीय धोरणावर एके काळी आम्हीही कडाडून हल्ला केला होता. पण नेहरू गेल्यावर विरोध संपला. नेहरूं-नंतर एक युग संपले होते. पण त्यांना श्रद्धांजली देण्याससुद्धा ह्या लोकांनी नकार दिला! म्हणे एक मिनिट स्तब्धता राखली ना? पुष्कळ झाले. हे कसे चालेल?'

'आमच्या पक्षाने ह. वि. कामथ यांना उभे केले होते. ते पाठकांच्या जागी हसत उपाध्यक्ष म्हणून निवडूनही आले असते. पण संसोपाने त्यांना विरोध केला. त्याच्या उलट आम्ही संसोपाच्या गौरे मुरारीस राज्यसभेच्या उपाध्यक्षाच्या जागे-साठी पाठिंबा दिला होता.'

नाथ पैंचे म्हणणे खरे होते. मी ह. वि. कामथ यांना त्याविषयी पृच्छा केली होती. 'वैयक्तिक संघर्षाचा प्रश्न खराच. पण संसोपावाल्यांनी सांगितले, माझ्या-विरुद्ध उभा केलेला दुसरा उमेदवार अस्पृश्य होता!'

संसोपा तत्त्वास घट्ट चिकटून बसत असेल अशी माझी कल्पना होती. पण ज्या मोरारजींस लाचलुचपतीचा जिवंत पुतळा म्हणून मधू लिमयांनी म्हटले त्या मोरार-जींच्या सिंडिकेटशी किमान दोन प्रांतांत हातमिळवणी करायला संसोपा आज एका पायावर तयार आहे–अर्थात् सत्तेसाठी. 'इस्टंट कॉफीसारखी संसोपा ही इंस्टंट पार्टी आहे.' मला नाथ पै सांगत होते, 'आत्यंतिकता हा संसोपावाल्यांचा स्थायी-भाव आहे. त्यांनी आम्हांला सुनावले, 'Instant Merger किंवा Instant Mur-der.' आम्ही वाईट ना, मग आमच्याशी क्षणार्धात प्रेमात यायलाही वेळ नाही व आमची निंदा करायलाही उशीर नाही!'

बिचाऱ्या एस. एम. जोशांची या आत्यंतिक राजकारणात दयनीय अवस्था आहे. मध्यंतरी सरकारी नोकरांच्या संपाचा प्रश्न आला. पार्लमेंट चालू नव्हते. गृहमंत्री कायदा हाती घेऊन वाटेल त्या पुढाऱ्यांना गिरफदार करतील म्हणून नाथ पैंनी सांगितले, पार्लमेंट सुरू झाल्यावर संप सुरू करा. संसोपाने ऐकले नाही. उलट एस. एम. विरुद्ध मधू लिमयांनी एक लेख कम्युनिस्ट 'मेनस्ट्रीम' मध्ये बारा ऑक्टोबर १९६८ रोजी स्वतःच्या सहीने लिहिला. 'Frail, Fragile 'बुढ्ढे नेतृत्व

आम्हांस नको आहे, हे नेतृत्व संपले पाहिजे. हा मजकूर कशात तर 'मेनस्ट्रीम'मध्ये केव्हा तर एम. एम. उपोषणास बसले असताना ?

पै सांगत होते, 'या लोहिया गटास चारित्र्य हनन म्हणजेच क्रांती वाटते.'

माझ्याबरोबर दोघात एकी व्हावी असे वाटणारे एक संसोपाचे स्थानिक पुढारी होते. त्यांना संसोपावरील टीका कशी मानवणार ? बरीच वर्षे त्यांनी लोहियांबरोबर काढली होती. अस्वस्थ होऊन त्यांनी विचारले, पण या दोन पक्षांत कार्यक्रमाच्या दृष्टीने ऐक्य नको का घडून यायला ?

'आम्ही नाही कुठे म्हणतो आहोत.' बॅ. नाथ पैंनी उत्तर दिले, 'त्यासाठी तर १९६३ मध्ये बनारस कॉन्फरन्स झाली. पुढे १८, विंडसर पॅलेस येथे एक कमिटी नेमली गेली. त्या वेळेस सुरेंद्रनाथ द्विवेदींना राजनारायणांनी काय सुनवावे ? म्हणे जोड्यांनी मारू ! गोरे व पै म्हणे काँग्रेसचे दलाल आणि या घोषणा एकीची बोलणी चालू असताना. शेरघाटी कॉन्फरन्सच्या वेळी तर जोड्यांनी मारामारी झाली व पिस्तूल उगारले गेले !'

मला आश्चर्य वाटत नाही.

परवा सोनेपूरला काय घडले ?

हीच मारामारी. हीच धमाल. संसोपा पक्षातील लोकांनी एकमेकांशी जोड्यांनी मारामारी केली; तर पी. एस. पी. ऐसी कोनसी बडी बात है ?

नाथ पै व गोरे पडले जंटलमेन. त्यांना का हा पंथ परवडणार ?

मला वाईट वाटते ते एम. एम. जोशांबद्दल. त्यांची जागा खरोखरच चुकली आहे. कजाग बायकोशी लग्न लावून बसल्यावर काय करतो एखादा बाप्या ? घटस्फोटासाठी कोर्टात जाईल तर त्या जज्जशी भांडून भुस्कट पाडेल ती बया !



अर्थात मधू लिमयांचीही बाजू ऐकण्यासारखी आहे. ‘इन्साफ’ त्याशिवाय होऊच शकत नाही.

त्यांच्यावर डॉ. लोहियांचा चांगलाच परिणाम झाला आहे. डॉ. लोहियांनी मागे मला सुनावले होते, ‘बुद्धिवादी तेवढा भ्याड, पळपुटा. तो कायद्याची भाषा बोलेल, प्रत्यक्ष कार्य कधीच करून दाखविणार नाही.’ थोडक्यात, वाया गलेले वीर म्हणजे बुद्धिवादी.

डॉ. लोहिया Frustrated होते. त्यांची उडी फार मोठी होती. ते असफल झाले. म्हणून नेहरूविरोधी झाले, हे मी स्वत: लोहियांकडून Confirm केलेले आहे. मधू लिमयांची थोडीफार तशी अवस्था आहे.

प्र. समाजवाद्यांनी मधूस पाडायचे ठरविले हे शल्य मधू लिमयांना सलते. जॉर्ज फर्नांडीसला प्र. स. पक्षाने विरोध केला होता हे ते विसरू शकत नाहीत. मधू लिमये मुंबईतून किंवा पुण्याहून निवडून येऊ शकत नाहीत. त्यांना थेट बिहारमधून निवडून यावे लागते. पी. एस. पी. च्या ‘स्ट्रॉंग’ उमेदवारांचे मधू व फर्नांडीस यांनी डिपॉझिट जप्त केले ही गोष्ट मधू लिमये मोठ्या अभिमानाने सांगतात !!!

मध्यंतरी एस. एम. जोशांनी मुंबईच्या बेकायदेशीर फेरीवाल्यांवर नियंत्रण घालावे, त्यांचे चालणारे स्मगलिंग थांबवावे अशी सूचना केली. मधू लिमयांना नाथ पै व गोरे यांनी या ‘बेजबाबदार (?) भाषणा’चा निषेध केल्याचे शल्य खुपते.

इथे पुन्हा प्रादेशिकवाद आडवा येतो. इथे काय, सर्वच प्रश्नांवर ! शिवाप्पा हे म्हैसूरचे प्र. स. पक्षाचे पुढारी, नाथ पै व गोरे महाराष्ट्राचे. एकदा आम्ही सर्व ब्रेक-फास्ट घेतघेत राजकीय चर्चा करीत होतो. सारेच दादा लोक. विनोदास तर बहर आला होता. त्या वेळेस सहज अनुभवले, शिवाप्पांना बेळगाव म्हैसूरमध्ये पाहिजे. बॅ. नाथ पैंना महाराष्ट्रात. हेम बारुआ मस्त होते. बेळगाव गुजराथमध्ये टाकले तरी काय बिघडते अशा वृत्तीत !

संसोपाचे पुढारी प्र. स. पक्षाच्या लोकांच्या उलट. जरा उतावळे, गरम माथ्याचे व कडक बोलणारे आहेत हे मी मान्य करतो. पण ते ‘क्रियाशील’ आहेत. त्यांना कार्य करायचे आहे, ती त्यांची तळमळ स्पष्ट दिसत आहे. त्याउलट सनदशीर पी. एस. पी. ची गंज चढलेल्या तलवारीसारखी गत झाली आहे. त्यांना लोहियांच्या ‘अंग्रेजी हटावो’ चळवळीचा तिरस्कार वाटतो. त्यांना हिंदी ही ‘राष्ट्रभाषा’ म्हणून मान्य आहे. पी. एस. पी. वाले लोकसभेत इंग्रजी सोडून इतर भाषांत एक अक्षर बोलत नाहीत !

पी. एस. पी. स अटलांटिक कँपकडून (नाटोशी नाते असलेल्या !) पैसा मिळतो असा सं. सो. पा.चा आरोप. अशा परिस्थितीत सं. सो. पा. व प्र. सो. पक्षांचे जुळणार कोठून ?

प्र. स. प. व सं. सो. प. यांच्यांत एक मोठा फरक आहे. दोन्ही पक्ष कॉंग्रेस-विरोधी पक्षांशी हातमिळवणी करतात. पण सं. सो. पा. चे ध्येय असते कॉंग्रेसचा

सत्यानाश, तर प्र. स. पक्षाचे धोरण असते कोठून का होईना सत्ता. शिवसेना–प्र. स. पक्ष यांच्या आघाडीचे एरवी समर्थन करता येणे अशक्य आहे. या काँग्रेसनाशाच्या ध्येयासाठी सं. सो. पक्ष कम्युनिस्टांशी सहकार्य नाकारोत नाही. प्रजासमाजवादी लोकांना कम्युनिस्ट म्हटले की अॅलर्जी होते. म्हणून प्रजासमाजवाद्यांचे काँग्रेसमधून फ्रस्ट्रेशनमुळे बाहेर पडलेल्यांशी चांगले जमते! काँग्रेसमधून माणूस बाहेर का पडतो? त्यास सत्ता नाकारली जाते म्हणून.

त्या सत्तेसाठी तो माणूस कोणासही सहकार्य करण्यास राजी असतो. बी. के. डी. एल. सो. डी. हे काय राजकीय पक्ष थोडेच आहेत? हे तर सारे सत्तापिपासू गट वा जथ्थे आहेत. यांच्याशी सहकार्य करून 'सत्ता', 'सत्ता' घोकीत राहिल्यामुळे प्र. स. पक्ष यशस्वी होऊ शकत नाही. उलट काँग्रेसविरोधदेखील पातळ राहतो. नाथ पै काय किंवा गोरे काय त्यांचा लोकसभेतील फाबियन रोल आठवा – डॉ. मुखर्जी किंवा डॉ. लोहिया यांनी नेहरूंच्या धोरणाविरुद्ध जी जहाल टीका केली तशी टीका या पी. एस. पी. च्या अध्वर्यूंना कधी जमलीच नाही हे खेदाने मला येथे नमूद करावेसे वाटते 'कॉन्सेन्सस फॉर प्रेसिडेंट,' नाथ पैंचे 'अँटी–फंडामेंटल राईट्स् बिल.' वगैरे पाहू जाता प्रजासमाजवाद्यांनी इंदिरेस मदतच केली आहे असेच कबूल करावे लागते.

ह्या काँग्रेसला मदत करण्याच्या लटपटीमुळे पी. एस. पी. व एस. एस. पी. यांची एकी होणे अशक्य वाटते. एका पी. एस. पी. च्या पुढाऱ्यास याविषयी विचारणा केली. त्याने उत्तर दिले, एस. एस. पी. कम्युनिस्टांचा धाकटा भाऊ आहे. त्यांचे आमचे पटणे जन्मात शक्य नाही. त्यांचा काँग्रेसविरोध वैयक्तिक विरोध असतो. नेहरूंना किंवा इंदिरेस. ते आम्हास पटणे कसे शक्य आहे?'

मधू लिमयांना हे म्हणणे पटत नाही. त्यांचा एक खडा सवाल विचार करण्यासारखा आहे. 'उजवे साम्यवादी (मॉस्कोवाले) काँग्रेस पक्षात शिरून उजव्या काँग्रेसवाल्यांचे उच्चाटण का करीत नाहीत?' त्यांचे म्हणणे: 'ते त्यांच्या स्वार्थासाठी तसे करणार नाहीत: ते लोक काँग्रेस पक्षात राहून काँग्रेसच्या धोरणावर एका बाजूस नियंत्रण ठेवतील. दुसऱ्या बाजूने ते मुख्य विरोधी पक्षाचा झेंडा मिरवतील व इंदिरेच्या काँग्रेसचे छोटे बंधू म्हणून काँग्रेसबाहेर राहून इंदिरेस मदत करतील.'

म्हणून मधू लिमयांनी तीन मुद्यांचा एक राजकीय कार्यक्रम सुचविला आहे. वाटतो तेवढा तो अवघड नाही. पण राजकीय अहंकार व सत्तेचे वेड त्यामुळे तो कार्यक्रम कितो लोकप्रिय होईल ते ठाऊक नाही. कार्यक्रमाचे ती मुद्दे पुढीलप्रमाणे:

१. सर्व संयुक्त आघाडीचा पाया प्रत्यक्ष कार्य किंवा कार्यक्रम. केंद्र व प्रांतीय काँग्रेसविरुद्ध काही विषयांविरुद्ध सरळ लढा. हे विषय कोणचे? प्रतिगामी व भारतविरोधी धोरण दर्शविणारे हे विषय.

२. स्वपक्षाचे स्वतंत्र धोरणाचा प्रचार करण्याचे स्वातंत्र्य, आणि

३. पक्षसंघटनांचा पुनरुद्धार, लोकाभिमुख आघाडी व ग्रास् रूट अपील– विद्यार्थी, तरुण, कामगार, शेतकरी वगैरे लोकांना.

पण हे जमावे कसे ?

आजकाल संघटन कोणासच नको आहे.

ही नवीन 'हवा' दुर्लक्षून चालणार नाही.

रा. स्व. संघ, पी. एस. पी., एस. एस. पी., कम्युनिस्ट्स्, हिंदूसभा, कॉंग्रेस-वाले–साऱ्या पक्षांचे कार्यकर्ते हीच ओरड करताना मला आढळून येतात. संघटनेच्या नावाने पूज्य ! संघात संघटन चार आणे असेल, दलात एक आणा असेल तर समितीत दोन पैसे असेल. पण याला काही 'संघटन' म्हणत नाहीत.

मतामतांचा एवढा गलबला माजला आहे की आहे की उजव्या काय किंवा डाव्या काय, पण विरोधी पक्षांच्या एकजुटीची आशा करणे भोळेपणाचे ठरेल.

दोन Divide and Rule हे धोरण आखणाऱ्या कॉंग्रेसचा जेवढा आहे तेवढाच You pay us and we shall help you हे धोरण राखणाऱ्या विरोधी पक्षांचाही आहे. कॉंग्रेसपक्षास जेमतेम ३५–४० टक्के साधारणतः मते मिळतात. विरोधी पक्षांना मते ६० टक्के मिळतात. दुर्दैवाने, विरोधी पक्षांत खूप फूट आहे, मत्सर आहे, ईर्षा आहे, भलतीच दांडगी महत्त्वाकांक्षा आहे. प्रत्येक विरोधी पक्षास आपण भारताचे सत्ताधीश होणार ही सुप्त आशा कोणाच्या जोरावर वाटते त्याचे मला कौतुक वाटते. कोणत्याही एका विरोधी पक्षास सत्तेवर यायचे असल्यास इतरांनी खाली बसले पाहिजे. हे खाली बसणे धाकदपटशाने साध्य होऊ शकेल. ही समर्थ शक्ती कम्युनिस्टांजवळ नसून वापरली जाते व संघाजवळ असून वापरली जात नाही ! साम–दाम हे मार्ग मोकळे आहेत. दाम तर एकाजवळ तेवढ्या प्रचंड स्वरूपात नाही. सामोपचाराने विरोधी पक्षांचे संघटन अशक्य आहे. तत्त्वनिष्ठेचा जबरदस्त अहंकार व जातीपातींचे वैमनस्य ही दोन कारणे मोठ्यात मोठे अडथळे आहेत.

उजव्या पक्षांत प्रजासमाजवाद्यांचा समावेश जनसंघ, स्वतंत्र व कॉंग्रेसचे जाणते लोक कशासाठी करतात ते मला कोडे वाटते. राजाजींनी स्वतंत्र, जनसंघ, भा. क्रां. दल व पी. एस्. पी. यांचा 'उजवी आघाडी' का याची दोन कारणे २१ जून १९६९ च्या 'स्वराज्या'त दिली होती : कॉंग्रेसला विरोध व कम्युनिस्टांना विरोध हे खरे असेल तर राजाजींना मला पुढील प्रश्न विचारावासा वाटतो : 'कच्छ प्रश्नावर स्वतंत्र व कम्युनिस्ट पक्षांची मते बरोबर सारखी होती हे कसे ?' कम्युनिस्टांना जनसंघाप्रमाणे शिव्या देणाऱ्या हिंदुसभेच्या पुढाऱ्यांना हाच प्रश्न विचारावासा वाटतो : 'समितीत कम्युनिस्टांचे प्राबल्य आहे हे काय तुमच्या जयवंतरावांना कळत नसेल ?', म्हणा जयवंतरावांचे काम चूक आहे ? १९५७



हा काय प्रकार चाललाय बुवा ?...

साली खुद्द सावरकरांनीच आदेश दिला होता की केरळात काँग्रेसविरुद्ध कम्युनिस्टांना पाठिंबा द्या म्हणून. कारण काँग्रेस प्रो–ख्रिश्चन व प्रो–मुस्लिम आहे. हाच जुना आदेश मनात धरून जनसंघाने उत्तरेस कम्युनिस्टांशी हातमिळवणी करून आपले सरकार स्थापन केले होते व सामान्य भगव्या भक्तास गोंधळात टाकले होते. या सर्व पक्षांचे कम्युनिस्टांविरुद्ध काँग्रेस–प्रेम जागृत होते व काँग्रेसविरुद्ध कम्युनिस्ट–प्रेम जागृत होते. हा प्रकार कसा समजावून द्यायचा ते आपल्याला कळत नाही.

काँग्रेसच्या ध्रुवीकरणाची आज फार चर्चा ऐकू येते. पंधरा वर्षांपूर्वी नेहरूंनी समाजवादाची घोषणा करताच साऱ्या काँग्रेसवाल्यांनी समाजवादावर प्रेम करण्यास सुरुवात केली. आज मोरारजी–पाटील–आप्पादेखील समाजवादाशिवाय दुसरी बात करीत नाहीत. हे जर खरे असेल तर सिंडिकेट–जनसंघ–पी. एस. पी.–स्वतंत्र व भा. क्रां. दल यांचे कडबोळे कसे जिवंत राहू शकेल ? जनसंघ व स्वतंत्र तर समाजवादाचे विरोधक ना ? का सत्तेसाठी समाजवादांत पाणी घालण्याचे त्यांना जमेल असे वाटते ? म्हणा, त्यांच्यासमोर नेहरूंचा आदर्श असावा. नेहरूंनी समाजवाद्यांची तळी उचलून धरली व समाजवादाचा जोरात प्रचार केला. प्रत्यक्षात त्यांनी भांडवलशहांची मदत घेऊन त्यांच्या सुबत्तेस हातभार लावला. त्या दृष्टीने जनसंघ व स्वतंत्र या दोन उजव्या पक्षांस नेहरूछाप समाजवाद न जमायला काय हरकत आहे ?

स्वतंत्र पक्षाने लोकसभेत कम्युनिस्टविरोधी गट व्हावा अशी इच्छा प्रकट केली आहे. उत्तर प्रदेशात जनसंघ व स्वतंत्र पक्षांनी कम्युनिस्टांशी हातमिळवणी केली होती हे कसे विसरता येईल ? फार काय प. बंगालच्या स्वतंत्र पक्षाच्या लोकांना तेथे व्यापार करायचा आहे, कंत्राटे मिळवायची आहेत म्हणून त्यांना कम्युनिस्ट-विरोध प्रत्यक्षात मान्य होत नाही. पक्षांत त्याविरुद्ध त्यांची धुसफूस चालली आहेच. राजाजी समाजवादाविरुद्ध खूप बोलतात व लिहितात. पण त्यांना राष्ट्राध्यक्ष बनवून सत्ता देण्यास नेहरूंनी नकार दिला नसता तर काँग्रेसच्या साऱ्या डाव्या राजकारणास व इंदिरेच्या धोरणास त्यांनी संपूर्णपणे आशीर्वाद दिले असते ! प्रो. रंगा यांना संजीव रेड्डींनी आंध्रात हरविले नसते तर रंगाजी बापजन्मी राजाजींच्या मागे उभे राहिले नसते. एक काळ असा येईल की काँग्रेसचे पुढारी मला संयुक्त मंत्रीमंडळ बनवावयास सांगतील, हा राजाजींचा जुना अहंकार आता लौकरच सफल होईल अशी भीती मला वाटू लागली आहे. मोरारजींचा समाजवाद व राजाजींची Free Enterprise Policy यांचे लग्न लावल्यावर संतती कशी निर्माण होणार आहे याची काळजी जाणत्या लोकांना आतापासूनच लागून राहिली आहे व कदाचित जोरूका भाई मोनोपोलिस्ट व सासरची साम्यवादी मंडळी या दोघांचेही ह्या वऱ्हाडात फावून जायचे. या गडबडीत जनसंघ मागे राहत नाही हे भविष्य आधीच वर्तवून ठेवतो. कारण अटलबिहारी वाजपायजींनी दिल्लीच्या इंटरनॅशनल सेंटरमध्ये चर्चेत ‘Areas of Agreement’ व ‘National Consensus ची भाषा काढून काँग्रेसशी सशर्त सहकार्य देण्याची तयारी दाखविली होतीच. त्यांचे विधान पुढीलप्रमाण : “After we have selected the candidate we will ask other parties to support him !” राजेमहाराजांच्या सालियाणाच्या प्रश्नावर एक जनसंघी नेते मला म्हणाले होते, “आम्हाला जनतेशी वैरी परवडणार नाही.”

सूज्ञांस जास्त सांगणे नलगे.

जेथे जेथे हिंदू-मुसलमान प्रश्न प्रामुख्याने सतावतो तेथे तेथे जनसंघाची ‘गरज’ जास्त मोठ्या प्रमाणावर निर्माण होते. म्हणून जनसंघ (व संघ) दक्षिणेस लोकप्रिय होत नाही. मात्र मलप्पूरमची निर्मिती झाल्यावर लगेच जनसंघ त्या जिल्ह्यापुरता वाढू लागला. सांगितले तर आश्चर्य वाटेल, नंबुद्रीपादांचा पुतण्याच संघाचा पदाधिकारी आहे ! माझे एक मुंबईकर स्नेही श्री. दामले सावरकरांना भेटले. त्या वेळेस त्यांनी हिंदूसभा काँग्रेस सोडून कम्युनिस्टांना पाठिंबा का देते त्याचे कारण सावरकरांना विचारले. सावरकर म्हणाले, “औरंगजेब काफीरांचे सारे अस्तित्वच धोक्यात आणेल. त्याउलट स्टालीनने रशियात इतर मूल्ये नष्ट केली तरी विज्ञाननिष्ठा त्याने रशियन समाजाच्या गळी उतरविली. कम्युनिस्ट आपल्यात विज्ञाननिष्ठा आणतील. कालांतराने कम्युनिस्टांचे मानसिक दास्यत्व संपेल व त्यांची राष्ट्रीय निष्ठा पुन्हा जागृत होईल.” जनसंघाच्या वाजपायजींची कम्युनिस्टांविषयी ही

कल्पना आहे किंवा नाही हे मला ठाऊक नाही. पण तशी कल्पना नसल्यास लौकर तशी ती होईल, असे मात्र वाटण्यास पुष्कळ आधार आहे.

कम्युनिस्टांविषयी, मुसलमानांविषयी व समाजवाद्यांविषयी जनसंघाच्या गोटात बरीच ' उत्क्रांति ' अपेक्षित आहे. जनसंघात मध्यमवर्गीयांचा भरणा जास्त आहे त्यामुळे मोनोपोलिस्टांवर जनसंघाचा संपूर्ण भरंवसा असणे अशक्य आहे. आज जनसंघाजवळ सत्ता नसल्यामुळे पैशासाठी थैलीशहावर अवलंबून बसणे आवश्यव आहे. थैलीशहांचा अनुभव जनसंघास हळूहळू येऊ लागला आहे. ते थैलीशहा त्यांची ' किंमत ' बरोबर वसूल करतात. ह्या भांडवलशाही स्वार्थी वृत्तीमुळे जनसंघाचे तरुण स्वाभिमानी कार्यकर्ते आपोआप डाव्या बाजूस वळतील. त्यांच्या पाटण्याच्या अधिवेशनात शहरी प्राप्तिवरील पाच लाखांची कमाल मर्यादा असावः असा ठराव मराठी जनसंघीयांनी आणला. मराठी लोकांपुरते हे ठीक आहे. पण गुजराथ, पंजाब वगैरे ठिकाणी हे पथ्य रुचणार नाही. प्रादेशिक वाद जनसंघास चांगलेच त्रास देणार आहेत. मुंबईत शिवसेनेस जनसंघ फुकट विरोध करीत आहे हे साठ टक्के मुंबईकर जनसंघीयांचे म्हणणे जनसंघाच्या केंद्रीय कार्यकर्त्यांना ' तत्त्वत: मान्य असले तरी दक्षिणेत त्यांच्याविरुद्ध बोंबाबोंब होईल म्हणून वास्तववादाच्या विरुद्ध उपाययोजना करावी लागत आहे. अगदी तीच दीन अवस्था हरियाना व पंजाब या दोन्ही प्रांतांतील नेत्यांची झाली आहे. दोघांनाही चंडीगढ आपापल्या प्रतिष्ठेसाठी पाहिजे आहे. एक जनसंघीय पुढारी मला म्हणाले, ही ' ऑल इंडिया इमेज ' आम्हांला बरीच महागात पडणार आहे. त्यामानाने प्रादेशिक पक्षाचे काम सोपे आहे. लोकशाहीत प्रादेशिकवाद अपरिहार्य आहे. कॉंग्रेसचे ठीक आहे, पण जनसंघाने आपल्या धोरणांत जरा बदलाबदली केली तर त्यांच्या जुन्या, धार्मिक व रूढिप्रिय भक्तांना राग येतो. १९६९ साली पंजाबमध्ये पोट-निवडणुका झाल्या. पंजाबी-हिंदी भाषिकांच्या धमालीत जनसंघाने वास्तविक भूमिका घेतली. गुरुजी गोळवलकरांनी पंजाबींस पाठिंबा दिला. पण त्याची जबर किंमत जनसंघास पंजाबात द्यावी लागली. अशीच दीन अवस्था बिहारमध्ये पासवान मंत्री-मंडळाच्या वेळी झाली व भोला पासवान मंत्रीमंडळास दिलेला पाठिंबा जनसंघास मागे घ्यावा लागला.

जनसंघाप्रमाणे स्वतंत्र पक्षास प्रादेशिक वादाने संत्रस्त करून सोडले आहे. भरीस भर जातपातींचे वाद आहेतच. उदाहरणार्थ, सौराष्ट्र व गुजरात येथे दोन्ही ठिकाणी राजपूतांचा जोर चांगला आहे. गुजराथेत पटेलांचे प्राबल्य फार. हे सारे पटेल कॉंग्रेसपक्षात आहेत. त्याबरोबर सारे राजपूत स्वतंत्र पक्षात. त्या-उलट सौराष्ट्रात कॉंग्रेसमध्ये सारे राजे महाराजे (राजपूत) आहेत. म्हणून बिन-क्षत्रिय सारे स्वतंत्र पक्षात. सौराष्ट्र व गुजराथ यांचे मुळातच जमत नाही. मला सांगा, या आतील तणातणीत गुजराथी ' स्वतंत्र ' व सौराष्ट्रीयन ' कॉंग्रेस ' पक्षांचे जमावे कसे ?

स्वतंत्र पक्षाचा मुख्य प्रश्न अस्तित्वाचा आहे. उत्तर प्रदेश येथे स्वतंत्र पक्ष जवळजवळ नाहीच. त्यामुळे तेथील स्वतंत्र पक्ष भारतीय क्रांति दल सांगेल तेथे सही करण्यास तयार आहे. राजस्थानात नेमके उलट आहे. तेथे स्वतंत्र पक्ष आहे पण भा. क्रां. दलाचे नावही नाही. दोघांनी संयुक्त आघाडी करायचे ठरविले तर ही आघाडी कशी असेल त्याची कल्पना सहज करता येईल. जनसंघ व स्वतंत्र यांची संयुक्त आघाडी करण्याचे ठरविले तर संघाचे सैनिक व स्वतंत्रांचे जनरल्स अशी विचित्र परिस्थिती होईल! या भाडोत्री व फालतू जनरलसना संघाच्या शिस्तबद्ध सैनिकांनी का म्हणून भाव द्यावा? आणि आणि संघाचे जे काही जुने व जाणते जनरल्स आहेत त्यांनी ही स्वतंत्रांची दादागिरी का चालवून घ्यावी? म्हणजे जन्माआधीच मृत्यूची चिन्हे!

मागे बलराज मधोक जनसंघाचे अध्यक्ष असताना जनसंघ व स्वतंत्र यांच्या युतीविषयी मी प्रश्न विचारला होता. तेव्हा त्यांनी स्पष्टपणे सांगितले होते, 'निवडणुकीपुरती ती युती टिकते. नंतर समोरचा पक्ष वाटेल ती किंमत मागतो. ते आपल्याला परवडत नाही. त्यापेक्षा युती न केली तर काय वाईट?' त्या वास्तवतेस विरोध करणाराही एक गट जनसंघात आहे. तो गट म्हणतो, 'मग बापजन्मी सत्ता आपल्या हाती यावयास नको. सत्ता हाती आली नाही तर आपल्या कल्पना आपण साकार करणार केव्हा? नुसते पोकळ तत्त्वज्ञान सांगून आपले कोण ऐकणार?'

निष्ठावंत भक्तांचेही दिवस भरले आहेत या कलीयुगात. एक केस पेश करतो. जवळचे उदाहरण आहे. एक समाजवादी निष्ठावंत तरुण. समाजवाद्यांच्या नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे बायको शाळा-मास्तरीण. तरुण व मध्यमवर्गीय. म्हणून तत्त्वनिष्ठा, कार्यनिष्ठा व देशनिष्ठा. नोकरी सोडून शंभर रुपयांवर स्वारी पक्षकार्य करू लागली. कार्य वाढले, शहरात पक्षाचा दबदबाही वाढला. पण त्यास सहा महिन्यांनी आढळून आले की पक्षाचे सर्वोच्च पुढारी आपल्याला नोकरासारखे वागवीत आहेत. पेडसर्व्हंट्. ही व्यथा सांगायची कोणास? आमचे परममित्र म्हणून धीर धरून त्याने मला त्यास मिळणाऱ्या वागणुकीचे दर्शन घडविले. ×××ला असे का वाटते की बाहेर मला नोकरी मिळणार नाही? मला पाचशेची नोकरी, कोठेही सहज मिळेल,' हा त्याचा मला सवाल. नोकरी दुसरीकडे धरली तर कार्यास कमी वेळ मिळतो ही दुसरी समस्या. मला सांगा, काय करावे त्याने? म्हटलं, हळूच सूचवून पाहा. सुचविले. शंभराचा पगार सव्वाशे झाला. ट्रीटमेंट तीच. कंटाळून त्याने पक्षाचा राजीनामा दिला. आज स्वारी दोन हजार रुपयांवर ××× कंपनीचा मॅनेजर आहे. समाजवाद हा भूतकाळात निदान त्याच्यासाठी तरी जमा झाला आहे.

सर्वांचे चांगले घेऊन सर्वांचा उदय व्हावा इति सर्वोदय मंडळी. पण ते होणार कसे!

'तुमचे लेख वाचतो कोणता वर्ग ?' हा परखड प्रश्न विचारून एका महान नेत्याने माझ्या मेंदूस झिणझिण्या आणल्या होत्या.

खरे होते त्यांचे. लेख वाचून विचारविनिमय करणारा बुद्धिजीवी मध्यमवर्ग महाराष्ट्रात फक्त चार टक्के आहे.

आणि तो राजकीय बाबतीत नपुसक आहे, निष्क्रीय आहे. तो मिंधा आहे. त्याची इच्छा नसूनही त्यास श्रेय इतर कोणास द्यावे लागते. आपल्या मांडीवर दुसऱ्याचे बाळ दत्तक घ्यावे लागते.

या वर्गाच्या पुढाऱ्यांस ' मास फॉलोईंग ' नाही.

म्हणून तर आजच्या राजकारणात क्वालीटीचे डीटीरीओरेशन्.

त्याचा संबंध इंदिरा—यशवंतराव यांच्या राजकारणाशी कसा आहे त्याचा तपशील पुढील लेखांकांत देऊन ही लांबलेली लेखमाला आटोपती घेऊ.

( क्रमशः )






# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## □ अमेरिकेने चीन जिंकला तेव्हाची गोष्ट

अज्ञानात किती आनंद असतो याचे मोजमाप केल्याचे ऐकिवात नाही. पण काही भाग्यवान् भारतीयांना हा आनंदबोध प्राप्त करून देण्यासाठी खास सोय करण्यात आलेली दिसते. उदाहरणार्थ, काश्मीरमधल्या एका शालेय पाठ्यपुस्तकात अशी माहिती दिली आहे की भारत व तिबेट यांच्यामध्ये व्यापार चालत असे, पण अमेरिकेने चीन पादाक्रांत केल्यापासून तो थांबला आहे ! आता अमेरिकेने चीन नक्की कोणत्या तारखेला पादाक्रांत केला याचे ज्ञान निक्सनसाहेब किंवा कॉमरेड माओ यांच्यापैकी एकालाही नसेल. –पण नसेना का ! भारतातल्या एका कश्चित् शा. मा. ला जे सामान्य ज्ञान आहे ते चाऊ–माओला किंवा निक्सन–विल्सनला नाही याला आम्ही काय करावे ? ते काही असो, या पुस्तकात आणखी काय काय ज्ञान भरले असेल याची कल्पना करू या..


अमेरिकेने चीन जिंकल्यावर माओने राजकारणाचा संन्यास घेतला व अमेरिकेत स्थायीक होऊन एका मोटार–कारखान्याच्या शेजारीच आपल्या विचारांचा कारखाना काढला. या कामात त्याला चांगलीच बरकत येऊन त्याचे अमेरिकन विचार अमेरिकन मोटारीप्रमाणेच संबंध जगात पॉप्युलर झाले. आता तो "माओचे विचार–मार्क टू" काढायच्या विचारात आहे. चाउ एन्–लायला मेट्रो गोल्डविन मेयर कंपनीने आपल्या स्टंटपटात व्हिलनची भूमिका करण्यासाठी हॉलिवुडला बोलावून घेतले. तेथे गेल्या चार–पांच वर्षांत त्याची चार–पाच लग्ने झाल्याचे समजते. लिऊ शाओ–चीला मात्र या उलथापालथीत वेड लागल्याने त्याला अपोलो–२५ बरोबर चंद्रावर पाठविण्याचा निर्णय निक्सन साहेबांना घ्यावा लागला. साम्यवादाचे वेड असताना लिऊने "हाऊ टु बी ए गुड कम्युनिस्ट" नावाचे गाजलेले पुस्तक लिहिले होते; आता सध्या वेगाने तो त्याची विघडवून वाढवलेली आवृती तयार करीत आहे. भूतपूर्व अध्यक्ष जॉन्सन यांना चीनचे गव्हर्नर म्हणून पेकिंगला पाठविण्यात आले व त्यांनी चीनच्या अमेरिकनीकरणाची पहिली पायरी म्हणून

सर्व भूतपूर्व लाल रक्षकांना बेसबॉल खेळाचे शिक्षण सक्तीचे केले. आणखीही बरेच मोठे फरक झाले, त्यातले काही असे : १. चायनीज फ्राइड राइस व हॉट डॉग यांचे मिश्रण करून एक नवीन खाद्यप्रकार अमेरिका–चीन मैत्रीचे प्रतीक म्हणून तयार झाला आणि निक्सन व माओ रोज त्याच्यावर ब्रेकफास्ट करू लागले. २. काकाकोला हे चीनचे राष्ट्रीय पेय घोषित करण्यात आले. ३. चीनमध्ये विकणारी अफू अमेरिकन हिप्पींना सवलतीच्या दराने विकण्याचा करार झाला. ४. चीन दाती तृण धरून शरण आल्याचे प्रतीक म्हणून चायना ग्रास हा खाद्यप्रकार चीनहून अमेरिकेला एक्स्पोर्ट होऊ लागला. ५. चीनमधल्या मोटारगाड्या माओच्या विचारावर चालत नसून पेट्रोलवर चालतात, त्याचप्रमाणे चीनमधले रोगी माओच्या नामस्मरणाने नव्हे तर औषधाने बरे होतात असा नवीन शोध लागला. ६. आता-पर्यंत अमेरिकेला शिवीगाळ करण्यासाठी चीनमध्ये जे शब्द वापरले जात होते त्या सर्व शब्दांचे अर्थ सरकारी हुकमानुसार बदलण्यात आले.

## ◻ तळपायाची फॅशन मस्तकाला

भारतीय मानक संस्थेने हल्ली ज्या निरनिराळ्या नित्योपयोगी वस्तूंच्या बनावटी-साठी प्रमाणे ठरवून दिली आहेत त्यांत शाळकरी मुलींच्या पायाची वाढ नीट व्हावी म्हणून त्यांच्या जोड्याचे डिझाईन कसे असावे हेही ठरवून दिले आहे मात्र आरोग्यासाठी जुनी पुराणी बाब बाजूला ठेवली तरी फॅशनच्या आधुनिक अराजकात थोडीफार सुव्यवस्था आणायची असेल तर मानक संस्थेच्या प्रमाणाचा उपयोग होऊ शकेल. माझ्या कल्पनेप्रमाणे काही अत्यावश्यक प्रमाणे पुढीलप्रमाणे असायला हरकत नाही : केस : तरुण मुलींचा हेअर–डो त्यांच्या डोक्याच्या आकारापेक्षा अडीच पटीहून अधिक मोठा असू नये. तरुण मुलांची झुलपे वेणी घालण्याइतकी लांब असावीत, पण दोन वेण्या घालण्याइतकी लांब नसावीत. दोघांचेही केस डोळ्यावर येणे फॅशनच्या दृष्टीने अत्यावश्यक असले तरी रस्त्यावरून चालताना समोरून येणारी म्हैस किंवा मोटार अस्पष्ट तरी दिसली पाहिजे. कपडे : कमीज घालणाऱ्या तरुणीला पावलागणिक किमान तीन इंच तरी पुढे सरकता आले पाहिजे एवढाच तो घट्ट असावा. तरुणांच्या बुशशर्टचे डिझाइन ब्लाऊजसारखे असले तरी कट थोडासा तरी निराळा हवा. पादत्राणे : कुठल्याही तरुणीचे हायहील सँडल जमिनीपासून चार बोटे वर चालणाऱ्या धर्मराजापेक्षा तिला अधिक उच्च पातळी-वर नेणारे नसावेत. तरुणांचे टोकदार बूट पायापेक्षा दीडपटीहून अधिक लांब नसावेत.

◻ ◻ ◻



# अंदाज

पंडित वि. म. जोशी
ज्योतिष विशारद

२८ फेब्रुवारी ते ६ मार्च ७०

**मेष** : या सप्ताहातील ग्रहमान मेष राशीला सुखकारक आहे. अकरावे रवी-बुध-शुक्र-राहू, (ता. ४।३।७० पासून शुक्र बारावा), पहिले शनी-मंगळ, सातवा गुरू असे सर्व ग्रह शुभफलदायी आहेत. अचानक धनलाभ होईल. व्यापारधंदा नीट चालेल. पहिले दोन दिवस ता. २८ व १।३ घराबद्दलचे अगर जमीनीचे व्यवहार अडून पडतील. भागीदारांकडून त्रास होईल. चंद्राचे भ्रमण ८।९।१० स्थानातून आहे ते शुभ आहे. चंद्र-रवीना ६।८।१२ या स्थानांचा दोष नसतो. चैनीची वृत्ती वाढेल. विद्याभ्यासात अडथळे येतील. सरकारी कामात यश मिळणार नाही. खटले पुढे ढकलावे. ज्यांची नावे च, ल, र, त, अ या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील.

शुभ तारखा २ ते ६. सार्वजनिक कामात भरघोस यश आहे.

**वृषभ** : या सप्ताहातील ग्रहमान वृषभ राशीला पीडाकारक आहे. दहावे रवी-बुध-शुक्र-राहू (ता. ४।३ पासून शुक्र अकरावा होतो आहे), बारावे शनी-मंगळ व सहावा गुरू असे सर्वच ग्रह अशुभ फलदायी आहेत. सरकारी कामात संपूर्ण अपयश. पहिल्या दोन दिवसात भागीदार-मित्र अगर भावंडे सर्वांकडून फसवणूक होईल. मानमरातबाला कमीपणा येणाऱ्या गोष्टी घडतील. विद्याभ्यासात यश मिळेल. हातून शास्त्रीय लिखाण होईल. ३२ ते ३६ वयाच्या लोकांना हा अनुभव जास्त येईल. चंद्राचे भ्रमण सप्तम अष्टम व नवम स्थानातून आहे ते चांगले आहे. गुरू-रवी-बुध-राहू त्रिकोण चांगला आहे. गुरूला स्थानबल नाही तरी तो अडचणीतून पार पाडील. पोटातील विकार-अपचन-गॅस धरण्यापासून त्रास होईल. अचानक धनलाभात अडथळे येतील. प्रेम प्रकरणात सापडण्याचा योग आहे. ज्यांची नावे व, ब, आ, ई, उ, न, य या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील. शुभ तारखा ३ ते ६

**मिथुन** : या सप्ताहातील ग्रहमान मिथुन राशीला शोककारक आहे. नवमात रवी-शुक्र-बुध-राहू (४।३ नंतर शुक्र दशमात आहे), शनी-मंगळ एकादशात व चंद्राचे भ्रमण ६।७।८ या घरातून आहे ते चांगले नाही. पराक्रमाला कमीपणा येईल. भाऊबंदांकडून स्थावर मालमत्तेबद्दल विरोध होईल. पत्नीकडून व्यवहारात मदत होईल. भागीदार मदत करतील. ता. ४।३ नंतर कापड व फॅन्सी वस्तू, पेंट, सुगंधी तेले वगैरेच्या व्यापाऱ्यांना धनलाभ चांगला होईल. सरकारी कामात अडथळे

येतील. मिथुन राशीची माणसे अत्यंत खोल मनाची असतात. त्यांच्या मनातील गोष्टी कळणे कठीण असते. या आठवड्यात तर त्यांचे मनःस्वास्थ्य राहणार नाही. स्वभाव चिडखोर होईल. ज्या व्यक्तींची नावे क, प, द, ध, च, फ, क्ष, ज्ञ या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील. सर्वच आठवडा फारसा शुभ नाही.

**कर्क :** या सप्ताहातील ग्रहमान कर्क राशीला धनमानदायक आहे. रवी-शुक्र-राहू व बुध अष्टमात (४।३ नंतर शुक्र नवमात). शनी-मंगळ दशमात व चंद्राचे भ्रमण ५।६।७ या घरातून आहे. ते सर्व शुभ आहे. मंगळ पंचमेश व दशमेश आणि शनी सप्तमेश-अष्टमेश-दशमात आहेत. चतुर्थातील गुरू अष्टमातील ग्रहांशी त्रिकोण व शनी-मंगळाशी समसप्तक योग करतो आहे. सुख, अचानक धनलाभ, सार्वजनिक कामात यश, संततीसुख, विद्याभ्यासात यश आहे. सरकारी कामात थोड्या अडचणी येतील. ता. ४ पर्यंत घराचे अगर जमिनीचे व्यवहार करू नयेत. वृद्ध पित्याला आजारी पडण्याचा योग आहे. ता. ४ पर्यंत मनःस्वास्थ्य बिघडेल. ज्यांची नावे ज, स, ख, ह, ड या अक्षरांनी सुरू असतील त्या व्यक्तींना अगर संस्थांना वरील फळे मिळतील. सिंडिकेटचा प्रचार या आठवड्यात फार जोरात होईल. शुभ तारखा ४।५।६.

**सिंह :** या सप्ताहातील ग्रह सिंहराशीला शुभफलदायी आहेत. शनी-मंगळ नवमात, सप्तमात रवी-शुक्र-राहू-बुध (४।३ नंतर शुक्र अष्टमात) व चंद्राचे भ्रमण ४।५।६ घरातून आहे. असे सर्व ग्रह शुभ आहेत. गुरू तिसऱ्या घरातून सप्तमाशी त्रिकोण व भाग्यभवनाशी समसप्तक करतो आहे. भागीदारांकडून व पत्नीकडून त्रास होईल. मंगळ एकच राजयोगकारक ग्रह अतिशय चांगला आहे. मेडिकल अगर मिलिटरी व्यवसायातील व्यक्तींची अत्यंत भरभराट होईल. एकच एक अत्यंत अशुभ योग ता. ४।३ नंतर होत आहे. तो म्हणजे तृतीयेश अष्टमात व अष्टमेश तृतीयेत. पराक्रमाची हानी होईल. आत्मघातकी विचार मनात येतील. २८ ते ३२ वर्षांतील व्यक्तींना अपघात होण्याचा योग आहे. त्यावर उपाय दर शुक्रवारी गजान्त लक्ष्मीच्या तसबिरीला हार घालणे. ग, श, म, ट, ळ या अक्षरांनी ज्या व्यक्तींची नावे सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील.

शुभ तारखा २८ ते ३।३।७०.

**कन्या :** या सप्ताहातील ग्रह कन्या राशीला पीडादायक आहेत. आठवे शनी-मंगळ, सहावे रवी-शुक्र-राहू-बुध (४।३ नंतर शुक्र सातवा) दुसरा गुरू व चंद्राचे भ्रमण ३।४।५ या घरांतून आहे. विद्येत अपयश, संततीशी विरोध, भावंडांशी कलह, आत्मघात करण्याची इच्छा होईल. पत्नी व भागीदारांशी विरोध. फक्त एकच शुभ योग म्हणजे दुसरा गुरु व त्याचा सप्तमातील ग्रहांशी त्रिकोण. धनलाभ चांगला होईल. शत्रुनाश होईल. ३६ वर्षांच्या पुढील व्यक्तींना काही बाबतींत विशेष-करून पैसा प्राप्त होईल. अचानक वाईट धंद्यात धनलाभ चांगला होईल. ४।३

नंतर प्रेमसंबधांत फसवणूक होण्याचा योग आहे. स्त्री मित्रांची मदत ता. ४।५।६ मार्चला होईल. सर्जन लोकांना ४।३ नंतर खूपच यश आणि पैसा मिळेल. त्यांचे हातून ऑपरेशन्स यशस्वी होतील. ज्या व्यक्तींची नावे क, प, द, ध, च, फ, ङ, ञ यांपैकी एखाद्या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील.

शुभ तारखा ३ ते ६.

तूळ : या सप्ताहातील ग्रहमान तूळ राशीला सौख्यकारक आहे. पहिला गुरू, पाचवे रवी–शुक्र–राहू–बुध (४।३ नंतर शुक्र सहावा) शनी-मंगळ सप्तमात व चंद्राचे भ्रमण दोन, तीन व चवथ्या घरातून. असे सर्व ग्रह शुभफलदायक आहे. ता. ४ नंतर शुक्र लग्नेश शष्ठात जातो. हा अत्यंत पराक्रमयोग असतो. शत्रूंचीही मदत होईल. धनलाभ चांगला होईल. भावंडांकडून, मित्रांकडून मदत चांगली होईल. विद्याभ्यासात यश. शास्त्रीय लेखन करण्याला दिवस चांगले आहेत. भागीदारांशी व पत्नीशी थोडा मतभेद होईल. सार्वजनिक कामात भरपूर यश व मानमरातब मिळेल. सरकारी कामात यश प्राप्त होईल. ता. २८-१ धनलाभ होईल. संततीकडून त्रास होईल. ज्या व्यक्तींची अगर सस्थांनची न, च, ल, र, त, अ या अक्षरांनी सुरू असतील त्यानांही वरीलप्रमाणे फळे मिळतील.

शुभ तारखा २८।१-४।५।६. सर्व आठवडाच शुभ आहे.

वृश्चिक : या सप्ताहातील ग्रहमान वृश्चिक राशीला सौख्यकारक आहे. बारावा गुरू, चवथे रवी–शुक्र–राहू–बुध (४।३ नंतर पाचवा शुक्र) व सहावे शनी–मगळ असे सर्वच ग्रह प्रगतिपर आहेत. धनलाभ व विद्या चांगली होईल. संततीकरता व इतर कामांकरता खर्च फार होईल. हातून एखादे चांगले सार्वजनिक कार्य होईल. त्यात संपूर्ण यश मिळेल. चंद्राचे भ्रमण १।२।३ घरातून आहे ते फारच चांगले आहे. प्रवास धार्मिक कार्याकरता घडेल. गुरू व रवी–बुध–राहूचा त्रिकोण सुखकारक गोष्टी घरात घडवून आणील. मित्र व भावंडांकडून सर्व बाबतीत मदत होईल. प्रेमविवाह जमून येईल. व्यापारात व सरकारी कामांत थोडा अडथळा येईल. ४।५।६ तारखांना प्रवासयोग येईल. ज्या व्यक्तींची अगर संस्थांची नावे न, य, व, ब, आ, ई, उ, ओ यांनी सुरुवात असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील.

शुभ तारखा ४।५।६.

धन : या सप्ताहातील ग्रहमान धन राशीला शुभ फलदायी आहे. तिसरे रवी–राहू–शुक्र–बुध (४।३ नंतर शुक्र चवथा) पाचवे शनी-मंगळ, अकरावा गुरू व चंद्राचे भ्रमण १२।१।२ या घरातून आहे. सर्व ग्रह शुभफलदायी आहेत. हातून पराक्रम घडेल. मंगळ-शनी शत्रुनाश करतील. शुक्र–गुरूचा अन्योन्य योग आहे तो चांगला आहे. सुखवृद्धी, मित्रांकडून सर्व कामात मदत, भागीदार व पत्नीची पूर्ण सहानुभूती. विद्येत व संततीला थोडा त्रास. घरात काही शुभकार्य होईल. विवाह जमणे थोडे पुढे ढकलले जाईल. ४।५।६ धनलाभ चांगला होईल. अचानक धन-

लाभाचा योग आहे. सरकारी कामात अडथळे येतील. मुदत वाढवून घ्यावी. धंदा नीट चालेल. ज्या व्यक्तींची अगर संस्थांची नावे क, प, द, ध, फ, झ, ज्ञ, भ या अक्षरांनी असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील. शुभ तारखा २ ते ६.

**मकर :** या सप्ताहातील ग्रहमान मकर राशीला भोगदायक आहे. दुसरे रवी-शुक्र-बुध (४।३ नंतर शुक्र तिसरा) चवथे शनी-मंगळ, दहावा गुरू व चंद्राचे भ्रमण ११।१२।१ स्थानांतून आहे. धनलाभ चांगला होईल. अचानक धनलाभ होईल. उद्योग-धंदा अगर नोकरी मिळेल. चतुर्थातील शनी-मंगळ सुखात थोडे अडथळे आणतील. मशीनरी अगर कंत्राटदाराचे काम करणारांची प्रगती होईल. दशमातील गुरू व रवीचा त्रिकोण पराक्रम घडवून आणील. ४।३ नंतर शुक्र नोकरी-उद्योगाला जास्त शुभ होत आहे. लेखन-व्यवसायात चांगले फळ मिळेल. विद्याभ्यासात यश येईल. चवथा शनी मानसिक त्रास देईल. ज्यांची नावे ज, स, ख, ह, उ या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील. शुभ ता. ४ ते ६.

**कुंभ :** या सप्ताहातील ग्रहमान कुंभ राशीला चांगल्या गोष्टी घडविणारे आहे. लग्नी रवी-शुक्र-राहू-बुध (३।३ नंतर शुक्र दुसरा) नवमात गुरू व तृतीयात शनी-मंगळ व चंद्राचे भ्रमण १०।११।१२ घरातून आहे. भावंडांकडून कमीपणा आणण्याचा प्रयत्न होईल. मानसिक शांतता राहणार नाही. धनप्राप्ती चांगली होईल. विद्याभ्यासात यशप्राप्ती. संततीकडून सुखप्राप्ती. भागीदार व पत्नीकडून सर्व तऱ्हेची मदत होईल. धंदाव्यवसाय चांगला चालेल. फॅन्सी वस्तूंचा व्यापार करणारांना चांगलाच फायदा होईल. ता. २८।१।३।७० मानसन्मान होण्याचा योग आहे. ज्यांची नावे ग, श, म, ट, ठ नी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणे फळे मिळतील. शुभ तारखा १ ते ३.

**मीन :** या सप्ताहातील ग्रहमान मीन राशीला सुखकारक आहे. रवी-राहू-शुक्र-बुध व्ययात, (४।३ नंतर शुक्र पहिला) अष्टमात गुरू व शनी-मंगळ धनस्थानात असे सवच ग्रह अशुभ स्थानात आहेत. चंद्राचे भ्रमण मात्र ९।१०।११ स्थानातून आहे ते चांगले आहे. संततीकडून सर्व तऱ्हेची मदत होईल. धनलाभात अनेक अडथळे येतील. शारीरिक कष्ट फार पडतील. राग अनावर होईल. मित्रांकडून मदत होईल. फक्त एकच योग गुरू-रवीचा त्रिकोण या सर्व संकटातून मुक्त करील. त्याला योगबळ चांगले आहे पण स्थानबल नाही. सुखात व्यत्यय येईल ता. ४ नंतर होणारा गुरू-शुक्रांचा अन्योन्य योग सर्व अडचणीतून सहीसलामत बाहेर आणील. सरकारी अगर सहकारी कामे पुढे ढकलावीत. ज्याची नावे क, प, द, ध, च, फ, झ, ज्ञ, छ, घ, थ या अक्षरांनी असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील. शुभ तारखा ४ ते ६.

□ □ □

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **सं. श्री ग. माजगावकर**


खळाळणारे
हास्य
कधी प्यालात ?
फॅन्टा ऑरेंज ....
इतके मधुर की, तहानेतहि गंमत.
फॅन्टा हे कोका-कोला कंपनीचे उत्पादन आहे.
FANTA IS A REGISTERED TRADE MARK OF THE COCA-COLA COMPANY
CMCF-3-152-

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H–649



“ आपल्या राज्याचे मुख्यमंत्री ? जरा थांब हं ! आत्ता ९ च्या बातम्या ऐकून झाल्यावर सांगतो . . . . ”